शनिवार
११ ऑगस्ट ७९
पंचाहत्तर पैसे

# माणूस



## मोरारजींचा असा शेवट कुणालाच शोभादायक नाही

## दिल्लीचे खास वार्तापत्र

क्रमांक तीन

सत्ता टिकवायची म्हणजे मुस्लिम अनुनय आलाच.
मुस्लिम अनुनय म्हणजे संघाला निमंत्रण...
असा हा भारतीय राजकारणातला विचित्र पेच आहे...

## मार्क्सवाद्यांनाही तो सोडवता आलेला नाही

## कुरुक्षेत्र केरळ : शेवटचा लेखांक

## दिल्लीतील सत्तासंघर्षाचा आँखो देखा वृत्तान्त गेल्या दोन अंकात सादर केला....

क्रमांक तीन....

# जनता राजवट आणि राष्ट्रपतींनी आणलेले नवे अस्थिर सरकार

मोरारजी देसाई यांना सत्तेवरून खाली खेचणे यापलिकडे दिल्लीतील सत्तासंघर्षाला दुसरे कुठलेही तात्त्विक अधिष्ठान नव्हते, हे आता स्पष्ट झालेले आहे. यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेला अविश्वासाचा ठराव संमत होऊन मोरारजी सरकार कोसळले असते तर आज माजला आहे एवढा हाहा:कार माजण्याचे यत्किंचितही कारण नव्हते. लोकांनी हा धक्का सहज पचवला असता व नव्या सरकारला थोडेफार तरी स्थैर्य लाभावे अशी इच्छा बाळगली असती. नाही म्हटले तरी २८ महिने हे मोरारजी सरकार टिकले व लोकशाहीची पुनर्स्थापना करण्यात या सरकारला कौतुकास्पद यशही लाभले. दूरदर्शन, नभोवाणी ही खाती एका कट्टर जनसंघीयाकडे होती. ही माध्यमे किती खुली व्हावीत ? जनता सरकारचे व त्यातल्या त्यात त्यातील जनसंघाचे हाडवैरी असलेले कॉम्रेड डांगे या कालावधीत दूरदर्शनवर येऊ शकले, त्यांच्या मुलाखतीचा विस्तृत कार्यक्रम दूरदर्शनने सादर केला. ही एकच बाब जनता सरकारचा लोकशाही संस्थापनेच्या प्रयत्नातील प्रामाणिकपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. एवढा उदारपणा तर नेहरूंच्या काळातही दाखवला गेलेला नव्हता. सुप्रसिद्ध हिंदी लेखक कमलेश्वर कितीही ओरड करोत. ज्यांना त्यांचे पूर्वचरित्र माहीत आहे, ते त्यांच्या दूरदर्शनविरोधी प्रचारावर मुळीच विश्वास ठेवणार नाहीत. कारभारातला गलथानपणा वेगळा आणि ही प्रचारमाध्यमे स्वपक्षाच्या प्रचारासाठी जुंपणे वेगळे. लोकशाही संस्थापनेबाबत जनता पक्षाचे यश नको तितके उज्ज्वल होते व याचा विरोधकांनी वेळीअवेळी गैरफायदाच जास्त घेतलेला आहे, असे या २८ महिन्यांच्या कारकीर्दीचा कुणी हिशोब मांडलाच तर त्याला दिसून येईल. मधू दंडवते यांना रेल्वे बोनस देणे जमले नसेल; पण रेल्वे कारभारात सुधारणा घडवून आणण्याचा, नवनवीन रेल्वेमार्ग सुरू करण्याचा त्यांचा प्रामाणिकपणा लपून राहिलेला नाही. बोनसबाबतही त्यांचा आग्रह शेवटपर्यंत कसा चालू होता याबद्दलचा त्यांचा व मोरारजींचा एक संवाद दिल्लीत ऐकायला मिळाला. मोरारजींनी मंत्रिमंडळाचा राजिनामा दिलेला होता. काळजीवाहू सरकारला 'मोठे' निर्णय घेता येणार नाहीत असे मोरारजींनी मंत्रिमंडळाच्या एका बैठकीत आपल्या सहकाऱ्यांना सांगितले. दंडवते विनोदाने "हा बोनसचा 'किरकोळ' निर्णय मग घेऊन टाकू" असे म्हणताच एकच हशा पिकला. अशी टोचणी त्यांची शेवटपर्यंत चालू होती. मोरारजींनीही एक प्रशासकीय मुद्दा ताणून धरला होता असे


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : अकरावा
११ ऑगस्ट १९७९
किमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकी हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

म्हणतात. एक ' टास्क फोर्स ' नेमून रेल्वेतील भ्रष्टाचाराची निदान काही प्रकरणे तरी धडाधड उघडकीस आणून कारभार सुधारावा, यंत्रणेवरही थोडा वचक बसवावा असे मोरारजींचे मत होते व त्यांचे सरकार टिकले असते तर बोनसपूर्वी अशी साफसफाई झालीही असती. अटलबिहारींची चीनभेट रशियानुकूल मंडळींनी मुद्दाम वादग्रस्त बनवली. वास्तविक भेट घेण्यात काय गैर होते ? व्यापार-व्यवहार सुरू आहे. ताण कमी झालेला आहे. जुने सरहद्दीबाबतचे प्रश्न वाटाघाटीने सुटू शकतात की नाही हे निदान अजमावून पाहायला, त्यासाठी चीनला भेट द्यायला काहीच हरकत नव्हती. याचा अर्थ चीनसमोर आपण वाकतो, गुडघे टेकतो असा मुळीच होत नाही. अमेरिकेच्या किंवा रशियाच्या कुठल्याही दडपणांना या २८ महिन्यांच्या काळात भारत बळी पडलेला नाही व शेजारी राष्ट्रांशीही मित्रत्वाचे संबंध टिकून राहिले, इतकेच नाही तर थोडेफार सुधारलेही. आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवेश व आक्रमण अधिक झाले हे खरे; पण त्यालाही मोरारजी किंवा जनसंघघटक जबाबदार नाही हे ध्यानात घेतले पाहिजे. जर्मनीची सीमेन्स आणि आपली भेल ( भारत इलेक्ट्रिकल्स ) यांच्या भागीदारीला मोरारजींचा विरोध होता व त्यामुळेच जॉर्ज फर्नांडिस यांना हवा असलेला हा भागीदारी-करार सारखा लांबणीवर पडत होता. फर्नांडिस यांचा या भागीदारीचा पुरस्कारही केवळ स्वार्थापोटी होता असे म्हणता येत नाही. रशिया मधल्यामधे कमिशन खात होता. सीमेन्सचा माल जास्त किंमत देऊन रशियामार्फत घेण्याऐवजी भारताने सरकारी पातळीवर सीमेन्सशी सरळ भागीदारी करावी अशी फर्नांडिस यांची भूमिका होती व तिच्यात अगदीच तथ्यांश नव्हता असे म्हणता येत नाही. जाणकारच या प्रकरणावर अधिक व साधकबाधक प्रकाश टाकू शकतील; पण एक गोष्ट नक्की आहे, की आपली अर्थव्यवस्था अधिक परावलंबी करण्याचे पातक या २८ महिन्यात कुणी केलेले नाही. २६ महिने तर भावपातळी स्थिरच होती व गरजेच्या वस्तू मुबलक प्रमाणात मिळत होत्या. काही उणीवा, अपयशेही होती. गलथान कारभार हे मुख्य अपयश. इंदिरा गांधींचा प्रश्न अधिक कौशल्याने हाताळायला हवा होता. बाळासाहेब देवरस यांनी सुरुवातीलाच सुचवल्याप्रमाणे ' विसरा आणि क्षमा करा ' या भूमिकेतूनच सौम्य व त्वरित उपाययोजना करून हा प्रश्न सहा महिन्यांच्या कालावधीत निकाली काढायला हवा होता. विनाकारण हा प्रश्न चिघळवत ठेवला गेला व आता तो चांगलाच गळघाशी येत आहे. बुमरँगसारखा उलटला नाही तरच आश्चर्य. दारुबंदी, गोहत्या यासारख्या प्रश्नांना अवास्तव महत्त्व दिले गेले, ते द्यायला नको होते. कुटुंबनियोजनाकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. पाकिस्तानने अणुबाँब बनविला तरी आम्ही तो बनवणार नाही, अशी एकतर्फी घोषणा करण्याची आवश्यकता होती का ? जॉर्ज फर्नांडिस यांनी चिकमंगळूर येथे इंदिरा गांधींचा पराभव करण्यासाठी ठाण मांडून बसण्याऐवजी जिल्हा उद्योगकेंद्रांना चालना देण्यासाठी हा वेळ खर्च करायला हवा होता. आपल्या मंत्रालयातील प्यूनच्या खांद्यावर हात टाकून जॉर्ज फिरतो याचे कौतुक काही क्षण ठीक आहे. मंत्रालयात तो किती वेळ असायचा हा हिशोब महत्त्वाचा ठरायला हवा होता. पक्षांतर्गत मतभेदांची जाहीर वाच्यता किती करावी याला काही ताळतंत्रच उरलेले नव्हते. यामुळे जनता सरकारची प्रतिमा फार डागळली व कारभाराऐवजी भांडणातच या सरकारचा सर्व वेळ व शक्ती खर्च होत असावी असा भ्रम पसरत गेला. मोरारजी होते म्हणून २८ महिने तरी हे सरकार टिकले; नाही तर २८ दिवसातच या स्वयंमन्य भांडकुदळांनी या सरकारचे तीन तेरा वाजवून दाखवले असते ! एवढा विक्रम या मंडळींना सहज जमला असता. धर्मस्वातंत्र्य विधेयक आणण्याची इतर काही मंडळींनी घाई केली, तीही अनाठायी होती. त्यामुळे फाटाफुटीला निमित्त मिळाले व नको त्या गैरमहत्त्वाच्या प्रश्नावरच वातावरण उगाच तापत राहिले. अशा आणखीही काही चुका दाखवता येतील; पण सरकार गडगडण्याएवढ्या त्या निश्चितच गंभीर नव्हत्या. बहुसंख्य मंडळी प्रामाणिक होती, जनतेने आपल्यावर विश्वास टाकलेला आहे' या जाणिवेने आपापले काम निष्ठापूर्वक करणारी होती. रागाच्या किंवा अपेक्षाभंगाच्या भरात सरसकट सर्वांना धोपटण्यात, शिव्याशाप देण्यात काही अर्थ नाही. राजघाटावरची प्रतिज्ञा सर्वच काही विसरले नाहीत. तरीपण हे नक्की, की हे यश मध्यम होते. फार काही गौरवास्पद नव्हते. खूप करून दाखवता आले असते. संधी होती, लोकांचा पाठिंबा होता. परिस्थिती, हवामान सगळेच अनुकूल होते; पण नेतृत्व कुठे तरी कमी पडत गेले. प्रामाणिकपणाला थोडा तरी चैतन्यस्पर्श हवा होता. तो शेवटपर्यंत लाभला नाही. उणीव काय असेल ती एवढीच. ज्योत मंदपणे तेवली. तिचे मशालीत रूपांतर झाले नाही.

## विश्वासघाताचे राजकारण,

ही मंद ज्योत सहजपणे विझली असती तर हळहळ वाटण्यापलीकडे फारसे काही घडले नसते. ती विश्वासघाताने विझवण्यात आली म्हणून सारा देश हादरला ! लोकशाहीच्या माहेरघरी-इंग्लडमध्येही यापेक्षा कमी कालावधीची सरकारे येऊन गेलेली आहेत. तेव्हा २८ महिन्यात, अल्पमुदतीत हे सरकार कोसळले हा काही फारसा चिंतेचा विषय नाही. जो खेळ यापूर्वी १–२ राज्यात चालू होता तो केंद्रातही सुरू झाला तर या अवाढव्य देशाची एकता धोक्यात येते, हा खरा चिंतेचा विषय आहे. शिवाय लोकशाहीच्या पद्धतीचाही प्रश्न यात गुंतलेला आहेच. राजकारण म्हटले की त्यात सत्तास्पर्धा आलीच. पण स्पर्धेचे नियम डावलून कुणी राजकारण करू म्हणेल तर अराजकाशिवाय यातून दुसरे काय निष्पन्न होणार ? आर्थिक क्षेत्रात, व्यावसायिक गटातही स्पर्धा चालू असते. किंबहुना आधुनिक समाजव्यवस्थेची सुरुवात आणि उभारणीच स्पर्धातत्त्वावर झालेली आहे. आर्थिक क्षेत्रात यातून भांडवलशाही उदयास येते व राजकीय क्षेत्रात पार्लमेंटरी पद्धती विकास पावते. स्पर्धातत्त्वाची ही दोन रूपे आहेत, एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. नफ्यासाठी जशा दोन किंवा अधिक कंपन्या, आर्थिक–व्यावसायिक गट परस्परांशी चढाओढ करीत असतात तसे दोन किंवा अधिक राजकीय पक्ष–गट सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्नशील असणे यात अस्वाभाविक, गैर असे काहीही नाही; पण स्पर्धेचे नियम, चौकट ठरलेली असते. ती उल्लंघून साधा हुतुतूचा खेळही नीट होऊ शकणार नाही. मग एखाद्या अवाढव्य देशाचा कारभार चालू राहणे, त्या देशाने प्रगती साधणे, या तर लांबच्या गोष्टी आहेत. नफ्यासाठी स्पर्धा मान्य आहे; पण नफा

वाढावा म्हणून खोटेपणा, फसवाफसवी, विश्वासघात व्यापारात, व्यवसायातही मान्य होणार नाही. चहाच्या खोक्यात माती भरून पाठवली किंवा तयार कपडयांच्या गासडयांतून चिंध्या पाठवल्या तर ती कंपनी, तो व्यापारी एक दिवस तरी टिकू शकेल का ? ज्यांनी मोरारजी सरकार पाडले त्यांनी असे केलेले आहे. ते लोक जनता पक्षाच्या तिकिटावर निवडून आले. पक्षबदल करण्यापूर्वी त्यांनी लोकांना विश्वासात घ्यायला हवे होते. चरणसिंगांनी पंतप्रधानपदाची अपेक्षा बाळगण्यात काही चूक नाही. त्यांनी पक्षात त्यासाठी बहुमत मिळवण्याचा प्रयत्न करायला हवा होता. पक्ष फोडून हे पद त्यांनी मिळवणे म्हणजे ज्या आधारावर पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही उभी आहे त्या आधारावरच घाव घालणे होय. अविश्वासाचा ठराव लोकसभेत चर्चेला आलेला आहे. उपपंतप्रधान म्हणून सरकारची बाजू मांडण्यासाठी चरणसिंगांनी पुढे यावे अशी मोरारजींची अपेक्षा आहे आणि हा गृहस्थ खुशाल आजारपणाचे नाटक करतो आणि दोन दिवसांनी पक्षाबाहेर पडतो, याला विश्वासघात नाही तर काय म्हणायचे ? जॉर्जसाहेबांची कोलांटी उडी तर स्तिमित करणारी आहे. अविश्वासाच्या ठरावावर ते सरकारतर्फे जोरदार भाषण करतात. विरोधकांचे सर्व मुद्दे खोडून काढतात. म्हणजे जनता सरकारची २८ महिन्यांची कारकीर्द त्यांच्या मते यशस्वी झालेली असते. या सरकारचा Performance चांगला असतो. मग सरकार अडचणीत आले असताना मंत्रिपदाचा, पक्षाचा राजिनामा तडकाफडकी देण्याचे कारणच काय ? कारण एकच संभवते. येन केन प्रकारेण मोरारजींना सत्तेवरून खाली ओढणे हाच एककलमी कार्यक्रम या मंडळींच्या डोळ्यांसमोर होता आणि सूक्तासूक्त कुठल्याही मार्गाचा अवलंब करण्याची त्यांनी तयारी केलेली होती. मोरारजी कोसळले ते जनता पक्षाचा २८ महिन्यांचा कारभार वाईट होता, हे सरकार अयशस्वी ठरले म्हणून नाही. मोरारजी कोसळले ते दग्याफटक्याचे, विश्वासघाताचे राजकारण खेळले गेले म्हणून ! अशा दग्याफटक्याने, विश्वासघाताने हुकुमशाही राजवटीही टिकू शकत नाहीत. मग परस्परांबद्दलचा विश्वास हाच जिचा मूलाधार आहे अशी लोकशाही राजवट दगलबाजीमुळे २८ महिन्यानंतर कोसळून पडावी यात नवल ते काय ? देश हादरला तो या दगलबाजीमुळे, मोरारजी गेले म्हणून नाही ! मोरारजी शेवटपर्यंत हटत नव्हते त्यालाही कारण हेच होते. 'माझी चूक नसताना मला शासन का ?' असा त्यांचा प्रश्न होता व त्याला कुणाहीजवळ उत्तर नव्हते. ज्यावेळी त्यांच्या हातून शेवटी राष्ट्रपतींना सादर करावयाची यादी तपासून न पहाण्याची एक लहानशी तांत्रिक चूक झाली त्या वेळी क्षणाचाही विलंब न लावता ते बाजूस सरले. अशा व्यक्तीचा राजकीय शेवट अधिक सभ्य व सुसंस्कृत पद्धतीने व्हायला हवा होता. उत्तम प्रशासक म्हणून देशाची त्यांनी थोर सेवा बजावली होती. २८ महिने अत्यंत अस्थिर परिस्थितीत त्यांनी देशाला स्थिर शासन दिले, ही त्यांची कामगिरी नोंद घेण्यासारखी नाही असे कोण म्हणेल ? अशा व्यक्तीला जरा वेगळया प्रकारे निरोप द्यायला हवा होता. झाला हा प्रकार कुणालाच शोभादायक नाही.

## राष्ट्रपतींची गणिते

मोरारजींनी आपल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा दिल्यावरही त्यांना पुन्हा सरकार स्थापन करण्यासाठी बोलावण्यात कुठलेही अनौचित्य किंवा घटनात्मक अडचण नव्हती. कारण मंत्रिमंडळ गेले असले तरी जनता पक्ष हा संसदेतील सर्वाधिक बहुमत असलेला पक्ष होता. (Largest single party) जगजीवनराव, चंद्रशेखर आणि मोरारजी यांची या पक्षाच्या नेतृत्वासंबंधी चढाओढ चालू असली तरी तो पक्षांतर्गत प्रश्न होता आणि अगदी शेवटी तर हा वादही मिटून मोरारजी–जगजीवनराम यांचे ऐक्य झालेही होते; परंतु येन केन प्रकारेण जनता पक्षाला वगळण्याच्या दृष्टीनेच राष्ट्रपतींच्या हालचाली सुरू होत्या असे दिसते. यशवंतराव चव्हाण सरकार स्थापन करू शकणार नाहीत हे दिल्लीतील साधा खासदारही जाणू शकत होता. मग राष्ट्रपतींनी त्यांना बोलावून तीन–चार दिवस वेळ वाया का दवडावा ? त्यांना पाठविलेले निमंत्रणही साधे सरळ नव्हते. त्यात राष्ट्रपतींनी एक मेख मारून ठेवलीच होती. 'explore the possibility of forming a stable govt.' अशी यशवंतरावांकडे सोपवलेली कामगिरी होती. म्हणजे यशवंतरावांनी आटापिटा करून कसेबसे बहुमत तयार करून दाखवले असतेच तर हे राष्ट्रपतीमहोदय त्यावर पुन्हा आक्षेप घेऊन यशवंतरावांना 'नाही' म्हणण्यास मोकळे होतेच. यशवंतरावांनी जमा केलेले बहुमत भक्कम आहे की तकलादू आहे हे ठरवण्याचा संसदेचा अधिकार राष्ट्रपतींनी यामुळे आपल्याकडे घेतला हे, खासदार मावळणकरांचा अपवाद वगळता कुणाच्याही लक्षात आले नाही. यशवंतरावांनी मंत्रिमंडळ बनवण्याची आपली असमर्थता प्रकट केल्यावर चरणसिंगांना बोलावण्याचा प्रश्न येतोच कुठे? विरोधी पक्षनेते म्हणून यशवंतरावांना पहिले निमंत्रण गेले हा घटनात्मक उपचार पाळल्याबद्दल राष्ट्रपतींचे बरेच कौतुक झाले. मग चरणसिंगांना पाचारण करण्यात कुठला उपचार पाळला गेला ? चरणसिंग जनता पक्षातून फुटून निघाल्यावर तसे कुणीच नव्हते. विरोधी पक्ष प्रमुख म्हणून त्यांना रीतसर मान्यताही लाभली नव्हती व स्थिर सरकार स्थापन करू शकण्याइतके निःसंदिग्ध बहुमतही त्यांच्या पाठीशी नव्हते. सगळीकडे जोगवा मागतच ते हिंडत होते आणि शेवटी याद्या राष्ट्रपतींना सादर झाल्या त्या वेळीही त्यांच्या व मोरारजींच्या यादीत संख्येच्या दृष्टीने फार तफावत नव्हती. जर यशवंतरावांना 'सुस्थिर' सरकार हवे अशी अट राष्ट्रपती घालू शकत होते तर केवळ वीस–पंचवीस सभासद अधिक गोळा करणाऱ्या चरणसिंगांवर ते 'स्थिर' सरकार स्थापन करू शकतील असा विश्वास राष्ट्रपती कसे काय टाकू शकले ? वीस–पंचवीस सभासद इकडचे

तिकडे एका रात्रीत होऊ शकतात. अकालींचे पहा. त्यांच्या पाठिंब्याच्या अटी किंवा मागण्या पाहिल्या की हसू आवरणे कठिण व्हावे. काय तर म्हणे केरळला आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, पंजाबला का नको? निरंकारीबाबांच्या पुस्तकावर बंदी हवी. दिल्लीतील कुठलीशी जागा गुरुद्वारासाठी मिळालीच पाहिजे. चंदीगड हवे, वगैरे काळप्रसंग, वेळवखत ओळखण्याचे नाव नाही. यांचे बालहट्ट सुरूच. मोरारजींनी हे बालहट्ट या गडबडीत पुरे करायचे साफ नाकारले. चरणसिंगांनी तयारी दाखवली. अकाली मते चरणसिंगांच्या झोळीत पडली. देवराज अरस यांची कर्नाटकची १०–११ मते, शरद पवार गटाची ६–७ मते अशीच कुठल्याही बाजूला झुकू शकत होती. अगदी ठोस विचारसरणीच्या मार्क्सिस्ट कम्युनिस्ट पक्षालाही निर्णय घेण्यासाठी बैठकांवर बैठकी घ्याव्या लागत होत्या. अशा अस्थिर परिस्थितीत केवळ चरणसिंगांच्या यादीत २०–२५ नावे अधिक आहेत आणि मोरारजींच्या यादीतील २०–२५ नावे ऐनवेळी कमी होत आहेत एवढ्या आधारावर राष्ट्रपतींनी चरणसिंगांना बोलावण्याचे काहीच कारण नव्हते. शेवटी बोलावले पण त्यांच्याही पायात संसदेत विश्वास अजमावून घेण्याचा एक खोडा अडकवून ठेवलाच. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, राष्ट्रपतींना ही अस्थिर परिस्थिती चालू ठेवायची आहे. तसे नसते तर संसदेत सर्वाधिक बहुमत असलेल्या पक्षालाच प्रथम आमंत्रित करून त्यांनी मंत्रिमंडळ बनवण्याची संधी दिली असती. हा सत्तासंघर्ष सुरू होण्यापूर्वीपासूनच सर्व पक्षांनी एकत्र येऊन सरकार चालवावे अशी कल्पना राष्ट्रपती वातावरणात प्रसृत करीत होते. असे एखादे राष्ट्रीय स्वरूपाचे सर्वपक्षीय सरकार अस्तित्वात आले तर राष्ट्रपतिपदाचे महत्त्व वाढेल, खरी सत्ता राबवता येईल असे गणित राष्ट्रपतींच्या डोळ्यांसमोर नसेलच असे सांगवत नाही. शिवाय 'मी कुठल्याही पदावर दोन–अडीच वर्षांपेक्षा अधिक काळ राहत नाही' असे पत्रकारांना सांगून त्यांनी आपल्या मनाचा कल थोडाफार स्पष्ट करून ठेवलेलाच आहे. नानासाहेब गोरे जनता पक्ष फुटू नये, समाजवादी गट अभंग राहावा यासाठी प्रयत्नशील होते. यासाठी ते इंग्लंडहून मुद्दाम आले; राष्ट्रपतींनी याला आक्षेप घेण्याचे कारण काय होते? नानासाहेब हे प्रयत्न खाजगी पद्धतीनेच करत होते. त्यांनी दिल्लीत साधी प्रेस कॉन्फरन्सही बोलावली नाही किंवा मुलाखती देणे, पत्रके काढणे असले जाहीर प्रकारही अवलंबिले नाहीत. जनता पक्ष फुटू नये, देश अराजकाच्या खाईत लोटला जाऊ नये यासाठी नानासाहेबांसारखा नेता जी धावपळ करत होता, तिला वास्तविक राष्ट्रपतींची मूक संमती हवी होती; किमानपक्षी त्यांना याकडे दुर्लक्ष करणे अवघड नव्हते. दिवसाढवळ्या भर रस्त्यात लोकशाहीचा खून पडला होता. अशा वेळी मदतीसाठी धावून आलेल्या एका राजदूताने रस्ता ओलांडताना बारीकशी चूक केली समजा, तरी ती दाखवून देण्याची ही वेळ नव्हती; पण राष्ट्रपतींना जनता पक्ष एकसंध राहून स्थिर सरकार यावे असे मनापासून वाटतच नसेल तर? स्थिर शासनाचा पर्याय अस्तित्वात येणारच नाही अशा रीतीने राष्ट्रपतींच्या हालचाली सुरुवातीपासून चालू असाव्यात अशी शंका अगदीच बिनबुडाची म्हणता येत नाही. राजधानीत अनेकांनी ती व्यक्तही केलेली आहे. स्थिरता हवी म्हणत म्हणत त्यांनी अस्थिरतेला जवळ केले. सर्वांत कमजोर म्हणून अस्थिर म्हणजे यशवंतराव चव्हाणांचा पक्ष. त्यांना त्यामुळेच आमंत्रणाचा पहिला मान लाभला. दुसरा मान चरणसिंगांना, कारण चव्हाणांपेक्षा ते थोडे अधिक मजबूत. या उलटया गणिताने जनता पक्षाचा क्रम शेवटी लागणार व तोही अगदी नाइलाज झाला तरच लावला जाणार हे अगदी उघड आहे. कारण त्याशिवाय राष्ट्रपती हे राज्यपदी कसे होऊ शकणार?

## जनता + काँग्रेस (स्व.) युती

राजीनामा दिल्याबरोबर मोरारजींनी चव्हाणांना निरोप पाठवला होता असे म्हणतात. मोरारजी–चव्हाण म्हणजे जनता–काँग्रेस (स्वर्णसिंग) सरकार हा मोरारजींनी सुचवलेला पर्याय वाईट नव्हता. विसंगत दिसले असते. कारण चव्हाणांवर असा आक्षेप येऊ शकत होता, की ज्या सरकाराविरुद्ध त्यांनी अविश्वासाचा ठराव मांडला, ज्या सरकारच्या कारभारावर त्यांनी टीका केली त्या सरकारबरोबर एकदम युती करण्यासाठी ते कसे काय तयार होऊ शकतात? दोन मुद्दे येथे लक्षात घ्यायला हवे आहेत. प्लेगचा उंदीर म्हणून चव्हाणांनी ज्या पक्षाची संभावना केली त्या जनतापक्षाशी महाराष्ट्रापुरते सहकार्य घडवून आणण्यात त्यांनी पुढाकार घेतलाच होता ना? मग केंद्रातही अस्थिरतेचा धोका टाळण्यासाठी त्यांनी हे धोरण स्वीकारण्यास हरकत नव्हती. फरक एक होता आणि तो निर्णायक ठरला असावा. काँग्रेस महाराष्ट्रात अल्पसंख्य असूनही तिला येथे जे अप्रमाण महत्त्व मिळू शकले, जनतापक्ष बहुमतात असूनही येथे या पक्षाला ज्या दुय्यम स्थानावर ठेवता आले, तसा प्रकार दिल्लीत घडू शकला नसता. जनता पक्ष तेथे पहिल्या क्रमांकाच्या स्थानावर अढळ राहिला असता व चव्हाण–काँग्रेसला दुय्यम भूमिकेवर समाधान मानावे लागले असते. दुसरा मुद्दा असा, की मोरारजींशी युती नाकारून व चरणसिंगांशी जुळवून घेऊन तरी चव्हाणांनी विसंगती पूर्णपणे टाळली असे कसे म्हणता येईल? ज्या सरकारविरुद्ध चव्हाणांनी अविश्वासाचा ठराव मांडला त्या सरकारचेच चरणसिंग हे प्रमुख घटक होते. त्यांनी जनता पक्ष सोडला तरी नवीन पक्षाचे नाव जनता (एस्.) असेच ठेवले. म्हणजे चव्हाणांनी जनता पक्षाशीच शेवटी युती केली, फक्त मोरारजी गटाऐवजी चरणगट निवडला. स्थिरतेऐवजी अस्थिरता पत्करली. कारण अस्थिरतेत अनेक शक्यता दडून राहिलेल्या असतात असा त्यांचा हिशोब असावा. मुख्य मुद्दा विसंगतीचा दोष काहीही केले तरी टळत नव्हता हा आहे. शिवाय इंदिरा गांधींच्या पक्षाला आज जे अचानक आणि असाधारण महत्त्व प्राप्त झाले ते झाले नसते,

मलपृष्ठ २ वर

# संध्याकाळचे पुणे

## ॥ श्रावणमासी हर्ष मानसी ॥

दि. बा. मोकाशी

आजचे 'संध्याकाळचे पुणे' मी आमच्याच घरात म्हणजे सदाशिव पेठ, घ. नं. १८५६, खजिना महाल बोळ, पुणे ३० येथेच काढावयाचे ठरविले.

याला कारण पाऊस पडत होता व सर्व कार्यक्रमांवर बोळा फिरला होता. अर्थात कार्यक्रम करणारे लोक भरपूर चिवट असतात. एक श्रोता असला तरी ते कार्यक्रम पुरा पाडतात. त्यांच्या चिकाटीबद्दल आणि कर्तव्यबुद्धीबद्दल आदर असूनही आणि ज्या सांस्कृतिक जीवनाला मी सर्वांत जास्त महत्त्व देतो ते समृद्ध होईल असे त्यांचे विषय असताही मी घरी बसलो त्याबद्दल मी त्यांची क्षमा मागतो. यंदा पावसानं दडी मारली होती आणि भय उत्पन्न केले होते; पण आता तो असा थबथबून सुरू झाल्यावर त्याच्या गार ओलाव्याचा आनंद घेत मला घरी बसावेसे वाटले.

मास व ऋतु आपापली कामे निष्ठेने करून जात असता एखादे वर्षी त्यांच्या अंगात येते. तसे यंदा झाले. त्यांच्यात पक्षांतर, सत्तालोभ, लाचलुचपत, बैठा संप वगैरे सुरू झाले. आषाढ वैशाखात आला व वैशाख आषाढात गेला का ते विचारावयाची सोय नाही. आषाढात उन्हाळ्याने बेजार केले. 'आषाढस्य प्रथम दिवसे' वगैरे मेघदूतातील वर्णने, कालिदासाच्या थापा वाटू लागली. वाटले की आजचे लेखक स्वतः गेले नाहीत अशा स्थळांची वर्णने करतात तसे या कालिदासाने केले. काही वर्षांपूर्वी मुंबईहून खूप दूर राहणाऱ्या एका लेखकाने, आपली कथानायिका मुंबईस धाडली. त्याच्या मनात तिचं खूप काही करावं असं होतं. तिच्यावर नाना प्रसंग आणावेत, तिला खलनायक भेटावा व नायकही भेटावा. प्रथम तिला खलनायकाचा मोह पडावा. मग— मी सगळे कथानक सांगून टाकत नाही. मुख्य मुद्दा हा की त्याची नायिका मुंबईत आल्यावर, हिंडवीत हिंडवीत तिला लेखकाने धोबीतलावावर नेली. तेथे धोबीतलावाचा प्रचंड विस्तार पहात ती थक्क झाल्याचे त्याने लिहिले. तलावात महानदीसारख्या लाटा उसळत होत्या. तलावाच्या विस्तीर्ण घाटावर मुंबईकर स्त्री-पुरुषांनी स्नानासाठी गर्दी केली होती. घाटाच्या एका भागात धोबी कपडे धूत होते. मोठमोठ्या दोऱ्या लावून त्यांनी कपडे वाळत घातले होते. इत्यादी.

आता पुष्कळांनीच मुंबई पाहिलेली नसल्यामुळे धोबीतलावावरची ही प्रेमकथा अनेकांना आवडली. काय सांगू! मुंबईच्याही काही वाचकांना आवडली. लेखकाच्या 'धोबीतलावाकडे' त्यांनी दुर्लक्ष केले. तुमच्या कथेत जोपर्यंत रसनिष्पत्ती होते तोपर्यंत वाचक काही शंका घेत नाहीत, हेच शेवटी खरे.

◻

या वर्षी कांदेनवमीची भजी खाऊन आमच्या बाजूने आम्ही चातुर्मासाला आरंभ केला; पण आषाढ संपला तरी पावसाने आरंभ केला नाही. दुष्काळी भागातील पुढारी, दुष्काळी भागासाठी सरकारने योजना काढाव्या अशा मागण्या करू लागले. कुठे शंकराच्या पिंडीवर संततधार सुरू झाली. कर्केत गुरू आहे तेव्हा यंदा काही झाले तरी पाऊस होईल असे ज्योतिषी सांगू लागले. हवामानखाते दरवर्षीप्रमाणे लोकांची टिंगल सहन करीत 'आकाश ढगाळ राहील' वगैरे अंदाज वर्तवतच होते.

अशी स्थिती असली तरी, राजे राज्य करतात म्हणून राज्ये चालतात असे नाही, तर लोक आपापली कामे करीत राहतात म्हणून राज्ये चालतात या प्राचीन तत्त्वाप्रमाणे जरी ऋतु स्वैर झाले तरी लोक आपापली कामे करीत होतेच. आषाढी एकादशी लोकांनी केली. ज्यांना पालखीबरोबर जावयाचे होते ते ऋतुराजाची पर्वा न करता आधीच गेले होते. ऋतूकडे व राजाकडे दुर्लक्ष केले की ते ताळ्यावर येतात, असे त्यांचे मत हाते. पुण्याच्या देवळादेवळांतून कथा, प्रवचने, पूजा सुरू झाल्या. काही ठिकाणी श्रावणींच्या प्रटचा लागल्या. तरुण मुले दाढ्या वाढवू लागली, श्रावणातील फुटाण्यांसाठी भट्ट्यांतून फुटाण्यांचे उत्पादन जोरात सुरू झाले. रस्तोरस्ती लहान

मुले जिवत्यांचे कागद विकू लागली आणि एके दिवशी पहाटे केंद्रावर दुधाला गेलो असता, डोक्यावर टोपल्या घेतलेली बाया-मुले 'आघाडा दुर्वा फुले' ओरडत अंगा-वरून धावत जाऊ लागली तेव्हा लक्षात आलं, श्रावण उजाडला.

पुण्यात अजून या गोष्टी चालू आहेत हे वाचून काही जण कपाळावर हात मारतील; पण या गोष्टींना पर्याय अशा दुसऱ्या गोष्टी जोपर्यंत कुणी देत नाही तोपर्यंत या चालू ठेवण्यास माझी हरकत नाही. आता बाहेरील पावसाकडे घरातल्या उबेतून पहात असता श्रावण महिना हळुवार भावना घेऊन माझ्या मनात दरवळतो आहे. त्यालाही माझी हरकत नाही. श्रावण महिन्यातील फुलं आठवून मी 'दरवळतो' हा शब्द वापरला आहे.

□

मी असा हळुवार झालो असता माझ्या डोळ्यांपुढील पुण्यातील संध्याकाळ जाऊन श्रावणातील आमच्या गावची संध्याकाळ दिसू लागली. तुम्ही पावसामुळे माझ्याच-सारखे घरी बसला असाल तर तुम्हीही माझ्याबरोबर तुमच्या गावच्या आठवणी करू लागा. चला.

स्थळ—आमचे खेडेगाव. माझ्या बहिणीचा पहिला मंगळवार आहे. घरात केव्हापासून मंगळागौरीची जोरात तयारी चालू होती. आज गौर, गौरीसाठी पत्री, फुले, दूर्वा व गौर रचण्यासाठी गौरीची फुले व कमळे आणावयाचे काम आम्हा मुलांवर सोपवले आहे. तळ्यात शिरून कमळे काढण्यास आमच्याबरोबर गडी देण्यात आला आहे. आम्हाला तळ्यात उतरवू द्यावयाचे नाही असे आईने गड्यास बजावले आहे. आम्ही सर्व तळ्याकडे जात असता प्राजक्तीच्या झाडाखाली लाल देठांच्या पांढऱ्या शुभ्र फुलांचा सडा दिसतो आहे. पावसाची सर पडून सर्व ठिवकते आहे. चाफे पांढऱ्या फुलांनी मोहरले आहेत. शेवंती फुलली आहे. अबोली फुलली आहे. गोकर्णीची फुले वयातूनही दिसत आहेत. कर्दळीच्या शेंदरी फुलांचा रंग डोळ्यांत भरतो आहे. भेंडीवर पिवळी फुले हलत आहेत. दूर्वांचे जागोजागी रान झाले आहे. तळ्यावरून येताना आम्ही ही फुले खुडणार आहोत.

आम्ही तळ्यावर पोहोचलो आहोत. तळ्याचा पृष्ठभाग उन्मलित आणि अर्धो-न्मलित, कमळांनी झाकला आहे. त्या कमळांत, पांढरे, तांबडे, निळसर शिडकावे आहेत. कमळांच्या गर्दीतून वाट काढीत बदके जात आहेत. त्यांचे पाय हलताना दिसत नसल्याने त्यांचे सरकणे जादूचे वाटते आहे. त्यातले एखादे झरदिशी बुडी मारते. ते किती दूरवर येणार, कुठे वर येणार हे पहात आमचे डोळे फिरतात आणि अन-पेक्षित ठिकाणी ते वर येते. पडून गेलेल्या पावसाचे थेंब कपाळावर चकाकत आहेत. गडी तळ्यात उतरून कमळे खुडीत असता आम्ही चपटे दगड फेकून तळ्याच्या पृष्ठ-भागावर भाकऱ्या करीत आहोत.

कमळांचा व गौरीच्या फुलांचा भारा घेऊन गडी घराकडे गेल्यावर आम्ही आमच्या परड्या सरसावून पूजेची पत्री, फुले गोळा करण्याच्या मागे लागलो. जिथे हात घालावा तिथे पत्री होती, फुले होती, दूर्वा होत्या. कुणाच्याही परसूंत शिरून ओरडावं. 'काकू! फुलं नेतो हं!' ते विचारणंसुद्धा, घरातल्या आमच्या वयाच्या मुलाला आम्ही आलो हे कळावं म्हणून. आमची हाक जाताच घरातला मुलगा बाहेर येऊन आम्हाला पत्री-फुलं खुडू लागला आहे.

प्राजक्तीच्या झाडाखाली खालचा चिखल झाकून फुलांचा सडा पडला आहे. आम्ही नाजूक बोटांनी फुले उचलून परडीत टाकीत आहोत. चहूकडे फुलांचा सुगंध दरवळला आहे. मधूनच सर येऊन तो सुगंध धुऊन नेण्याचा यत्न करते; पण सर निघून जाते तरी सुगंध राहतो. प्राजक्तीच्या फुलांची देठं मेंदी लावून जन्माला येतात, इतकी नारिंगी लाल दिसतात!

प्राजक्तीची फुले वेचून आम्ही नागचाफ्या-कडे वळलो आहोत. नागचाफा आणि आंबा यांची पानं घेऊन, त्यांचे गाय-बैल करून आम्ही खेळत असू. चाफा फुलांनी पांढरा झाला आहे. चाफ्याच्या फांद्या फार नाजुक म्हणून आम्ही आमच्यापैकी काटकुळ्या मुलाला वर चढवलं आहे. तो गुच्छच्या गुच्छ खाली टाकीत आहे व आम्ही वेचीत आहोत. फांदी खुडा-फूल खुडा दुधाचे थेंब बाहेर येतात ते आम्ही बोटाने पुसतो. चाफ्याच्या फुलांतला गर्द पिवळा रंग मला फार आवडतो. चाफ्याच्या फुलांनी केवढ्यात परडी भरते! आम्ही तेथून बकुळीकडे जात आहोत. या दिवसांत बकुळीला फुले नसतात हे आमच्या लक्षात नाही. आम्हाला वसंतातल्या बकुळीची आठवण आहे. आतून बाहेर येणारी काळी मुंगी फुंकराने उडवून उन्हाळ्यात बकुळीच्या फुलांतील मध आम्ही चोखला होता आणि बकुळीची पिवळी गोड फळे खाल्ली होती.

तुमचं लक्ष आहे ना? की तुम्ही माझ्याच-सारखे तुमच्या आठवणीतल्या फुलांत गुंगला आहात? तसे असेल तर तुम्ही तुमची फुले आठवा, मी माझी फुले आठवतो. तुम्हाला फुले आठवत नसली तर मंगळागौरीच्या आरतीत ती आहेत. ती आरती म्हणून पहा. स्त्रियांची म्हणायची आरती म्हणून कमीपणा मानू नका. तुम्हाला आठवत नसली तर मी म्हणून दाखवतो. ऐका—

॥ जयदेवी मंगळागौरी ॥ पूजेला ग आणिली। जाईच्या कळ्या। सोळा तिकटी सोळा दुरवा। सोळा परीची पत्री। जाईजुई आबुल्या। शेवंती नागचाफे। पारिजातके मनोहर। गोकर्ण महाफुले। नंदेटे तगरे। पूजेलागि आणिली। जयदेवी॥

□

बहिणीच्या मंगळागौरीला त्या दिवशी खूप मुली जमल्या होत्या. सकाळपासून घर हसण्यांनी आणि बोलण्यांनी निनादले होते. गौरीच्या फुलांनी व कमळांनी गळ्याइतकी

उंच गौर रचली होती. वर केवड्याचा सोन्याहून पिवळा नाग करून बसवला होता. चौरंगावर उंच समई व फुलांच्या माळा लावल्या होत्या—आम्ही आणलेल्या फुलांच्या. इतकी श्रीमंत सुंदर गौर राजवाड्यातही मांडली नसेल.

पूजा, आरती झाली. मुलींचे फराळ झाले. आज खालच्या घरात स्त्रीराज्य होतं. आम्हा मुलांना फक्त मुभा होती. काही जड काम असले तर पुरुषांना बोलावणं जात होतं. स्त्रियांनी नवी लुगडी व अलंकार घातले होते. प्रत्येकीचा तळहात व पाय मेंदीनं लाल होते. मला प्राजक्तीच्या फुलांची देठं आठवली. मेंदी लावलेले तळहात व बोटे कमळासारखी वाटतात म्हणून त्यांना कर-कमळे म्हणत असावेत.

रात्रीची जेवणे होताच वयस्कर पुरुष माडीवर झोपायला गेले. तरुण मंडळी पत्ते खेळण्यास गावात गेली. आम्ही मुलं माज-घराच्या बाजूला मंगळागौरीचे खेळ पहाण्या-साठी बसलो. प्रथम लहान मुलींनी फुगड्या-झिम्म्यांनी आरंभ केला. त्या आम्हा मुलांना बोलावू लागल्या तेव्हा आम्ही लाजलो. हळू-हळू मोठ्या मुली व स्त्रिया भाग घेऊ लागल्या. मंगळागौरीला रंग भरू लागला. फुगड्यांची पावले दाणदाण वाजू लागली. पकवे घुमू लागले. खेळ सुरू झाले, 'नाच ग घुमा! कशी मी नाचू?' किंवा 'खुर्ची की मिर्ची! जाशील कशी?' किंवा 'इस बाई इस—दोडका किस!' पिंगे घुमू लागले, गाठोडी फिरू लागली. त्या वेळी त्यांची अंगे जी लवत होती, वळत होती, वाकत होती त्याचे तेव्हाही नवल वाटत होते. आता तर फारच वाटतंय. आता खेळणाऱ्या स्त्रिया फार थोड्या उरल्या आहेत. पुष्कळजणी मंगळागौरीचे जागरण टाळतात. हल्ली मुलींची वजनं फार लौकर वाढून स्थूलता येते हे त्याचे कारण असावे. उभ्याने स्वयं-पाक, जेवणाची टेबले, बटण दाबताच वीज व नळाचे पाणी ही त्याची कारणे आहेत. निदान प्रकृतीसाठी स्त्रियांनी मंगळागौरीचे खेळ टाळू नयेत. आठवड्यातून एकदा तरी हे खेळ खेळण्याची मंगळागौर-मंडळे काढावीत.

त्या रात्री मंगळागौर ऐन रंगात आली असता माझ्या बहिणीचे पोट दुखू लागले. अगदी कळवळून कळवळून पोट दाबून रडू लागली, कण्हू लागली, लोळण घेऊ लागली. माझा मोठा भाऊ नुकताच डॉक्टर झाला होता. तो माडीवर झोपला होता. त्याला उठवून आणले. कुठे दुखताय्, खेळताना झालं का काही, असं विचारीत त्याने तिला तपासले. एक—दोन औषधे दिली. मग पोटावर लावायला काही तरी उगाळायला सांगितले. तिचे कण्हणे व रडणे थांबेना. असा अर्धा तास गोंधळ चालू होता. माझा भाऊ पुन्हा औषध आणायला वर जाऊ लागला. तो जिन्यावर दोन पायऱ्या गेला आणि माझी बहीण पोट धरून हसत उठली. ती मोठ्ठी थट्टेखोर होती. आता ती नाही.

□

सांगावयाचा मुद्दा, श्रावण महिना असा थट्टेखोरही होता. त्या महिन्यात दुर्मुखलेला माणूसही हसरा बनावा. बाहेर झाडांवर हिंदोळे हेलकावत आहेत, नागपंचमीचे नाग डुलत आहेत, मधेच ऊन, मधेच पाऊस पाडून निसर्गही खेळतो आहे. फुलझाडे खिदळत आहेत आणि त्या आठवणींनी मनही खिदळत आहेत. गोड गळ्यांतील गाण्यांनी वातावर-णात मधुर कंप उमटत आहेत. गोविंदा गोविंदा ओरडत दहीअंडी आली आहे.

त्या वेळी सारे जग पाने—फळे—फुले यांचे होते. फुलबाग— फळबाग वेगळी अशी नव्हती. घरातून बाहेर पडले की, परसूपासून समो-रच्या टेकडीपर्यंत फुलबाग आणि मळाच. मुद्दाम कोरकोरून बागा लावण्याची आवश्यकताच नव्हती. तेव्हा प्रत्येक फूल, पान आणि फळ पवित्र होते. पांढरे फूल आणि बेल शंकराचा लाडका, विठ्ठल व विष्णू यांना मंजिऱ्या व तुळस प्रिय. रामाला दवणा हवासा. कृष्णाला वैजयंती तर गणपतीला दूर्वा— लाल फूल किंवा केवडा. केव्हाही फुलाला पाय लागला की, आम्ही नकळत चटकन नमस्कार करायचो.

देवाच्या निमित्ताने म्हणा आम्ही फळा-फुलांची, निसर्गाची जोपासना करीत होतो. दुसऱ्या महायुद्धाने हा सारा निसर्ग ओरबाडून नेला आणि नंतरच्या वर्षांतही तेच झाले. शहरे वाढू लागली. खेड्यांत जे जे पिके ते शहराकडे जाऊ लागले. आंबे, कलिंगडे, पेरू, चिंचा पाडाला असताना लॉरीतून शहराचा रस्ता धरू लागल्या. फळांबरोबर फळांच्या बिया शहरात गेल्या. खेड्यांतून नवी झाडे उगवणे थांबले. माजगावकरांबरोबरच्या पद-यात्रेत एका शेतकऱ्याने हीच तक्रार आमच्याशी केली, ती अगदी रास्त होती. मला आठवते की, श्रावण महिना लागला की, वयावयातून आंबे, चिंचा, पेरू यांची रोपे उगवत. आम्ही गेल्या वर्षी खाऊन टाकलेल्या कोयी व चिंचा यांची ती रोपे असत. मग त्यातली निसर्ग-नियमाने काही वाढत, काही मरून जात. सुट्टीत घरी आले की कळे अरे, हा नवा आंबा आला. जुना आंबा किडेपर्यंत नवा आंबा त्याची जागा घेई. झाड कधी कमी होत नसे.

आत्ता मी शहरातल्या श्रावणात घरात बसून खेड्यांतील श्रावणाची आठवण करीत असता झाल्या गोष्टींबद्दल मला फार वाईट वाटत आहे. आम्ही शहरांकडे का धावलो? आम्ही उद्योगधंद्यापायी वेडे का झालो? चैनीच्या वस्तू मिळाव्यात म्हणून जे केले त्यात आम्ही खरा श्रावण गमावला. तुम्ही माझ्याचसारखे आठवीत बसला असलात तर तुम्हीही हेच तात्पर्य काढले काय? मला वाटते तुम्ही हेच तात्पर्य काढाल.

# कम्युनिस्ट जग

## पूर्व युरोपात चलनवाढ

वा. दा. रानडे

कम्युनिस्ट अर्थव्यवस्था भांडवलशाहीप्रमाणे खाजगी नफ्यावर आधारलेली नसल्याने चलनवाढ, मंदी, बेकारी हे प्रश्न तेथे निर्माण होत नाहीत असा दावा कम्युनिस्ट करीत असतात; पण तेथेही आता हे प्रश्न जाणवत असून ते सोडविण्यात कम्युनिस्ट अर्थव्यवस्था यशस्वी ठरलेली नाही. भांडवलदारी राष्ट्रांचा प्रचार म्हणून हे प्रश्न उडवून न लावता आपल्या अर्थव्यवस्थेत कोठे काय चुकत आहे याचा मागोवा कम्युनिस्ट अर्थशास्त्रज्ञांनीही घ्यावयास हवा.

मद्रासच्या हिंदूचे लंडनमधील वार्ताहर बटुक गठानी यांनी १ ऑगस्टच्या अंकातील बातमीपत्रात पूर्व युरोपातील चलनवाढी-संबंधी माहिती दिली आहे. चलनवाढ हा केवळ भांडवलदारी राष्ट्रांना जडणारा रोग नसून कम्युनिस्ट राष्ट्रांनाही तो ग्रासू लागला आहे. हंगेरी आणि चेकोस्लोव्हाकिया या पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देशांनी गेल्या महिन्यात अनेक वस्तूंच्या किंमतीत वाढ जाहीर केली. किंमत वास्तव पातळीवर आणण्यासाठी ही वाढ करण्यात आली असे सांगण्यात येत असले तरी चलनवाढीच्या झळीचाच तो परिणाम असल्याची ही अप्रत्यक्ष कबुली आहे. याचा परिणाम पूर्व युरोपातील इतर देशांवर विशेषत: पोलंडवर होईल असा निरीक्षकांचा अंदाज आहे.

रशिया व पूर्व युरोप राष्ट्रांचा आर्थिक गट असून तो 'कॉमेकान' नावाने ओळखला जातो. या गटात हंगेरीचे राहणीमान सर्वात जास्त आहे. त्या देशाने पावाच्या किंमतीत ५० टक्के, मांस ३० टक्के, साखर २३ टक्के, वीज ५० टक्के, हॉटेलदर ३० टक्के, बांधकाम साहित्य २० टक्के याप्रमाणे वाढ केली आहे. मोटारींच्या किंमतीत २० टक्के वाढ झाली असून उपहारगृहातील खाद्यपदार्थांचे दर सिनेमा व नाटकांचे दरही वाढले आहेत. चेकोस्लोव्हाकियामध्ये वीज, गॅस, कोळसा, पेट्रोल यांच्या भावात ५० टक्के वाढ करण्यात आली. पोलंडनेही पेट्रोलच्या किंमतीत वाढ केली आहे.

ही परिस्थिती का निर्माण झाली ? पूर्व युरोपमध्ये भावपातळी खाली होती. याचे एक महत्त्वाचे कारण रशियाकडून त्यांना ऊर्जा व कच्चा माल कमी किंमतीत मिळत असे. जागतिक भाव पातळीच्या मानाने कमी किंमतीत रशिया या गोष्टींचा पुरवठा पूर्व युरोपातील देशांना करी; पण रशियाने आता या वस्तूंच्या किंमती वाढवून त्या जागतिक वास्तव पातळीवर आणण्यास सुरुवात केली आहे आणि रशियन अर्थ-व्यवस्थेवर पूर्व युरोपातील राष्ट्रांची अर्थ-व्यवस्था अवलंबून असल्याने त्यांनाही भाव-वाढ करणे भाग पडत आहे. आपल्याला किंमती वाढवाव्या लागतील आणि जागतिक प्रवाहाशी त्या जुळत्या घ्याव्या लागतील हे पूर्व युरोपातील अर्थशास्त्रज्ञांना मान्य करावे लागत आहे.

पूर्व युरोपातील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचे दृष्टीने चिंतेची दुसरी गोष्ट म्हणजे या राष्ट्रांवर असलेला आंतरराष्ट्रीय कर्जाचा बोजा वाढत आहे. सध्या पाश्चात्य देशांची सरकारे व बँका यांचे चार हजार कोटी डॉलर कर्ज या देशांवर असून ते कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. रशिया आणि अमेरिका यांच्यात तणाव शिथिलतेचे संबंध प्रस्थापित झाल्यावर पूर्व युरोपातील देशांशीही पश्चिम युरोपातील देशांनी तशाच प्रकारचे संबंध प्रस्थापित केले. पाश्चात्य देशांनी पूर्व युरोपातील देशांशी व्यापार करार केले. त्यातून पूर्व युरोपाचा व्यापार पाश्चात्य देशांशी पाच टक्क्यांपेक्षा अधिक वाढला नाही; पण पाश्चात्य देशांचा व्यापार मात्र बराच वाढला.

ग्राहकोपयोगी वस्तू अधिक प्रमाणात आणि चांगल्या दर्जाच्या मिळाल्या पाहिजेत. अशी मागणी पूर्व युरोपातील नागरिक करू लागले आहेत. दर्जाच्या दृष्टीने पाश्चात्य राष्ट्रांच्या तोडीचा माल तयार करण्यासाठी त्यांचे तंत्रज्ञान पूर्व युरोपातील देशांना विकत घ्यावे लागत आहे; पण त्यासाठी जी किंमत द्यावी लागत आहे ती त्यांना परवडण्या-सारखी नाही. या देशातील जनता अनेक वर्षे आर्थिकदृष्टया काटकसरीचे जीवन जगत आली आहे; पण पाश्चात्य देशातील नागरिकांशी आलेल्या संपर्कामुळे आपलेही राहणीमान उंचावले पाहिजे. चांगल्या दर्जाच्या वस्तू आपण वापरल्या पाहिजेत अशा अपेक्षा या जनतेत निर्माण झाल्या आहेत.

कम्युनिस्ट देशातील पाश्चात्य चलन मिळविण्याची ओढही वाढत आहे. पूर्व युरोपला भेट देणारे पाश्चात्य देशांचे प्रवासी यासंबंधीच्या मनोरंजक हकीकती सांगत असतात असे श्री. गठानी यांनी आपल्या बातमीपत्रात म्हटले असून काही उदाहरणेही दिली आहेत. रुमानियामध्ये अमेरिकन सिगा-रेटच्या एक दोन पाकिटाचे बदल्यात तुमच्या गाडीची पेट्रोल टाकी भरून मिळते. जाझ संगीताची ध्वनिमुद्रिका किंवा अमेरिकन जीन्सची एक जुनी जोडी याना ५०० रुपये दिले जातात.

काटकसरीचे जीवन कितीकाळ जगायचे? आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी, चांगले कपडे, चांगल्या दर्जेदार वस्तू वापराव्या ही माणसाची स्वाभाकच प्रवृत्ती आहे. कम्युनिस्ट देशातील नियोजनाचे स्वरूपही हे प्रवाह विचारात घेऊन बदलत आहे. लोखंड-पोला-दासारख्या आधुनिक कारखानदारीसाठी आवश्यक असलेल्या उद्योगांवर प्रथम भर देऊन अर्थरचनेचा पाया भक्कम करावयाचा हे कम्युनिस्ट देशातील योजनाकारांचे धोरण मूलत: चुकीचे आहे असे म्हणता येणार नाही. पण हे पाया रचनेचे कार्य बहुतेक कम्युनिस्ट देशात पूर्ण झाले असून आता ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन वाढवून राहणीमान वाढविणे या टप्प्यातील नियो-जनास त्यांनी सुरुवात केली आहे.

तणावशिथिलतेच्या संबंधामुळे पाश्चात्य देश आणि कम्युनिस्ट देश यांच्यातील संपर्क वाढला. रशिया आणि अमेरिकेस आर्थिक व तांत्रिक सहकार्य वाढविण्याचे करार झाले. पाश्चात्य तंत्रज्ञान आवश्यक असेल ते त्या देशांकडून मिळवायलाच हवे पण याबाबतीत परदेशांवर फार काळ विसंबावे न लागता स्वत:चे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर हवा. रशियाच्या क्रांतीस ६२ वर्षे झाल्या-नंतरही अमेरिकन तंत्रज्ञानाची मदत रशि-याला घ्यावी लागावी तसेच अमेरिकेकडून धान्याची आयात करावी लागावी याचे आश्चर्य वाटते. रशियात यावर्षी धान्य उत्पादनाचे उद्दिष्ट २२ कोटी ७० लाख टन ठरविण्यात आले होते पण प्रत्यक्षात ५ कोट उत्पादन कमी होईल असा अंदाज आहे. याचा अर्थ रशियाला यावर्षीही अमेरिकेकडून धान्य खरेदी करावे लागणार. दीडकोट टन धान्याची मागणी रशिया अमेरिकेकडे करील असा अंदाज आहे. ही मागणी अमेरिका मान्य करील का? अमेरिका व रशिया यांच्यात यासंबंधात आतापर्यंत जे करार झालेले आहेत त्यात वर्षाला जास्तीतजास्त २० लाख टनापेक्षा अधिक धान्य रशियाला निर्यात करावयाचे नाही अशी अट अमेरिकेने स्वत:-वर घातली आहे. ही अट अमेरिका सैल करील का ? अमेरिकेजवळ सध्या सहा कोटी टन धान्य साठा आहे. रशियाला अधिक धान्य देण्याची अमेरिकन शेतकऱ्यांची तयारी आहे. कारण यंदा पीक चांगले येण्याचा संभव दिसत असून रशियाने मोठ्याप्रमाणात खरेदी केली नाही तर धान्य किंमती खाली येतील अशी अमेरिकन शेतकऱ्याला भीती वाटते. हे धान्य देताना काही प्रश्नाचा विशे-षत: अरब-इस्रायल प्रश्नावर रशियाने धोरण बदलावे असे दडपण आणण्याचा अमेरिकेचा प्रयत्न राहील असे दिसते. ☐

बिंदुकथा

# निर्वाणी

बिंदुसार

सी. एस. के. हॉस्पिटलच्या मुख्य हॉलमध्ये नेहमीची वर्दळ चालू होती. सुपरिटेंडेंट-साहेब, कोपऱ्यातल्या आपल्या केबिनवजा जागेत बसून कामाची व्यवस्था पाहण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत होते. ड्यूटीचार्टवर नजर फिरवीत गैरहजर लोकांच्या कामाची काय व्यवस्था करावी याची ते चीफ मेट्रनबरोबर चर्चा करीत असताना कसल्या तरी गलक्याने त्यांच्या चर्चेत व्यत्यय आला.

केबिनमध्ये चार–पाच माणसे घुसली होती. त्यांपैकी दोघांनी पांघरुणात गुंडाळलेले एक मोटले जमिनीवर ठेवले. वयस्क दिसणाऱ्या एका फेटेवाल्याने साहेबांना रामराम घातला आणि तो म्हणाला, ' साहेब, पेशंटला घालायचंय दवाखान्यात. '

ड्यूटीचार्ट टेबलावर ठेवीत सुपरिटेंडेंट म्हणाले, ' आज जागा नाही. सर्व जागा फुल आहेत. ' त्यांच्या या वाक्याबरोबर आलेल्या माणसात एकच गदारोळ उडाला.

सारेजण एकदम बोलू लागले. त्या घोळक्यात एक-दोन बाया होत्या. त्याही जोरजोरात बोलू लागल्या. त्यांच्यातील एकजण इतरांना गप्प करण्याचा प्रयत्न करीत होता.

साहेबांनी त्यांना गप्प करण्याचा प्रयत्न केला; पण बोलण्याचा गोंधळ चालूच राहिला. त्या साऱ्या गोंधळातून साहेबांना अर्धवट बोध झाला तो असा– ही कोणी खेडेगावातली मंडळी होती. जमिनीवरच्या मोटल्यामध्ये त्यांच्यापैकी एकाची कारभारीण होती. महिन्यापूर्वी या बाईला कसेसेच होऊ लागले होते. झोप येईनाशी झाली. जेवण-खाण तुटले. हातपाय हलविण्याचीदेखील उमका राहिली नाही.

घरच्या लोकांनी गावातल्या मांत्रिकाकडून दैवी उपचार सुरू केले. त्याने बरेच गंडेदोरे केले. कोंबडे मारले. गावच्या देवाला कौल लावले; पण बाईची तब्येत जास्तच बिघडली.

शेवटी आज सकाळपासून बाईचे शरीर थंड पडू लागले. हातापायाच्या नाड्या लागेनात. तेव्हा तिला बैलगाडीत घालून मंडळी शहरात आली. शहरातल्या एका पाव्हण्याने सांगितले म्हणून तिला घेऊन सगळे या हॉस्पिटलात आले होते.

पुरेसा गलका–गोंधळ झाल्यावर फेटेवाला पुढे झाला आणि त्याने सुपरिटेंडेंटच्या पायाला हात लावल्याचा आविर्भाव करून गयावया केली–

' काहीही करून पेशंट दाखल करून घ्या साहेब. काहीही फी सांगा– रक्कम आणलीय आम्ही. ' असे बोलत त्याने कमरेचा कसा काढला व उघडून दाखविला.

साहेबांच्या कपाळावर आठ्या उमटल्या. अशा बऱ्याच केसेस त्यांनी पाहिल्या होत्या. अखेरच्या घटका मोजीत असलेल्या पेशंटला घेऊन यायचे आणि दाखल करून घ्यायची गळ घालायची.

मुख्य डॉक्टरना अशा केसेस घेणे पसंत नव्हते. साहेबांनी जमिनीवरच्या पांघरुणातल्या त्या निश्चेष्ट बाईकडे नजर टाकली आणि ते म्हणाले, ' अहो, आमच्याकडे जागा नाही. तुम्ही सरकारी इस्पितळात जा. '

' असं करू नका साहेब– पायजे तर आम्ही थांबतो. तोवर काही तरी दवापाणी करा आम्ही इथंच थांबतो बाहेर. '

सुपरिटेंडेंट तुटकपणे म्हणाले, ' पेशंट अॅडमिट केल्याशिवाय आम्ही औषध देऊ शकत नाही. '

एवढे बोलल्यावरदेखील ती माणसे केबिनच्या दाराशी बसून राहिली. कोणत्याही गोष्टीचा तडकाफडकी शेवट लावण्याचे माहीतच नसल्याने तो घोळका हलक्या आवाजात खल करीत तेथेच बसून राहिला. सुपरिटेंडेंटनी आपले काम सुरू करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचे लक्ष लागत नव्हते.

ही चिवट कटकट कशी मिटवावी हे त्यांना कळेना. टेबलावरचे कागद ते अस्वस्थपणे चाळू लागले.

हॉस्पिटलच्या दुसऱ्या वॉर्डातल्या एका खोलीत कॉटवर एक अस्थिपंजर पुरुष कुशीवर पडला होता. त्याच्या मनगटामध्ये खुपसलेल्या जाड सुईतून त्याच्या शरीरात रक्त पुरवले जात होते.

कॉटशेजारी एका बाकावर बसून एक जाडजूड मध्यमवयीन माणूस शेजारच्या प्रौढ बाईशी हलक्या आवाजात बोलत होता–

' अक्का, अजून तरी माझं ऐक– आज तीन वार झाले, बापूसाहेब या अवस्थेत पडून आहेत. इतकी औषधं, इतक्या तपासण्या, इतक्या सुया यांचा काय उपयोग झाला ? आँ ? काय झाला ? '

उत्तरादाखल त्या बाईंनी कॉटकडे नजर टाकली व तोंडात पदराचा बोळा कोंबून त्या हुंदके देऊ लागल्या. त्यांचे शरीर गदगदू लागले.

घसा साफ करीत तो माणूस पुढे समजूत घालू लागला, ' माझं ऐक. बापूसाहेबांना येथून घेऊन जाऊ आणि महाराजांच्या पायावर घालू. त्यांना सांगू आता मारा किंवा तारा– अग, महाराज म्हणजे प्रत्यक्ष श्री–गुरुदत्ताचा अवतार ! परवा त्यांचा नुसता अंगारा लावला तर चमत्कार पाहिलास ना तू ? बापूसाहेबांनी डोळे उघडून पाहिलं की नाही ?'

त्याचवेळी एक तरुण मुलगा खोलीत आला आणि मूकपणे उभा राहिला. त्याला उद्देशून तो प्रौढ माणूस तेच बोलू लागला. त्या मुलाच्या हातापायाला कंप सुटला. आईकडे एक असहाय्य दृष्टिक्षेप टाकून तो बोलला ' मामा, आता या अवस्थेत बाबांना हलवणार तरी कसं ?'

तो प्रौढ माणूस हात जोडून, डोळे मिटत बोलला, ' बाळा, ती सर्व काळजी महाराजांना– आपण फक्त त्यांच्या पायी लोळण घ्यायची. मग काय अक्का ? काय ठरलं तुमचं ?'

मायलेकांची परत अस्थिर दृष्टादृष्ट झाली. त्यांची संमती गृहीत धरून मामा उठले आणि खोलीबाहेर पडले.

मामांचे बोलणे ऐकून सुपरिटेंडेंट विस्मयचकित झाले. जोरजोरात मान हलवत ते म्हणाले

' साहेब, तुमचा पेशंट ' डेंजरसलि इल ' आहे. त्याला हलवण्याची परवानगी मी देऊ शकत नाही ! '

मामांनी कीव केल्याच्या दृष्टीने सुपरिटेंडेंटकडे पाहिले. एक-दोनदा हाताचा पंजा खालीवर करीत ते म्हणाले,

' पण आम्ही लिहून देतो ना– की बुवा आमच्या जबाबदारीवर आम्ही पेशंटला इथून नेत आहोत–मग तुमची काय हरकत आहे ?'

हताशपणे सुपरिटेंडेंटनी मान हलवली व ते थकलेल्या स्वरात म्हणाले, ' तुमचा हा दुराग्रह आहे ! साहेब आमच्या प्रोफेशनचं हसं होईल तुमच्या या नाचानाचीमुळं– माझं ऐका– आणि जे उपचार चाललेयत ते चालू द्या. उद्या कॅन्सरस्पेशालिस्ट डॉ. जेसावाला येणार आहेत ते करतील काही इंप्रुव्हमेंट. '

मामा जरा चिरडीला आले आणि तोडून टाकीत म्हणाले,

' तुमचं बिल किती आहे ते सांगा पाहू– आम्ही ताबडतोब देऊन टाकतो. महाराज वाट पहात असतील आमची ! '

यावर बोलणेच खुंटल्याप्रमाणे सुपरिटेंडेंटनी चीफ मेट्रनला योग्य त्या सूचना दिल्या. डोळे विस्फारून बघत चीफ मेट्रन वॉर्डकडे निघाली.

विजयी मुद्रेने मामाही तिच्या मागोमाग निघाले ' सद्गुरु–सद्गुरु ' असा घोष ते मंद स्वरात करीत होते.

विमनस्कपणे सुपरिटेंडेंटसाहेबांनी इकडे पाहिले. मग काही तरी आठवण होऊन त्यांनी बेल वाजवली.

बाहेर बसलेल्या घोळक्यातला मघाचा फेटेवाला हात जोडून टेबलापाशी आला. साहेब त्याला म्हणाले,

' पाव्हणे, तुम्ही सुदैवी दिसता. अर्ध्या एक तासात तुमच्या पेशंटला अॅडमिट करून घेऊ. बसा जरा हं ! ' ❑

# मुस्लिम सत्यशोधक : एक शिबिर

प्रा. वसंत कोकजे, नेरळ

चेहऱ्यावर ऊन फुललेला, उंचापुरा, सावळा असा तरुण माझ्या घरी दत्त म्हणून उभा राहिला. त्याच्या खांद्यावर शबनम पिशवी लटकत होती.

'मी हुसेन जमादार. कुलसमबेननी पाठवलं आहे.'

तो अदबीनं बसला. पिशवीतून एक 'आंतर भारती 'चं छापील पत्रक त्यानं मला दिलं. 'मुस्लिम सत्यशोधक 'चे कार्यकर्ते व 'आंतर भारती ' यांच्यातर्फे फक्त मुस्लिम तरुण–तरुणींसाठी एक अभ्यासशिबिर नेरळजवळील मालेगावच्या रम्य परिसरात प्रा. गुंजीकर यांचे बागेत भरणार होते. त्या शिबिराबद्दल ते पत्रक होते.

शिबिराचा दिवस. काळयाशार डांबरी रस्त्यावरून भर दुपारचा मी झपझप चालत होतो. वर स्वच्छ निळे आभाळ होते. पांढरे भुरके तुरळक ढग कुठे पांगलेले दिसत होते. पळसाची वर्तुळाकार गोंडस झुडुपं आणि करवंदीच्या हिरव्याकंच जाळ्या मागं पडत होत्या. मनानं ललकारी दिली. 'शिबिरार्थींनी मंडप फुलला असेल. व्यासपीठावर महनीय प्रवक्ते विराजमान झाले असतील. चर्चा रंगली असेल! आपली ती खमंग बौद्धिक मेजवानी बहुधा हुकणार तर!'

धनेश्वरबागेच्या एका झुबकेदार झाडाखाली क्षणभर थांबलो. दूरवर उल्हासचे पाणी चमकत होते. थोड्याच वेळात प्रा. गुंजीकरांच्या बागेपाशी येऊन ठेपलो; पण मंडप कुठेच दिसेना! शिबिरार्थींच्या ऐवजी कुत्र्यांनी भुंकून स्वागत केलं!

एका ओटहाउसवजा चाळीच्या खोलीत एका जाजमावर पाच-सहा कार्यकर्ते बसलेले होते. चार-दोन स्त्रिया येरझारा घालीत होत्या. त्या कार्यकर्त्यांच्या (जे संख्येने अत्यल्प असले तरी महाराष्ट्राच्या सर्व भागातले होते.) कोंडाळ्यात मी बसलो. न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, यदुनाथ थत्ते इ. मान्यवर भेट देऊन गेल्याचं कळलं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे नेरळ परिसरातल्या मुस्लिम समाजातल्या कुणीही शिबिरात भाग घेतला नाही! त्यांच्या व्यथा बोलून दाखविणारा मी होतो; एक हिंदू! मुस्लिम स्त्रिया, विशेषतः प्रौढ कुमारिका यांची मानसिक कोंडी मी कथन केली. एक कार्यकर्ता उद्गारला, 'मुसलमानांची गरीबी हे कारण आहे.' प्रा. कुलसमबेन उद्गारल्या, 'हे खोटे आहे. या भागातले बरेच सधन आहेत. खानदानाचा गर्व व धर्मवेड यामुळे तो प्रश्न निर्माण झाला आहे.' त्या पुढे उद्गारल्या, 'उन्होंने किसीके साथ भाग जाना चाहिये!'

एक उसळत्या रक्ताचा तरुण परखडपणे बोलत होता. कदाचित मुळमुळीत चर्चा जरा गरम व्हावी अशी त्याची इच्छा असावी. तो म्हणाला, 'आम्ही मुस्लिम भारतात असुरक्षित आहोत. संघस्थानादरून जाताना आम्हाला भीती वाटते!' श्री. बाबूमिया बँडवाले गरजले, 'हे खोटे आहे. आम्हाला कसलीच भीती वाटत नाही!'

'हिंदू क्रिकेटपटू वा खेळाडूंचे अवास्तव कौतुक केले जाते. पाकच्या खेळाडूंचें कुणी केले नाही!' एक संतप्त तरुण.

मग प्रा. गुंजीकर उसळलेच. 'हा आरोप साफ खोटा आहे. मुंबईत हॉकीच्या सामन्याचे वेळी पाकच्या खेळाडूंचा जनतेने केलेला प्रचंड जयजयकार मी डोळ्यांनी पाहिला आहे! आमच्या टीममध्ये किरमाणी आहे. पाकच्या टीममध्ये कुणी अल्पसंख्य जमातीतला आहे काय?'

'बिहारमध्ये गफूर मुख्यमंत्री झाले. राजस्थानमध्ये बर्कतुल्लाखान झाले. मग काश्मीरला अजून हिंदू मुख्यमंत्री का लाभला नाही?' माझ्या या युक्तिवादावर तो तरुण निरुत्तर होतो.

तो दुसरा मुद्दा मांडतो. 'सुधारणा म्हणजे हिंदुपद्धतींचे अकनुरण असे या सत्यशोधकांचे समीकरण बनले आहे. एखाद्या कवीने हिंदूंचे मंडन केले की तो केवढा मोठा!' त्याचा मुद्दा संपतो.

'सुधारणा ही धर्मविरोधी असते' असे दोन्ही समाजातले धर्मनिष्ठ मानीत आलेले आहेत. हिंदूंचे अनुकरण करायला हिंदूही कुठे पुरेसा सुधारलाय्? सुशिक्षित पांढरपेशावर्ग तर बेटीव्यवहाराचे बाबतीतही घृणास्पद वर्तन ठेवतो!' मी उद्गारलो.

'बहुसंख्य अल्पसंख्याकांना समानता कधीच देणार नाहीत!' तरुण.

प्रा. गुंजीकर संतापलेच. 'काय बोलता हे! राष्ट्राध्यक्ष, सरन्यायाधीश, राज्यपाल अशी किती तरी पदे अल्पसंख्याकांना मिळाली आहेत. पाकिस्तानात असे घडले आहे काय? घडणार आहे काय?'

छोटा कार्यकर्ता अशोक पारकर उद्गारतो, 'पाकिस्तानने बहुतेक हिंदू अत्याचार करून हुसकावून लावले. भारतातले बहुसंख्य मुस्लिम इथेच राहालेत. मग सहिष्णु कोण?'

'मराठी माध्यमाला मुस्लिम विरोध करतो. उर्दू माध्यमाची प्रशाला नसल्याने शिक्षण आपोआप थांबते.' मी.

श्री. वझीर पटेल : 'बरोबर आहे. मराठी माध्यमाचे शाळांतून उर्दू ऐच्छिक विषय ठेवा म्हणजे सारे सुरळीत होईल ही मागणी आम्ही सतत करीत आहोत; पण ऐकतो कोण? उर्दू शाळा या धर्म व रूढी आणि संकुचितता शिकविणारे कारखाने बनल्या आहेत!' त्यांनी एक कुटुंब नियोजनाचा किस्साही ऐकवला. 'एका मौलवीच्या अपप्रचारामुळे कुणीही शस्त्रक्रिया करून घ्यायला तयार नव्हते. आम्ही गंमत केली. सुधारणावादी मुस्लिम पोलिसअधिकाऱ्याला वश करून घेतला. त्या मौलवीवरच शस्त्रक्रिया केली गेली. मग काय? सारा गाव मागे आलाच!'

उत्तर भारतातील एका पहाणीत 'अस्वच्छ, असंस्कृत अशी मते मुस्लिमांबद्दल व्यक्त केली गेली–' प्रा. कुलसम पारेख.

'मला हे मत मान्य नाही. इथले बहुतेक मुस्लिम स्वच्छ आहेत. बरेच सुसंस्कृत व समंजस आहेत. इथे दंगा कधी झाला नाही.' मी उद्गारलो. 'काही मनाने जुनाट असतील; पण बदल घडत आहे.' या माझ्या म्हणण्यावर प्रा. कुलसमबेन उसळल्या. त्या म्हणाल्या, 'मुळीच नाही. तुम्ही हिंदूंनीच अशी स्तुती करून त्यांना चढवून ठेवलं आहे.'

आकाश अबोल होतं. काळोखाला अंकुर फुटला होता. आम्ही घरी निघालो. उल्हासचे पाणी खळाळत होतं– त्या लकेरीत मन गुंतलं आणि पांगळेपणा लुप्त झाला.

## एक कठोर सत्य

**श्री. वझीर पटेल** : सत्यशोधक समाजाची ही मुलुखमैदान तोफ. त्यांचे विचारही परखड. ते म्हणाले : मुस्लिम जातीयवाद्यांनी पूर्वी सत्तेमध्ये ७०% हिस्सा मागितला. शेवटी ३५ टक्क्यांचे पाकिस्तान स्वीकारले. इथल्या हिंदूंनी उदारपणे इथल्या मुसलमानांना हिंदूइतकेच अधिकार दिले; पण मुस्लिमांनी द्वेष खत्म करण्याचे प्रयत्न केले नाहीत. दंगे होऊ नयेत म्हणून सरकार प्रयत्न करते; पण जमशेटपूरचा दंगा झालाच. रामनवमीची मिरवणूक हे खरे कारण नाही. अन्वर नावाचा गुंड दिवसा-ढवळ्या हिंदूंच्याच काय पण मुस्लिमांच्या घरात घुसूनही स्त्रियांची इज्जत लुटत असे. त्याला पकडत असता पोलिसांच्या गोळीबारात तो मेला. त्याची प्रेतयात्रा हा मुस्लिमांनी प्रतिष्ठेचा प्रश्न केला. मुस्लिम डॉक्टर, वकीलही सामील झाले. फेब्रुवारीत एक मुस्लिम गुंड हिंदु मुलीला पळवीत असता हिंदु गुंडाने त्याला रोखले. वातावरण तापले होते. रामनवमीची मिरवणूक रोड नं. १४ ने नेण्याचा अट्टाहास होता तरी जखीअन्वरसारख्या उदारांनी पाठिंबा देऊन उपोषणही केले; पण दंगलीत त्यालाच मारले गेले. पुढे मिरवणुकीवर मशिदीतून बाँब फेकला गेला. दंगल उसळली. पुढे पोलिसांनी मुसलमानांवर अत्याचार केले. मुस्लिमांच्या कॅम्पवर प्रवाशांना नेणारी गाडी हिंदूंनी जाळली अशाही बातम्या आल्या.

**श्री. अजगरअली इंजिनिअर**–बोहरी समाजातील सुधारक - त्यांचे विचार : बोहरी व खोजा समाजात मौलवींना महत्त्व फार. इ. स. १९०२ च्या सुमारास संघर्षाची ठिणगी पेटली. बोहरी समाजातील काही व्यक्तींनी इंग्रजी शाळा काढली. सय्यदनाने विरोध केला.

बुऱ्हाणपुरामध्ये काही बोहरांना बहिष्कृत केले गेले. नेरळ-माथेरान-रेल्वेचे जनक सर आदमजी पीरभॉयनी समाजासाठी आश्रम, इस्पितळे इ. सेवाकार्य सुरू केले. सय्यदनाने त्यांना मदत करणाऱ्यांना बहिष्कृत केले. कोर्टात तो उद्गारला, 'मैं धरतीपरका खुदा हूँ। देश के कानून मैं नही मानता।' १९५६ साली सुधारणावादी चळवळीने जोर धरला. सिंधी व्यापाऱ्यांशी स्पर्धा सुरू झाल्याने बोहरी शिक्षणाकडे वळले.

**प्रा. मुमताज रहिमतपुरे**–मुस्लिम समाजातल्या उदयोन्मुख लेखिका : त्यांच्या सूचना विधायक होत्या. स्त्रियांचे व मुलांचे शिक्षण वाढवावे, मुस्लिमांच्या नोकऱ्यांचे व सामान्यांचे अन्य प्रश्न हाताळावे. तलाकपिडितांसाठी आश्रम काढावा, मुलींसाठी बोर्डिंग काढावे इ.

प्रा. कुलसमबेन पारिखांच्या भाषणात बंडखोरीची चमक होती, तर रहिमतपुऱ्यांचा स्वभाव प्रौढ गंभीर, जलाशयासारखा शांत.

## प्रा. कुरुंदकरांचे विचार

शिबिरार्थींना खरेखुरे संजीवन लाभले ते प्रा. नरहर कुरुंदकरांच्या विचारधनाने. त्यांचे काही विचार :

सतत पराभव होत गेल्याने पराभव का होतात हे जाणवत नाही. हा हिंदूप्रमाणे मुसलमानांचाही इतिहास आहे. चीन, रशिया, पाक, भारत इ. राष्ट्रांतील मुसलमानांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. या देशात मुसलमानांना समानत्व मिळाले असले तरी उन्नतीसाठी स्वतःचे मनाविरुद्धच झगडावे लागणार आहे. गुलाम गुलामगिरीविरुद्ध झगडत नाहीत हीच शोकांतिका आहे. जमात इस्लामींची स्थापना मैमुदी यांनी १९४०–४१ च्या सुमारास केली. देवबंदच्या पंडितांबरोबर त्यांचे जमेना म्हणून ते निजामाच्या आश्रयास आले. जमाते इस्लामी 'शिया' वर्ज्य मानतात. राष्ट्रवाद म्हणजे भूमिविषयक निष्ठा इस्लाममध्ये वर्ज्य असे जमाते इस्लामीचे मत आहे. आधुनिक शिक्षण न घेणे, नोकरी न करणे, धर्माभ्यास एवढेच ज्ञान इत्यादी अटी सभासदाला असल्याने हिंदुस्थानात सुमारे ३००० तर महाराष्ट्रात ८०–९० च अनुयायी असतील.

मुस्लिम लीगने धर्म राजकारणासाठी राबविला. श्रद्धाळूपणाच्या कोषातून कार्यकर्त्यांचे मन बाहेर पडले पाहिजे. वैचारिक चळवळीबरोबर दैनंदिन प्रश्नांसाठी झगडले पाहिजे. कुराण हे 'अमानवी' मानून चिकित्सक अभ्यास करायला मुस्लिम तयार नाहीत. धर्माचा एक मुख्य भाग 'इहलोक' ही असतो हे कुणीच लक्षात घेत नाही. 'स्त्री' ही संपत्ती या विचाराने तिला वागवले जाते.

गृहराज्यमंत्री भाई वैद्य ही मुस्लिम सत्यशोधकचळवळीच्या मागची एक शक्ती. ते आले नाहीत. दि. २८–५–७९ लाच शिबिराचा समारोप झाला. श्री. हुसेन जमादारांच्या भाषणात हमीदभाईंच्या निधनानंतर चळवळीत निर्माण झालेल्या विस्कळितपणाबद्दलची खंत जाणवली. प्रा. कुलसमबेन पारेख यांचे खंदे कर्तृत्व चळवळीच्या मागे उभे आहे. त्या खूपच आशावादी. 'चार-पाच कार्यकर्त्यांनी जरी हमीदभाईंचे कार्य पुढे चालविले तरी शिबीर यशस्वी झाले असे मी समजेन' असे त्या उद्गारल्या. प्रा. गुंजीकरांनी शिबिर सुनियोजित असावेच व स्वावलंबीही असावे असा आग्रह धरला. 'मुस्लिम हा व्यक्तिशः चांगला असतो. व्यक्तीशी निष्ठाही ठेवतो; पण समाज व राष्ट्र यांचे संदर्भात तो तसा नसतो का हाच मुख्य प्रश्न आहे. याचा विचार व्हावा' असे प्रतिपादनही त्यांनी केले.

समारोप झाला होता. प्रा. कुलसमबेन व कुरुंदकरांचं सतत पानपट्टीचा खाणे चालले होते. मध्येच गप्पा चालू आहेत. 'धर्म व कुराण' यांचे बाबतीत मते मांडायला 'सेक्युलर' पुढारी कसे कचरतात याची गोष्ट कुरुंदकर सांगतात. एक पाकप्रेमी मोठ्याने रेडिओ लावून भारतविरोधी बातम्या लोकांना ऐकवत होता. लोकशाहीतले व्यक्तिस्वातंत्र्य तो अबाधित राखीत होता! प्रकरण नबाब अलीयावर जंगसाहेबांकडे गेले. त्यांनी त्याला खडसावले की, 'मग तुम्ही राष्ट्रद्रोही आहात हे ठरविण्याचे व्यक्तिस्वातंत्र्यही आम्हाला आहे!' पण हेच साहेब कुराणातील कायद्याबद्दल विचारता 'मी ते बरेच दिवसांत वाचलेले नाही' असे सांगून मोकळे झाले!

'जागर' व 'शिवरात्र' इ. ग्रंथांतून हिंदू वा मुस्लिम अंधश्रद्धेवर कडाडून हल्ले चढविणारे कुरुंदकर 'सनातनी' धोतरात वावरत होते.

बैलगाडीतून आम्ही नेरळकडे निघालो. करडाबरडचा माळावरून गाडी धावत होती. गप्पा रंगत होत्या. हमीदभाई अ.

भि. शहाना 'अन्न' म्हणत, मला अली! प्रा. कुलसमबेन अत्यंत बुद्धिमान व पूर्वी थंड होत्या. मी रागावलो होतो; पण 'आता चांगले कार्य करताहेत! उल्हासच्या पाण्यातून चालण्यातला आगळा आनंद लुटला. सायंकाळच्या सावल्या खुदखुदत होत्या. कर्जतकडे जाणारी लोकल आली. आम्ही त्यांना नमस्ते म्हटलं!

प्रा. मुमताज रहिमतपुऱ्यांना मला मागे एक गोष्ट सांगितली होती. माणसाने चंद्रावर पाय ठेवला हे एका मुस्लिमबाईंना पटेचना! ती म्हणे कुराणात असे कुठे आहे? मी तिला म्हटले, 'बाई ग! तू आताच आगगाडीने आलीस! कुराणात आगगाडी आहे का?'

कुराण हाच प्राण मानल्यावर या शिबिराकडे स्थानिक मुस्लिम फिरकले नाहीत, यात काय आश्चर्य? डॉ. लोहिया म्हणत, 'मिठाने डाळीत आपले अस्तित्व मिसळून टाकायला हवे; पण मीठच जर गर्व बाळगू लागले तर? मोठेच संकट!' मुस्लिम समाजाची आजची स्थिती त्या मिठासारखी आहे. हमीदभाई गेले. त्यांच्या 'स्वप्ना'तील भूमी प्रेमाच्या सरितेत न्हालेली होती. ते स्वप्न साकार व्हायला अशा शिबिराची कितपत मदत होणार? पण ती चळवळ जिवंत ठेवली गेली एवढे यशही पुरेसे आहे. 'नवमतवाद' हा 'शवमतवाद' आहे असे भालाकर भोपटकर म्हणत असत. सत्यशोधक समाज या 'शवा'मध्ये नवता निर्माण करण्यात कितपत यशस्वी ठरेल याबद्दलची अस्वस्थता मात्र या शिबिराने निर्माण केली.

पावसाळा सुरू झाला आहे. उल्हासचे पाणी आता गढूळले आहे. भारतीय समाजासारखेच! अश्विनाशिवाय ते आता स्वच्छ होणार नाही. ☐

कथा

# ड्रॅगन

## गिरीश शरद भिडे

चकाकत्या डांबरावर स्वतःचं प्रतिबिंब पहात लांबरुंद रस्त्याच्या दोन्ही तीरांना भल्या मोठ्या इमारती उभारल्या होत्या— दगडी बांधकामाच्या, स्वतःच्या भक्कमपणाची जाणीव करून देणाऱ्या! त्या दगडी, कणखर इमारतीमधून मेणाची माणसं आत-बाहेर करीत होती. या म्हाताऱ्या, राखाडी इमारतीमधून गुलाबी, निळ्या रंगाच्या काही तरुण इमारतीही उभ्या होत्या. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या लोकांना, त्यांच्या मुलाबाळांना आणि तळमजल्यावरच्या दुकानांना सावरत मिटल्या डोळ्यांनी त्या रहदारी पहात होत्या.

अफाट वस्तीच्या महानगरातला तो एक लांबरुंद रस्ता होता— सरळसोट, गुळगुळीत, चकचकीत, स्थितप्रज्ञ! वाहनांनी वाहणारा, माणसांनी अडखळणारा, गतिमान!! चार भिंतीत जन्मलेली माणसं, रस्त्याच्या आश्रयानं दुतर्फा फुटपाथवर पोटा-पाण्याचा धंदा करीत होती. दुकानांच्या आश्रयानं पोटभर पैसा मिळवणारी काही माणसं गल्ल्यावर बसली होती. आपल्या उद्योगातली सारी माणसं फुटपाथवरून पुढे-मागे लगबगत होती. रस्त्याला अंतच दिसत नव्हता; त्यावरच्या गडबडीलाही अंत दिसत नव्हता.

पण या गोंधळातसुद्धा, गडबडीपासून अलिप्त असणाऱ्या काही मोजक्या लोकांपैकी 'तो' एक होता. या सगळ्या धावपळीकडे तो बारकाईने पहात होता. एकामागोमाग लयीत पळणाऱ्या दुचाकी, तीन चाकी गाड्यांचा प्रवाह 'तो' बघत होता. मध्येच इमारतींचं डांबरी प्रतिबिंब निरखत होता. इमारतींच्या लांबत चाललेल्या सावल्या वाहणाऱ्या रहदारीमुळे वर-खाली होत होत्या— तळ्यावर प्रतिबिंब हिंदकळावं तशा!

त्यानं लांब नजर टाकली. क्षितीजाच्या कडेला वाटावं इतपत दूरवर एक मोठ्ठं वडाचं झाड पारंब्या फुलवून उभं होतं. त्याचं कुतूहल चाळवलं गेलं. त्यानं सगळीकडे नजर फिरवली. साऱ्या दृष्टीटप्प्यात माणसांची जत्रा भरली होती. वळणावळणावरून माणसांचे ओघ वाहात येत होते, पुढच्या वळणावर वळून दिसेनासे होत होते. दुकानात इमारतीत, वाहनात सगळीकडे माणसंच माणसं खच्च भरली होती. या सगळ्या चित्रात इतर कुठल्याही प्राण्याला थारा नव्हता. आकाशाच्या निळीतसुद्धा भिरभिरणाऱ्या पाखरांऐवजी चार-दोन धुरकटलेले ढग भरकटत होते. त्यांच्या कडा हळू-हळू रंगेरी व्हायला सुरुवात झाली होती. साऱ्या वातावरणावर निळसर आकाशाचं कवच घातल्यासारखं वाटत होतं. या सगळ्या खेचगर्दीत ते जूनसर वडाचं झाड, गवताळ पिवळ्या माळरानावरल्या एखाद्या रंगीत, चिमुकल्या रानफुलासारखं हिरवं वाटत होतं. या सगळ्या गर्दीत तेच एकटं हिरवं कसं उभं आहे याचं त्याला आश्चर्य वाटलं. तो तिकडे संथपणे चालू लागला. त्याला खरंच काही घाई नव्हती.

वळणावर येऊन तो थांबला. दोन्ही बाजूंच्या झगमगत्या उंच्यापुऱ्या सुंदर इमारतींमधल्या छोट्याशा जागेत, वडाच्या झाडाशेजारी एक केविलवाणं छोटंसं मंदिर उभं होतं— वडाच्या पारंब्यांच्या आधारानं उभं असल्यासारखं! मधूनच येणारा मंदिराच्या गाभाऱ्यातल्या घंटेचा आवाज रहदारीच्या आवाजात पार लुप्त होऊन जात होता. मंदिरही जुनंपुराणंच होतं; पण त्याचा कळस मात्र चमकत होता. गाभाऱ्याजवळच्या कट्ट्यावर आयुष्याच्या संध्याकाळी काही म्हातारी माणसं रहदारीची गंमत बघत बसली होती. त्यानं पाहिलं, फुटपाथवरून जलदीनं जाणारी माणसंसुद्धा देवळाच्या दरवाज्यापुढून जाताना चटकन् नमस्कार करून जात होती.

पण तो देवळात गेला नाही. फुटपाथच्या लोखंडी रेलिंगला टेकून उभा राहिला. देवळाच्या पलीकडे एका मोठ्या इमारतीच्या बंद दुकानाच्या दाराशी चार-पाच जण धूर सोडत बोलत होते. आपल्यातच ते गुंग झाले होते. त्यांच्याच पलीकडे एक रोडरोलर उभा होता...अजस्र हत्तीसारखा. त्याच्याशेजारी खडीचा ढीग पडला होता. त्या ढिगाऱ्यावर दोन-तीन खडकाळ रांगती मुलं आपल्या घामेजलेल्या आयांशेजारी खेळत होती. मुख्य रस्त्याला येऊन मिळणाऱ्या क्रॉस-रोडचं काम चालू होतं. ओल्या डांबराचा एक सूक्ष्म गंध त्याला जाणवला. त्यानं आजूबाजूला नजर फिरविली. सारं कसं व्यवस्थित, शिस्तबद्ध चालू होतं. नेहमीच्या लयीत वाहणारा रस्ता, दुकानाच्या चकाकत्या शोकेसमधल्या हसऱ्या पुतळी बाया, धांदलीत चालणारी, वेळ न दवडणारी माणसं, धूर सोडत वेळ काढणारी माणसं, रहदारीच्या आवाजानं बधिर झालेलं

वडाचं झाड, गाभाऱ्यातला गंभीर, स्थितप्रज्ञ देव ! सारं कसं शांत होतं. नेमून दिल्यासारखं व्यवस्थित होतं आणि म्हणनच बहुधा सुंदर होतं.

त्यानं रस्ता ओलांडला आणि रोडरोलरला वळसा घालून तो शेजारच्या क्रॉसरोडला चालू लागला. धावपळीची तीव्रता त्याला एकदम कमी झाल्यासारखी वाटली. चमकत्या दुकानांपेक्षा, रस्त्यावरच्या पथारींच्या दुकानांची संख्याच इथं जास्त होती. मोठमोठ्या लाकडी ट्रेमध्ये उंची सामान घेऊन लोकं बसली होती. त्यातले बरेचसे आपल्यातच गुंग होते. धंदा कसा होईल ही पोटाची चिंता फारशी तीव्रतेने इथं जाणवत नव्हती. तो पुढे निघाला. डाव्या बाजूस एक जुनाट पडकट इमारत डळमळीत पायावर उभी होती. डुगडुगत्या जिन्याखाली रंगीबेरंगी सूटकेसेसची थप्पी लावली होती. त्या पुढच्या इमारतीतही अशाच बॅगा लावून ठेवल्या होत्या. बहुधा बॅगांचं ते बेकायदेशीर दुकान असावं.

सहज म्हणून तो आत शिरला. जिन्याच्या पायरीवर बसलेला तांबडया डोळ्यांचा आणि भुऱ्या केसांचा थोडासा वयस्कर माणूस उठून आला. त्यांच्यावर डोळे रोखून म्हणाला, 'बोलो साब !'

त्याला पटकन् काही सुचेना, 'ये इतना सारा सूटकेस बेचनेका है क्या ?'

'हां !'

त्या माणसानं भराभर एकेक साईजच्या सूटकेसेस काढायला सुरुवात केली. नाइलाजानं त्यानं एक बॅग उचलली. उगीचच मागंपुढं करून पाहिली एकदा झाकण उघडून मग पुन्हा झाकण लावून टाकलं. कुलुपं उघडून पाहिली, लावून पाहिली. मग सावकाश बॅग खाली ठेवून दिली. तो बॅग खाली ठेवताच भुऱ्या माणसानं दुसरी मोठी बॅग त्याच्या हातात दिली.

'देख लो, माल पक्का है। इससे बडा साइज चाहिये तोभी मिलेगा। छोटेवालेमेंभी दिखाते हैं।

त्याने ती बॅग उघडली. मखमली, किरमिजी रंगाचं आतलं झुळझुळीत कापड हाताला सुखकारक वाटलं.

'क्या प्राइस इसकी ?'

'बासट रुपया!'

त्याचा चेहेरा किंचित दचकल्यासारखा झाला. ती बॅग त्यानं हळूच खाली ठेवली.

'ये चालीसवाला दे दूं क्या ?' भुऱ्या माणसानं एक छोटी बॅग उचलत म्हटलं.

त्यानं अनिच्छेनं ती बॅग हातात घेतली, उघडून पाहिली. भुरा माणूस त्याच्या चेहेऱ्याकडे एकटक पहात होता. त्यानं ती बॅग बंद केली आणि परत जागेवर ठेवून दिली. तो जायला निघाला.

'क्या हुवा ?'

'देखो उपरसे दबाया तो ये बॅग तो अंदर जाती है !'

'बॅग लेनेका है तो बात करो !' भुऱ्या माणसाचा आवाज किंचित चढला.

'लेकिन इसका ढक्कन तो देखो.'

भुरा माणूस एकदम पुढे आला. त्याच्या अगदी जवळ येऊन उभा राहिला. हाताच्या बोटांनी त्याचं पोट दाबत तो म्हणाला, 'ये तुम्हारा पेटभी दबाया तो अंदर जा सकता है। वो भी खाली है।'

त्याचा चेहेरा किंचित लाल झाला. 'सीधी तरहसे बात करो !'

भुरा माणूस आणखीन पुढे सरकला. त्याचा चेहेरा वेडावाकडा झाल्यासारखा वाटला. 'लेनेका तो कुछ नहीं और खाली वक्त बरबाद करने आये क्या ?'

'तो' ही चिडला त्याचा आवाज वाढला. मग दोघांच्याही आवाजाने वरची पातळी गाठायला सुरुवात केली. अंतरा–अंतरावर दोन–चारजण धूर सोडत उभे होते. तो धूर वातावरणातच गोठल्यासारखा झाला. हळू–हळू सगळे आजूबाजूला जमू लागले.

'क्या हुवा भाइसाब ?' ठिणगी विझवायच्या प्रयत्नात सिगारेट बुटाखाली दाबत एक माणूस म्हणाला. भुऱ्या माणसाच्या तो ओळखीचा होता. भुऱ्या माणसाचा आवाज आणखीनच चढला. लालीलाल डोळ्यांनी, ओठांशी जमणारी थुंकी सावरत तो सारं काही सांगू लागला. सगळं सांगून संपवता–संपवता पचकन् थुंकावं तशी त्यानं सहज एक शिवी दिली.

'त्याचा चेहेरा तापला. जमलेल्या गर्दीतले त्याचे दोन–चार त्याच्यासारखे ओळखीचे त्याच्या बाजूला येऊन उभे राहिले. थंड, गारगोटी नजरेनं सारं पहात राहिले.

'गाली क्यों दी ?' त्याने सुरुवात केली न् तो दोन पावलं पुढं सरकला. भुरा माणूसही आणखी जवळ आला. सारंच वातावरण धगधगीत वाटू लागलं. दोघांपैकी कुणीही आता थांबणार नाही याचा अंदाज गर्दीतल्या दोन–चार निरुपद्रवी बघ्यांना आला आणि सावकाश त्यांनी काढता पाय घ्यायला सुरुवात केली; पण बातमी हळू–हळू पसरत होती. कुठून–कुठून लोक धावत येऊन गर्दी वाढवत होते. या छोट्याशा गल्लीत एवढी लोकं रहात असतील याचा अंदाज येणं कठीणच होतं. दोन्ही बाजूंना संख्या वाढू लागली. दूरवरून एक चुकलामाकला पोलीस चक्कर टाकून गेला. आकाशातले काळपट ढगही जलदीने निघून गेल्यासारखे वाटले. अवाढव्य निळीतून काळसर अंधार हळूहळू झिरपू लागला. त्या अंधारात सगळ्या माणसांची भुतं होणार असं वाटायला लागलं. वातावरणातली धग आता चांगलीच जाणवायला लागली. कुठल्याही क्षणी ठिणगी पडणार असं वाटायला लागलं आणि...

–आणि तशी ती पडलीच. थोड्याच वेळात तो छोटासा क्रॉसरोड सरसरत पेटून निघाला. आजूबाजूची दुकानं धडधडत बंद व्हायला लागली. ज्वाला सगळीकडे लवलवत पसरल्यासारख्या झाल्या. थोड्याच वेळात 'दोन जमातीत दंगल झाली' अशा अफवांच्या धुरानी आकाश काळवंडून गेलं. ओघानं वाहणारा मोठ्ठा, उत्साही रस्ताही खळबळला. शिस्तीत वाहणारी वाहनंही खंडित झाली. धगीची लाट हळू–हळू मुख्य रस्त्यवरही पसरली. कोपऱ्या–कोपऱ्यावरची टोळकी चटकन् या आगीत सामील झाली, तेलासारखी पसरली. खडीवर खेळणारं एक छोटं पोर चेंगरलं गेलं. त्या पोराची भेदरलेली आई त्याला घेऊन आडोशाला धावली. खडी लोकांसाठी मोकळी झाली. एकटा रोडरोलर तेव्हढा निर्भयपणे तिथे उभा राहिला.

देवळाचा कळस काजळकाळा झाला. वडाचं झाड थोडंसं थरथरलं. पानं चिडीचिप्प झाली. देवळाच्या कट्टयावर बसलेली 'संध्याकाळची माणसं' हळूहळू निघून गेली. समईच्या शुभ्र कळ्यांच्या सोज्वळ, पुसट प्रकाशात देव एकटा राहिला.

माणसांचे लोंढेच्या लोंढे क्रॉसरोडमधून फुटू लागले. दिशाहीन पसरत गेले.

सुप्तावस्थेतला विनाशी ड्रॅगन थोड्याशा डिवचण्यानं जागा झाला. खवल्याखवल्यांची खडबडीत कातडी थरथरवून, काटेरी रोपटी सावरत तो जागा झाला होता. तांबारलेल्या डोळ्यांनी, आगीच्या लोटांचे उच्छवास सोडत तो सरपटू लागला. □

## कुरुक्षेत्र केरळ । लेखांक आठवा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# देशभर संघाला यापुढे लढूनच वाढावे लागेल ! लढे कोणते ?

केरळमधील संघकार्यकर्ते आणि मार्क्सवादी यांच्यातील संघर्षाचा अभ्यास करत असतानाच आणखीही एक तुलना आम्ही काही वेळा सहेतुक, काही वेळा अजाणतेपणाने करत होतोच आणि ती म्हणजे महाराष्ट्रातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याचं कार्य आणि केरळमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्याचं कार्य. कारण कोणत्याही देशव्यापी संघटनेची मूल तत्त्वं आणि धोरणं जरी एकच असली तरी ज्या त्या प्रदेशानुसार त्यांची काही खास प्रादेशिक वैशिष्ट्यंही असतातच.

त्या दृष्टीनं महाराष्ट्र आणि केरळ या दोन राज्यांमधील संघवाल्यांमध्ये पहिला फरक जर कोणता जाणवला असेल तर महाराष्ट्रातील संघवाल्यांनी आपले कान आणि त्याबरोबरच आपलं मनही संघ-विचाराव्यतिरिक्त इतर सर्व विचारांना पूर्णपणे बंद केले आहेत. आपल्या विरोधकांचे विचार किमान त्यांच्यावर प्रतिटीका करण्यासाठी तरी आपल्याला माहिती असावेत, मार्क्सच्या 'कॅपिटल'ची अगदी पारायणं जरी केली नाहीत किंवा समाजवादी विचारसरणीवर अधिकारवाणीने भाष्य करता आलं नाही, तरी सबंध जगावर प्रभाव पाडणाऱ्या या विचारप्रणालींची काही मुख्य सूत्रं तरी आपल्याला माहीत असावीत असं महाराष्ट्रातल्या संघवाल्यांना कधी फारसं वाटलंच नसावं. कारण या विषयावर त्यांच्याशी चर्चा करण्याचे जे काही थोडे प्रसंग आले त्यावेळी या विषयांसमोर ते चर्चेत फार काळ टिकूच शकत नाहीत, असं प्रकर्षानं जाणवलं. त्यांची हिंदुराष्ट्रवादाची व संघटनेची पोथी त्यांनी पक्की घोकून ठेवली आहे; पण इतर पोथ्यांना हात लावण्याची इच्छासुद्धा त्यांना कधी होत नसावी. इतकंच नव्हे तर समाजावर साहित्य कितीसा परिणाम करणार, ज्या देशात निरक्षरतेचं प्रमाण सत्तर-ऐंशी टक्के आहे तिथं त्याचा उपयोगच काय, विचारवंतांची आपल्या देशाला काय गरज आहे, त्यापेक्षा संघटनच महत्त्वाचं, असले बालपणी संघस्थानावर ठोकून बसवलेले खिळेच वयाची चाळिशी उलटून गेली तरी त्याच्या तोंडातून बाहेर पडत असतात. याउलट केरळातील संघाचा अगदी स्थानिक पातळीवरचा कार्यकर्तासुद्धा मोडक्या-तोडक्या इंग्रजीमध्ये मार्क्सवाद आम्हाला ऐकवत होता, त्याच्या काय गोष्टी आम्ही उचलल्या पाहिजेत हे सांगत होता. भले त्याच्या समजुतीमध्ये घोटाळे असतील; पण त्या दिशेने तो विचार करत होता हे निश्चितच फार मोलाचं होतं.

आत्मसंतुष्टता हा आपल्या महाराष्ट्रातील संघवाल्यांचा आणखी एक विशेष. आपण आजपर्यंत जे काही केलंय, विशेषत: आणीबाणीतला आपला पराक्रम यावरच महाराष्ट्रातले बहुतेक संघवाले अजूनही खूष दिसतात. केरळहून आल्यानंतर काही दिवसांनीच केरळमधील संघाविषयी पुण्यातील संघकार्यकर्त्यांशी बोलण्याचा प्रसंग आला. आम्ही वारंवार सांगायचा प्रयत्न करत होतो की, केरळमधील संघाच्या सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्यालासुद्धा तिथल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीचं जे भान आहे, ते अतिशय महत्त्वाचं आहे. त्यावर एका संघवाल्याचे उद्‌गार –

'अहो असणारच – परिस्थितीचा रेटाच तिथं असा आहे की हे भान त्यांना ठेवायलाच पाहिजे !'

'मग आपल्याकडल्या संघवाल्यांना हे भान केव्हा येणार ?' आमचा भाबडा प्रश्न !

'काय आहे, तशी परिस्थिती निर्माण झाली पाहिजे ...'

त्याचा पुढचा टेप ऐकण्याची इच्छा नव्हती. म्हणून त्याला मध्येच तोडत म्हटलं,

'पण मग तशी परिस्थिती निर्माण झाल्यावर हे भान काय एकदम येणार आहे ? ते विचारातच रुजायला नको का ?'

त्यांच्यापैकी एका विभागाधिकाऱ्यांना हे म्हणणं पटत होतं. त्याचं महत्त्वही जाणवत होतं; पण इतरांच्या मनात निश्चितच 'ठीक आहे, कळली तुझी अक्कल...!' असं काही तरी असावं. कारण ते यावर काही बोलले नाहीत; पण त्याचबरोबर 'यांच्या नादी कशाला लागायचं !' असा भावही त्यांच्या चेहऱ्यावर होता.

याच्या अगदी उलट केरळमधील संघकार्यकर्त्यांना सतत आपल्यामध्ये काय कमी आहे याचीच टोच लागलेली जाणवत होती. संघाच्या कोणत्याही कामातलं यश सांगत असतानाच आम्ही अजून नेमके कुठं कमी पडतोय, आम्हाला संघाचं काम प्रभावीपणे वाढवण्यासाठी आणखी काय केलं पाहिजे, याचीही प्रामाणिक कबुली ते देत होते. त्यामुळं त्यांच्यामध्ये महाराष्ट्रातल्या संघवाल्यांमध्ये असणारी आत्मसंतुष्टता तर नव्हतीच, उलट आपल्यामधील त्रुटींचीच जाणीव सतत होती. एवढा प्रखर विरोध असूनही केरळातील संघाचं काम ज्या झपाट्यानं वाढतंय त्याचं हे एक महत्त्वाचं कारण आहे. आपण लौकरात लौकर राजकीय–सामाजिक क्षेत्रामध्ये पसरलो नाही तर आपल्यापुढचे प्रश्न अधिक बिकट होतील, हे त्यांनी ओळखलं आहे.

संघाचे केरळमधील प्रांतप्रचारक श्री. भास्करराव कळंबीही याला अपवाद तर नाहीतच, उलट या वृत्तीचं ते एक आदर्श आणि प्रातिनिधिक रूप आहे. जवळ जवळ दिवसभर त्यांच्याशी बोलत बसलो होतो, पण हा मनुष्य विशिष्ट झापडं लावून किंवा कान आणि मन बंद करून विचार करतोय असं कोणत्याही क्षणी वाटलं नाही. मनमोकळेपणा आणि विचारातली स्पष्टता तर या माणसाजवळ होतीच, पण केरळातील संघाची वैगुण्यं किंवा त्रुटी हा मनुष्य स्वतःहून आम्हाला सांगत होता. 'तुमच्यासारखे बोलणाऱ्या आणि वागणाऱ्या एखाद्या तरी महाराष्ट्रीयन संघवाल्याचं नाव सांगू शकाल का?' हा आम्ही विचारलेला प्रश्न महाराष्ट्रातील संघामध्ये दहा वर्षं काढलेल्या भास्कररावांना नुसता हसून सोडून द्यावा लागला, यातच महाराष्ट्रातील संघवाल्यांवरील त्यांचीही कॉमेंट सामावलेली आहे. एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, पूर्वीच्या मानाने महाराष्ट्रातील संघाचे वरिष्ठ अधिकारी थोडे निवळलेले, ज्यांच्याशी काही तरी चर्चा, देवाण-घेवाण करता येईल असे आता झाले आहेत; पण त्यांचीही संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच. तरीदेखील सामान्य संघवाल्याला याची खंत वाटत नाही, ही उणीव त्याच्या लक्षातच येत नाही. तो संघाच्या शिस्तबद्धतेवरच अजून निहायत खूष आहे.

## विचारात लवचिकता हवी

कार्यकर्त्यांचीच तुलना चालली आहे तर आणखीही एक लहानसा मुद्दा इथेच सांगून टाकतो. केरळातले संघाचे सामान्य स्वयंसेवक आणि महाराष्ट्रातील सामान्य स्वयंसेवक यांच्यामध्ये जाणवलेला आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे केरळातील संघवाले हसतात, खिदळतात, वेळप्रसंगी बऱ्यापैकी इंग्लिशमध्ये कोटयाही करतात. बरोबरच्या तिऱ्हाईत माणसालासुद्धा सुंदर रिझवतात. महाराष्ट्रातले बहुतेक स्वयंसेवक देशउभारणीच्या ओझ्याखाली सदैव वाकलेले, चिंबलेलेच दिसतात. नवख्या माणसालाही आपलंसं करण्याचं केरळी संघवाल्याचं हे कसब निश्चितच वाखाणण्याजोगं आहे आणि अनुकरणीयही!

महाराष्ट्रातल्या संघाचं एक सुदैव म्हणजे संघ हा इथल्याच मातीत निर्माण झाला आणि वाढला; पण केरळातला संघ मात्र एखादं लहानसं रोप जसं एका ठिकाणाहून काढून दुसऱ्या ठिकाणी नेऊन लावावं तसा सुरू झाला, तसाच वाढला. तरीदेखील आज चित्र असं दिसतं की, महाराष्ट्रातला संघ एकूण समाजजीवनापासून अलग पडला आहे आणि याला मुख्य कारण म्हणजे इथल्या संघाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विचारातील आणि वर्तनातील कर्मठपणा, ताठरपणा. बदलत्या सामाजिक जीवनाबरोबर संघाच्या विचार आणि आचारातही आवश्यक असलेला बदल त्यांनी कधी केलाच नाही. कोणत्याही नवविचाराला दार खुलंच ठेवलं नाही.

हा सैलपणा, ही लवचिकता केरळच्या संघात प्रकर्षानं जाणवली. आदिवासी आणि गिरिजन यांचं संचलन केरळमधे कमरेला लुंगी आणि खांद्यावर तिरकामठा अशा थाटात चालतं, हे इथं सांगूनही खरं वाटणार नाही; पण त्यामुळेच केरळातल्या निवडणुकांचा निकाल फिरवण्याइतकं सामर्थ्य जरी इथल्या संघामध्ये नसलं तरी मार्क्सवाद्यांचा हल्ला झाला तर एखाद्या अनोळखी घरातही संघस्वयंसेवकाला आसरा मिळतो, हीही काही लहान achievement नाही. महाराष्ट्रातला संघ संघटनेच्या बळावर इतर समाजाशी फटकून वागू शकतो, पण केरळात हे परवडणार नाही, हे संघाच्या तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ओळखलं आहे आणि समाजाच्या सर्व थरांमध्ये घुसून मार्क्सवाद्यांचा रोषही ओढवून घेतला आहे; पण त्यामुळेच संघाच्या टीकाकाराला महाराष्ट्रातील संघावर जो जातीयवादाचा शिक्का मारून मोकळं होता येतं, तसं केरळच्या संघाबाबत करताच येणार नाही. उलट ओ. टी. सी. ला सुशिक्षितांचं प्रमाण २५ टक्के देखील नाही, ही आज केरळच्या प्रांतप्रचारकांची खंत आहे.

## राजकीय–सामाजिक भान

संघाच्या केरळातील कार्याबद्दल यापूर्वीच्या लेखांमध्ये सविस्तरपणे बोललो आहे. महाराष्ट्रातल्या कार्याबद्दल काय लिहिणार? सकाळी किंवा संध्याकाळी एक तासभर संघस्थानावर जमून काही व्यायाम करणं, खेळ खेळणं, 'झूल झूल, झंडा झूल। संघटनमें शक्ती है।' असं फेर धरून म्हणणं आणि तेच तेच विचार ऐकणं एवढंच संघकार्य आहे असे ते मानतात. हे जरा कमी वाटलं तर जोडीला वर्षभरासाठी सहा–आठ 'सांस्कृतिक' कार्यक्रम आहेतच. याबाबत एखाद्या कार्यवाहाला छेडण्याचा प्रयत्न केला की तो कुठल्या तरी झोपडपट्टीचं, कुठल्या तरी गावाचं किंवा कुठल्या तरी जिल्ह्याचं नाव तोंडावर फेकून मोकळा होतो. केरळात चला, म्हणजे संघाचे काम दाखवतो, असं म्हणत नाही हे नशीब! अगदीच तोंड देणं अशक्य होतंय असं वाटलं की, प्रश्न विचारणाऱ्याच्याच गळी पडायचं जुनं तंत्र आहेच–'मग तुम्हीच आमच्याकडे येऊन हे कार्य सुरू करा ना!' की विचारणाराही चूप!!

परवाच एका शाखाकार्यवाहाशी बोलत होतो.

'सध्या पुण्यामध्ये संघाचं काय विशेष काम चाललं आहे?'

'विशेष काम म्हणजे आता संघटन अधिक मजबूत करायचं ठरवलंय.'

'हे काम गेली पंचेचाळीस वर्षं चाललंय.'

'तेच, पण आता प्रत्येकानं स्वतःच्या पाठीशी जिवाला जीव देतील असे किमान दहा तरी स्वयंसेवक उभे करायचं ठरवलंय.'

'हे कामही पंचेचाळीस वर्षांचं जुनंच आहे.'

'नाही म्हणजे मग पुढं असं करणार की, रक्तदानाचे वगैरे कार्यक्रम आयोजित करणार. संघाचेच स्वयंसेवक रक्तदान करणार. म्हणजे मग काय होईल की, कुठल्याही झोपडपट्टीतल्या कुणाला रक्त लागलं की आमच्या कार्डावर त्याच्यासाठी बाटली मिळवता येईल.'

पुढं फार काही चर्चा चालू ठेवण्यात अर्थ नव्हता. झोपडपट्टीतल्या माणसाला रक्ताच्या बाटलीपेक्षा ज्वारीची भाकर जास्त वेळा लागते, हे या कार्यवाहाला कधी कळणार? केरळमधे मात्र सामान्य प्रचारक सुद्धा आर्थिक प्रश्न सोडवावे लागतील आणि लोकांना समतेच्या साक्षात्काराबरोबरच आर्थिक उन्नतीचं अभिवचन देऊन तसे प्रयत्न करावे लागतील हे ओळखून वावरत असतो. हातावर पोट असलेले, वर्षातले चार-सहा महिने कामाच्या शोधार्थ भटकणारे,

जमतेम पोटापुरतं कमावणारे-पिकवणारे, आणि पोट जाळण्यासाठी आपला प्रांत सोडून भारतभर, प्रसंगी भारताबाहेर वणवण भटकणारे अशा सर्व थरांतले स्वयंसेवक केरळमध्ये आहेत. तिथला संघाकडे आकृष्ट होणारा ख्रिश्चन त्यांना अगदी सरळ सरळ विचारतो, 'मी चर्चला धरून राहिलो तर मला नोकरी मिळते, माझ्या मुलांच्या शिक्षणाची सोय होते, आमच्या औषध-पाण्याची व्यवस्था होऊ शकते. मी संघात आलो तर या सगळ्याला मुकेन ! जर हे सगळं मिळत असेल तर मला माझ्या मूळ समाजात येण्यात आनंदच आहे. मग सांगा मी येऊ का नको?' त्याचा सवाल फार रोकडा आहे आणि त्यावर केवळ हिंदुत्वाची मात्रा लागू पडत नाही हा संघकार्यकर्त्यांचा अनुभव आहे. मार्क्सवादीही संघाकडे आकृष्ट होतील; पण जर ही संघटना त्यांना फक्त समतेचा अनुभव देऊन नंतर त्यांच्या मंजुरीच्या, बोनसच्या, निरनिराळ्या क्रयवस्तूंच्या बाजारभावांच्या प्रश्नांवर योग्य भूमिका घ्यायला असमर्थ ठरली तर ते परत मार्क्सवादी पक्षाकडे जातील किंवा आणखी एखादा अखिल भारतीय मंच शोधण्याचा प्रयत्न करतील, याचीही जाणीव केरळमधल्या कार्यकर्त्यांच्या मनात आहेच.

## धोका पत्करलाच पाहिजे

कोणत्याही संघटनेनं संघटित शक्ती आणि बहुजनसमाजाच्या उन्नतीसाठी संघर्ष या दोन्ही गोष्टी करायच्या असतात. संघ आणि संघर्ष यात फारकत करण्याची जुनी पद्धत केरळच्या कामाकडे पाहून सोडून द्यावी लागेल. सुरुवातीच्या काळात कोणत्याही संघटनेला दबून घ्यावं लागतं, नाही तर संघटना वाढूच शकत नाही. संघटना वयात येण्यापूर्वीच लहान-मोठे संघर्ष अंगावर ओढवून घेणाऱ्यांचं काय होतं हें भारताच्या डाव्या चळवळीचा प्रवास पाहून सहज कळू शकेल. नक्षलवाद्यांचा क्षणिक उठाव आणि देशभरचा पाडाव हे त्याचं अगदी अलीकडचं उदाहरण. सुरुवातीच्या काळात 'सर्वेषाम् अविरोधेन' ही संघाची भूमिका असणं डावपेचाच्या दृष्टीत योग्य होतं. ४० सालानंतर या भूमिकेचा अतिरेक झाला आणि ४८ साली तर राष्ट्राचे प्रश्न सोडवण्यासाठी निर्माण झालेल्या संघाची प्रतिमा देशातील बहुजनसमाजाचा एक नंबरचा शत्रू म्हणण्याइतकी वाईट झाली. त्यानंतर ७४ सालापर्यंत संघामध्ये पुष्कळ विचारमंथन झालं आणि त्यावेळी प्रथमच जयप्रकाश नारायण यांच्या विहारमधल्या संघर्षात संघ उतरला. आणीबाणीविरुद्धच्या संघर्षात अग्रभागी राहिला. हे बदल विचारपूर्वक घडलेले आहेत. ७५/७६ मधला संघर्ष ४८ च्या संघर्षाप्रमाणे केवळ संघबंदीविरुद्ध नव्हता, याची साक्ष पटण्यासाठी बिहार आंदोलनातला सहभाग आतापर्यंत पुरेसा वाटला; पण यापुढं तो वाटणार नाही. केवळ आणीबाणीच्या काळातील मर्दुमकीचं यशोगान गेली अडीच वर्षं चालू होतं तेवढ्यानं भागणार नाही. देशाच्या इतिहासाला काही भरीव कार्य करून वळण द्यायचं असेल तर 'सर्वेषाम् अविरोधेन' ही भूमिका सोडावीच लागेल. स्थितिवाद सोडावा लागेल, हितसंबंध दुखवावे लागतील, काही हितसंबंधियांचा रोषही पत्करावा लागेल, हा केरळच्या कामातून शिकण्याचा मुख्य धडा आहे. संघर्षाकडे केवळ रक्तपात, प्रचारयुद्ध म्हणून न पाहता सामाजिक समस्यांची उकल करण्याची आणि संघटनेला व्यक्तिमत्त्व देण्याचं साधन म्हणून पाहावं लागेल. गांधीजींचा सत्याग्रह हा काही नेभळट माणसांचा कार्यक्रम नव्हता. त्यात रक्तपात नव्हता; परंतु दोन प्रकारचा संघर्ष होता. एक स्वतःच्या मतांसाठी सत्याग्रहासारखा आत्मक्लेशाचा मार्ग स्वीकारताना स्वतःशीच करावा लागणारा संघर्ष, तर दुसरा आपल्यासारख्या इतर अनेक सत्याग्रहींच्या समवेत केलेला ब्रिटिश राजवटीविरुद्धचा संघर्ष. पहिला वैयक्तिक, नैतिक पातळीवरचा, दुसरा संघटित, राजकीय पातळीवरचा. संघानं ४८ आणि ७५ दोन्ही वेळी सत्याग्रहाचं तंत्र योग्य प्रकारे वापरलं आहे, मंत्र तितकासा जपलेला दिसत नाही. हे सत्याग्रह मुख्यतः आपली ताकद दाखविण्यासाठी आणि प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहाण्यासाठी केले गेले. संघाच्या इतिहासात या घटना फार गौरवाच्याच आहेत; परंतु राष्ट्राच्या इतिहासात संघानं केलेल्या संघर्षांना महत्त्व यायचं असेल तर ते राष्ट्रीय समस्यांसाठी व्हावे लागतील. आणीबाणीच्या काळाचं वैशिष्ट्य असं की, राष्ट्रीय समस्या आणि संघापुढील समस्या काही मर्यादेपर्यंत एकच होत्या. म्हणून तेव्हा केलेल्या संघर्षाला दोन्ही अर्थ प्राप्त झाले. जनतेचं प्रेम मिळालं, केवळ सामर्थ्याची पावती मिळाली नाही.

असे संघर्ष करताना दुखवावे लागतील असे हितसंबंध केवळ हिंदु जातिव्यवस्थेमुळं आणि जातिव्यवस्थेचाच प्रभाव असलेल्या अर्थव्यवस्थेमुळे निर्माण होणारेच असतील असं मात्र नाही. गेली पन्नास वर्षं देशात संघ होता; परंतु सामाजिक समस्या सोडवण्यासाठी फारसा कार्यशील नव्हता आणि याच काळात समाजवादी, साम्यवादी या डाव्या चळवळींनी स्वतःच्या ताकदीप्रमाणे पण हितसंबंध मोडू पाहणारे, समाजव्यवस्थेची जुनी चौकट मोडू पाहणारे संघर्ष केले. त्यामुळं त्यांचेही हितसंबंध संघाला आड येणारे आहेत. त्याबरोबरच करुणा ही पायाभूत भावना मानून देशभर धर्मप्रसाराच्या अंतःस्थ हेतूनं मिशनरी मंडळींनी जे सेवाकार्य केलं त्यांचेही हितसंबंध आड येतील. सर्वोदयी मंडळींनी काही ठिकाणी स्थानिक स्वरूपाची कार्यं केली आहेत त्यांचेही आणि सर्वांत शेवटी काँग्रेस हाच एक पक्ष अजूनही अखिल भारतीय पातळीवर सत्ताधारी पक्ष म्हणून उभा राहू शकणारा पक्ष असल्यामुळं त्याचे सत्तेचे हिशेब आड येतील. कामगारांचे प्रश्न, सामाजिक समतेचा प्रश्न, ग्रामीण जीवनमान उंचावण्याचा प्रश्न, आदिवासींना या देशात सामावून घेऊन त्यांचा विकास घडवण्याचा प्रश्न हे व असे अनेक प्रश्न संघाने हाताळले नाहीत म्हणून त्याच्या नावानं खडे फोडणारे हेच लोक संघ जर खरोखरच या क्षेत्रात पसरू लागला तर वेगवेगळ्या प्रकारे प्रतिकार करतील. मार्क्सवाद्यांचा प्रतिकार सशस्त्र असेल, समाजवाद्यांचा वैचारिक स्वरूपाचा असेल, सर्वोदयी आणि मिशनरी हे करुणा आणि कायदा या दोन्हींच्या साहाय्याने प्रतिकार करतील. (धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळं उडालेली खळबळ आठवून पाहण्यासारखी आहे.) आणि काँग्रेस मुख्यतः प्रचारयुद्ध व निवडणुकांच्या राजकारणामधून संघाला सत्तेपासून वंचित ठेवण्यासाठी इतर कोणाशीही हातमिळवणी करील, आजसुद्धा करतेच आहे. तेव्हा एक आदेश काढून संघर्ष करता येणार नाहीत, संघर्ष टाळून देशापुढील प्रश्न सोडवता येणार नाहीत, उलट स्थितिवादी विचारसरणीचा आणि हितसंबंधांचे रक्षण करण्याचा आरोपच अधिक घट्ट होणार, अशा कोंडीमध्ये आता संघाचं कार्य

सापडलं आहे. अद्याप या बाबतीतली भूमिका स्पष्ट झालेली नाही. प्रौढसाक्षरता व आदिवासींचं कल्याण ही दोन संघर्षयुक्त क्षेत्रंच सध्या निवडण्यात आली आहेत. ही घटना मात्र बोलकी आहे. 'देशभर संघाला लढूनच वाढावं लागेल' असं श्री. बाळासाहेब देवरस केरळातल्या कार्यकर्त्यांना म्हणाले असं ऐकलं. ते लढे कोणत्या स्वरूपाचे व कोणाशी होतील याचं सविस्तर विवरण त्यांच्या विधानाच्या संदर्भातच केलं आहे. केवळ तेलीचेरीत किंवा केरळात धैर्यानं टिकून राहणं अभिमानास्पद जरूर आहे; पण पुरेसं नाही. बहुजनसमाजात अधिकाधिक पसरणं हाच राजरस्ता आहे.

## क्रांतीचे मार्ग

मार्क्सवादी कम्युनिस्टांनी केरळातील संघाच्या आव्हानाला कसं तोंड दिलं त्याचं वर्णन आपण पाहिलं आहे आणि मार्क्सवाद्यांच्या राजकीय इतिहासाचा धावता आढावाही घेतला आहे. केरळमधील सत्तेचं राजकारण, अखिल भारतीय राजकारणामधली मार्क्सवाद्यांची भूमिका आणि सद्यःस्थिती आणि आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळींच्या संदर्भात केरळमधील घडामोडींचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यातून केवळ मार्क्सवाद्यांबद्दलच काही महत्त्वाचे निष्कर्ष सापडू शकतील असं नाही. ते तर सापडतीलच; परंतु भारतीय समाजाच्याही काही वैशिष्टयपूर्ण सवयींवर प्रकाश पडू शकेल.

विसाव्या शतकात, विशेषतः रशियन राज्यक्रांतीच्या यशाच्या बातम्या १९२५ नंतर जगभर पसरू लागल्यावर अविकसित आणि अर्धविकसित देशांतील वैचारिक व सामाजिक चळवळींचा ओढा साम्यवादाकडे नेहमीच राहिलेला आहे. मार्क्सचा आवाज हा राष्ट्रवाद ज्या काळात फोफावत होता, त्या काळातला एक आंतरराष्ट्रीय आवाहन करणारा अत्यंत प्रभावी आवाज होता हे सर्वमान्य आहे. एकाच वेळी आर्थिकदृष्टया मागास असलेल्या कामगारवर्गाला आणि प्रस्थापिताला कंटाळलेल्या तरुण बुद्धिजीवी वर्गाला मार्क्सच्या Proletarians of the world unite ही हाक भिडली याचं कारण ती हाक देणारा आवाज देश, धर्म, जात, वंश यांच्या सीमा तोडणारा एक नवा सिद्धान्त वापरत होता. Workers of the world unite! हे मार्क्सच्या मूळ घोषणेचं इंग्रजी भाषांतर आहे. मूळ जर्मनमध्ये Proletarians असा शब्द आहे आणि त्या शब्दाची व्याप्ती इंग्रजीमधल्या workers शब्दापेक्षा पुष्कळच मोठी आहे असंही अभ्यासक आता म्हणू लागले आहेत. इंग्रजीतलं workers हे भाषांतर चुकलं असं म्हणण्यापेक्षा ते एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीतलं भाषांतर होतं आणि Proletarians मध्ये येणारे शेतमजूर, कारागीर, छोटे शेतकरी यांच्यापेक्षा इंग्लिश समाजात कामगारांचा वर्गच अधिक मोठा होता, त्यांच्या समस्या अधिक स्पष्ट होत्या, भेडसावणाऱ्या होत्या. म्हणूनच त्या वेळी भाषांतर करताना तोच वर्ग डोळ्यांपुढे ठेवला गेला आणि तो शब्द वापरण्यात आला. ही मीमांसा अधिक योग्य ठरेल. औद्योगिक क्रांतीचा झपाटा, त्यामुळे आलेली सुबत्ता आणि त्या सुबत्तेचं विषम वाटप, त्यामधून परत बळकट होणारी भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि प्रकर्षाने जाणवणारी गरीब–श्रीमंत ही दरी या दुष्टचक्राकडे काळजीपूर्वक पाहू लागलेल्या ब्रिटिश विचारवंतांना, बुद्धिजीवींना प्रस्थापितांशी सरळ सरळ ज्यांचे हितसंबंध घासू शकतात असा कामगारवर्ग हाच एक प्रमुख वर्ग दिसला आणि त्यांनी कामगारांना हाक दिली. आंतरराष्ट्रीय आवाका आणि दलितांना आशावाद ही मार्क्सच्या हाकेची दोन प्रमुख वैशिष्टये होती, अगदी नवीन होती आणि म्हणूनच विसाव्या शतकात स्वातंत्र्याचा वसंतऋतू बहरात आल्यावर मुख्यतः अविकसित देशातले आर्थिकदृष्टया मागासलेले वर्ग आणि त्यांच्या उन्नतीचा ध्यास घेऊ पाहणारे मध्यमवर्गीय सुशिक्षित यांचा ओढा मार्क्सवादाकडे वळत राहिला आहे.

साम्यवादी क्रांती यशस्वी करण्याच्या चार ठळक styles या पन्नास वर्षांच्या काळात जगाने पाहिल्या आहेत. रशिया, चीन, युगोस्लाव्हिया आणि क्यूबा या चारी देशांनी साम्यवादाचा स्वीकार केला असला तरी त्यांचे मार्ग आणि तंत्रं यांच्यात पुष्कळच फरक आढळतो. रशियन साम्यवाद्यांची संघटना मुख्यतः युरोपीय देशांतून, त्यांच्या आश्रयानं निर्माण झाली आणि तिनं रशियात साम्यवाद आणला व रशियन सरंजामदारी जवळपास दडपून टाकली. चिनी क्रांतीमध्ये देशातल्या देशातच राहून, वाढून देशातल्या प्रस्थापित वर्गाशी मुख्यतः स्वतःच्या हिमतीवर लढा देऊन आणि पोथीनिष्ठेपेक्षाही अनुभवांवर अधिक भिस्त ठेवून वाटचाल झालेली दिसते–व्हिएटनामची शैलीही तशीच दिसते. पारंपारिक जीवनपद्धतीचा समूळ उच्छेद या देशात झालेला नाही. युगोस्लाव्हियाचा साम्यवाद हा अधिक उदारमतवादी आणि युरोपीय संदर्भातच विकसित झाला आणि क्यूबामध्ये तर गनिमी काव्याचे तंत्र वापरून, भौगोलिक परिस्थितीच्या साहाय्याने ते यशस्वी करून स्वतःला साम्यवादी म्हणवणारांनी लष्करी क्रांती केली आणि देश छोटासा असल्याने व मुख्य प्रश्न आर्थिक विषमतेचा असल्याने तिथे नवी घडी बसवणं सहज शक्य झालं. अन्यथा मार्क्सवादी पक्ष, संघटना, अभ्यासमंडळे, दलितांचे लहान–मोठ्या प्रश्नांवरून उभे होणारे लढे हे मार्ग क्यूबामध्ये वापरले गेले नाहीत, त्यांना तशी आवश्यकताही भासली नाही. क्यूबन क्रांतिकारक हे मुळात परिवर्तनवादी, राष्ट्रवादी होते आणि राष्ट्रवादी क्रांती यशस्वी करून, तिच्यासाठी फार मोठी किंमत दिल्यावर मग त्यांनी साम्यवादी जीवनपद्धतीचा स्वीकार केला असं म्हणणं जास्त सयुक्तिक वाटतं. क्रांती यशस्वी होताच, म्हणजे सत्ता हाती येताच हे चारी देश राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या कामाला अतिशय झपाट्याने लागले. आणि दलितवर्गाचे नेतृत्व मध्यमवर्गाने करून संप, मेळावे, मोर्चे, अधिवेशने, ठराव, समित्या, पक्षकार्य, संघटना वगैरे मार्गांचा अवलंब करून आपल्या समाजातील विषमतेचा प्रश्न सोडवू पाहणारे साम्यवादी राजकीय पक्ष हे मुख्यतः युरोपीय देशातूनच उरले हे लक्षात घेतलं पाहिजे. भारतीय कम्युनिस्ट चळवळीचं स्वरूपही तसंच राहिलं आहे. संपूर्ण देशाची सत्ता हाती देणाऱ्या क्रांतीपासून ही चळवळ फारच दूर राहिली आणि आजही चांगलीच दूरच आहे, ती का याचंही उत्तर केरळच्या मीमांसेमध्ये मिळू शकेल.

वर वर्णन केलेल्या चारही Styles पैकी कोणतीच पद्धती भारतात येऊ शकली नाही. कारण भारतात कम्युनिस्ट चळवळीची सुरुवात होण्यापूर्वी स्वातंत्र्यप्राप्ती आणि समाजसुधारणा या दोन्हीसाठी चळवळी झाल्या होत्या. एवढेच नव्हे तर पुनरुज्जीवनवादी राष्ट्रवादी चळवळीही सुरू झालेल्या होत्या. शस्त्राचाराचेही प्रयत्न करून

झालेले होते. इंग्रजांच्या काळात मिळालेल्या उदारमतवादी शिक्षणामुळे समाजाच्या उन्नतीसाठी अनेक मार्गांकडे भारतीय नेतृत्वाचं लक्ष आधीच वेधलं गेलेलं होतं. या शतकाच्या तिसऱ्या दशकात जेव्हा कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला तेव्हा आणखी एका नव्या दिशेकडे लक्ष वेधलं गेलं इतकंच. अमक्याच एका तत्त्वज्ञानाशिवाय तरणोपाय नाही अशी भारतीय समाजाची मनोवृत्ती पूर्वीही नव्हती, कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला तेव्हाही नव्हती आणि आताही नाही. त्यामुळे वर्गविग्रह, वर्गलढा, वर्गमुक्त समाज वगैरे संकल्पनांचा म्हणावा इतका प्रभाव भारतीय जनतेवर कधी पडू शकला नाही. वर्गकलहापेक्षा वर्णकलह इथे तीव्र होता आणि त्या पातळीवर लहान-मोठ्या प्रकारचे लढे झालेले होते. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ, डॉ. आंबेडकरांचे कार्य किंवा केरळमध्ये श्रीनारायणगुरूंनी केलेलं समतेचा संदेश देणारं कार्य यामधून वर्णलढा एकतर लढला गेला किंवा वर्णभेदाची धार बोथट तरी करता आली आणि वर्णव्यवस्थेमुळे दडपले गेलेल्यांची अस्मिता जागी करता आली. २० सालानंतर भारतात दोन महत्त्वाच्या संघटना पसरत गेल्या. काँग्रेसची सर्वांचं स्वागत करणारी समावेशक संघटना आणि रा. स्व. संघाची फक्त हिंदूसाठी कार्य करणारी पुनरुज्जीवनवादी संघटना. या दोन्ही संघटनांमध्ये वर्णभेदाला स्थान नव्हतं हे ध्यानात ठेवलं पाहिजे. मात्र गांधींनी वर्णभेदाचे, जातिभेदाचे उच्चाटन करण्यासाठी जसे प्रयत्न केले, त्यासाठी उपोषण, लेखन, आश्रम, इतर प्रचारमाध्यमांचा वापर हे मार्ग वापरले तसे काही संघाने वापरले नाहीत, परंतु हिंदू समाजाच्या आत राहूनच सर्व जाती आणि वर्ण यांना समान पातळीवर एकत्र येता येईल अशी एक मर्यादित जागा संघाने उपलब्ध करून दिली हे मान्य करावं लागेल. त्यामुळे, वर्गलढा तर अस्तित्वात नाही, वर्णलढा अस्तित्वात असला तरी सगळा समाज काही त्या निमित्ताने संघटित करता येत नाही, उदारमतवादी शिक्षणामुळे कोणत्याही प्रश्नाच्या सोडवणुकीचे अनेक मार्ग समाजाला जाणवतात, मान्य होतात आणि म्हणूनच कोणतीही विग्रहाची, विद्रोहाची भावना पेटत नाही अशा विचित्र कोंडीमध्ये भारतामधली कम्युनिस्ट चळवळ तेव्हाही सापडली व आजही त्या कोंडीतून बाहेर पडलेली नाही.

भारतामध्ये दुसरा सहज संघटित करता येण्यासारखा फार मोठा समाज मुसलमानांचा होता; परंतु धर्मकलहदेखील महत्त्वाचा असतो हे ध्यानात यायला कम्युनिस्टांना फार वेळ लागला किंवा त्यांनी तो भेद महत्त्वाचा मानलाच नाही. शिवाय १९२० सालापर्यंत भारतीय मुसलमानांची एक स्वतंत्र प्रतिमा तयार झालेलीच होती. अलिगढ मुस्लिम विद्यापीठासारख्या संस्था निर्माण होऊन स्थिर झालेल्या होत्या. इंग्रज राज्यकर्त्यांनी मुसलमानांचा वेगळा गंड कायम टिकविण्याची काळजी घेतलेलीच होती. मुसलमानांच्या वेगळ्या शक्तीचा प्रत्यय येऊ लागताच दोन प्रतिक्रिया उमटल्या. मुसलमानांशी जमवून घेतल्याशिवाय देशाला स्वातंत्र्य मिळणं आणि टिकणं अशक्य आहे, ही गांधींची प्रतिक्रिया तर मुसलमान समाज बलवान, संघटित होऊन डोईजड होण्याआधी हिंदूंची संघटना उभी करून हिंदूसमाज संघटित, अनुशासनबद्ध आणि बलवान करणं ही त्या प्रतिक्रियेची प्रतिक्रिया. मोपल्यांच्या बंडासारख्या घटनेचे फार खोल परिणाम सावरकर आणि हेडगेवार या दोघाही हिंदुत्ववादी नेत्यांवर झाले आणि त्यांनी 'कार्यसाधनाची' लगबग केली हा इतिहास आहे, त्यामुळे हा संघर्षही कम्युनिस्टांना स्वतःसाठी कधीच वापरता आला नाही.

## डाव्या चळवळीची शोकांतिका

लेनिन, टिटो, माओ, हो–चि–मिन्ह यांच्या तोडीचं नेतृत्व भारतीय कम्युनिस्ट पक्षात कधीच उदयाला आलं नाही हे खरं आहे, त्यात चळवळीचा दोष नाही. कारण असे नेते दुर्मिळच असतात; परंतु त्याच वेळीं गांधी–नेहरू हे काँग्रेसचे नेते, डॉ. हेडगेवार आणि स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदूपुनरुत्थानवादी नेते, सुभाषचंद्र बोस, जयप्रकाश नारायण हे समाजवादी विचारांचा पुरस्कार करणारे नेते आणि महमदअली जिना यांच्यासारखा मुस्लीमनेता यांच्या तोडीचं नेतृत्वही कम्युनिस्ट पक्षाला लाभलं नाही, हा केवळ परिस्थितीचा दोष म्हणून सोडून देता येणार नाही. वर उल्लेख केलेले सर्व नेते हे सारख्याच कुवतीचे होते, असंही इथं सुचवायचा हेतु नाही; परंतु या सर्व नेत्यांना अखिल भारतीय प्रतिमा होती आणि आहे. अशा प्रकारची अखिल भारतीय प्रतिमा कोणत्याही कम्युनिस्ट नेत्याला भारतात लाभलेली नाही. कम्युनिस्ट पक्षाचा अखिल भारतीय अध्यक्ष असणं आणि अखिल भारतभर समाजामधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळणं या गोष्टी अगदी वेगळ्या आहेत. भारतातल्या सामाजिक वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केल्यामुळं, तिची वैशिष्टचं नीट लक्षात न घेतल्यामुळं अशा प्रकारची शोकांतिका कम्युनिस्ट नेतृत्वाच्या वाट्याला येणं अगदी अटळ होतं. डांगे, अच्युत मेनन, इ. एम. एस. नंबुद्रीपाद, ज्योती बसू हे सगळेच नेते मुख्यतः प्रादेशिक नेते राहिले आहेत. डॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांना निदान आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली ( तशी ती एखाद्या सन्मानचिन्हाच्या रूपानं डांगे यांनाही बहाल करण्यात आली आहे) परंतु प्रादेशिक नेता म्हणण्याइतकादेखील त्यांचा भारतामधला अनुयायीगण मोठा नव्हता. मास मुव्हमेंटमधून समाजाला क्रांतीकडे नेणाऱ्या चळवळीला खराखुरा मासलीडर कधीच मिळाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. मग उरले दोन प्रांत आणि इतर प्रांतांमधली काही लहान–मोठी शक्तिस्थळं !

भारतामधली राष्ट्रवादी चळवळ ऐन भरात असल्यामुळं मार्क्सवादाच्या आंतरराष्ट्रीय आवाहनाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही आणि इथल्या कलहांचं स्वरूप ओळखून परिवर्तन घडवण्याइतका अभ्यास आणि प्रतिभा नसल्यामुळं तो संघर्षही विधायक कार्यासाठी वापरला गेला नाही. भारतीय माणूस कोणत्या प्रकारचा संघर्ष करू शकेल हेही ध्यानात आलं नाही. मात्र या मुद्द्यावर बरेच जण चकले आहेत. सावरकरवादी, सशस्त्र उठावाचे पुरस्कर्ते क्रांतिकारक व सुभाषचंद्र बोस हे अखिल भारतीय प्रतिमा आणि अनुयायित्व असलेले नेते जिथे चकले किंवा यशस्वी होऊ शकले नाहीत, तिथं मुळातच समाजाचं मन जाणण्यात अपयश आलेले कम्युनिस्ट चकले यात काहीच आश्चर्य नाही. चकले नाहीत ते तीन जण, गांधी, डॉ. हेडगेवार आणि जिना. गांधींनी साधुत्व, अध्यात्म, सोशिकता यांचं एकच रसायन सत्याग्रहाच्या कार्यक्रमात तयार करून त्यालाही

हौतात्म्याची डूब देण्यात यश मिळवलं; हेडगेवारांनी प्रत्यक्ष शस्त्राचाराला पाठिंबा न देता लष्करी धर्तीवर शस्त्रास्त्रांचं जुजबी शिक्षण देणारी व त्यातून थोडी-फार लढाऊ वृत्ती निर्माण करणारी संघटनापद्धती स्वीकारली; परंतु तिच्यामध्ये आक्रमकतेची जागा उत्तरोत्तर आत्मरक्षणानं घेतली. जिनांनी मात्र मुसलमानांचा विभक्त राष्ट्रवाद जोपासला आणि भावनात्मक पातळीवर प्रश्न नेताच रक्तपाताला सिद्ध होण्याची त्यांची ताकदही जोपासली. म्हणूनच संघर्ष प्रथम काँग्रेस आणि इंग्रज सरकार यांच्यात झाला व नंतर हिंदू आणि मुसलमान यांच्यात झाला. आत्मरक्षणात धन्यता मानणारा संघ आणि या संघर्षात कुठूनही शिरता न आलेले कम्युनिस्ट त्या वेळी संघर्षामध्ये नव्हते. एवढंच नव्हे तर नंतर अनेक काळ आपापल्या भूमिकांचं दोघंही जण तात्त्विक समर्थन करीत होते. आज मात्र ते एकमेकाविरुद्ध लढत आहेत. निदान भारतातल्या एक-दोन कोपऱ्यात तरी लढत आहेत.

## गांधी आणि हेडगेवार

संघ आणि कम्युनिस्ट यांच्यातला प्रत्यक्ष लढा सुरू व्हायला इतका काळ लागावा हेदेखील कम्युनिस्टांना अखिल भारतीय प्रतिमा नसल्याचंच द्योतक आहे. एक काळ असा होता की जनसंघापेक्षा कम्युनिस्टांना लोकसभेत अधिक प्रतिनिधित्वही होतं. परंतु ते मुख्यत: दोन प्रांतांमधे होतं आणि जनसंघाला राजकारणात उतरून फार दिवस झालेले नव्हते. जर्मनी आणि इंग्लंड यांचा महायुद्धपूर्व इतिहास या बाबतीत पाहण्यासारखा आहे. दोन्ही देशांमध्ये कम्युनिस्ट विचारसरणीचा प्रभाव वाढू लागताच राष्ट्रवादी चळवळींनी मूळ धरलं आणि त्या झपाट्याने फोफावत गेल्या. जर्मनीत तर हिटलरनं कम्युनिस्टांच्या नि:पाताची मोहीमच आखून ती यशस्वी केली. इंग्लंडमध्ये फॅसिस्ट चळवळ निर्माण होऊन कम्युनिस्ट चळवळीला तिनं उत्तर दिलं. मजूर पक्षाचं सरकार येऊनही इंग्लंडमध्ये कम्युनिस्टांच्या हातात फारसं काही कधी पडू शकलं नाही. चँग कै शेकनं देखील परकीय सत्तांची मदत घेऊन माओची चळवळ उखडून टाकण्याची पराकाष्ठा केली, परंतु माओची प्रतिभा अधिक विजयी ठरली. भारतात मात्र राष्ट्रवादी चळवळ आणि डावी चळवळ एकमेकाविरुद्ध लढायला उभी राहायला वेळ लागला. डावी चळवळ त्या अर्थानं देशभर पसरली नव्हती हे एक महत्त्वाचं कारण; दुसरं कारण म्हणजे देशभर पसरून झाल्यावर पुढे काय करायचं हे त्यावेळच्या सवाच्या नेतृत्वाला फारसं कळत नव्हतं. संघटना, संपर्क, कार्यक्रम, उपस्थिती अशा कर्मकांडाच्या प्रलोभनात ते सापडलेलं होतं. संघटनेच्या माध्यमातून संघर्ष उभे करून सामाजिक परिवर्तन घडवण्यापेक्षा 'सर्वेषाम् अविरोधेन' संघटना करण्याचा मूलमंत्र घोकत राहणंच संघवाद्यांना अधिक महत्त्वाचं वाटत होतं. मात्र केरळच्या विशिष्ट परिस्थितीने या दोन संघटनांची एकमेकींशी 'खरा लढा तुमच्यामध्ये आहे' अशी ओळख करून दिली.

काँग्रेस आणि रास्वसंघ यांच्या वैचारिक भूमिकांमध्ये पुष्कळच फरक असला तरी कार्यपद्धतींमध्ये एक महत्त्वाचं साम्यही होतं व आहे. गांधी आणि डॉ. हेडगेवार या दोन्ही नेत्यांनी भारतीय माणसाचं मन ओळखून लहानात लहान माणसाला रोज करता येईल अशा कृती शोधून काढण्यावर भर दिला. चरखा, टकळीवर सूत काढणं आणि रोज संध्याकाळी एकत्र जमून लाठी फिरवणं, खेळणं यांचं दृश्य स्वरूप भिन्न होतं, पण मूळ हेतू एकच होता. शिवाय प्रार्थना, पद्यगायन, भाषण किंवा बौद्धिक वर्ग दोन्हीकडे कायमच होते. त्यातून दोन्ही कामांच्या शैलीत सांस्कृतिकता आली. गांधींच्या शैलीतली आध्यात्मिकता हेडगेवारांच्या शैलीत नव्हती परंतु नंतर गोळवळकरांनी तोही भाग संघामध्ये आणला. यात कुठेही रोजच्या रोज उठून कोणाशी लढायचं आहे, बंदुकीच्या फैरी झाडायच्या आहेत किंवा तलवारीचे खणखणाट व्हायचे आहेत अशा प्रकारचं भडक आणि सामान्य माणसाला भेदरवून टाकणारं आवाहन केलेलं नव्हतं. आदर्श राज्याची गांधींची कल्पना जरा मवाळ-रामराज्याची होती, तर संघामध्ये हिंदूंचं बलवान राष्ट्र डोळ्यापुढे आणलं जात होतं. तेही मुख्यत: भूतकाळातलं-पुराणकाळातलं, की ज्या काळात विसाव्या शतकातली प्रगत राष्ट्रं अस्तित्वात देखील नव्हती. पारतंत्र्याविरुद्ध फार छोटा लढा देऊ शकणाऱ्या सर्वसाधारण भारतीय माणसाला या दोन शैली जशा भावल्या तशी चौकट मोडणारी, धर्माला थोतांड म्हणणारी, रक्तपाताशिवाय क्रांती नाही म्हणणारी कम्युनिस्टांची शैली कधीच फारशी भावली नाही. ग्रामीण बहुजनसमाज तर दूरच राहिला. आधीच देशाच्या कानाकोपऱ्यात अनेक धार्मिक, सांस्कृतिक उपक्रम शतकानुशतके चालूच होते (वारकरी संप्रदायासारखे) त्यातच गांधींच्या शैलीची आणखी एक भर पडली, संघाच्या उपक्रमाची पडली. अशा प्रकारचा उपक्रम कम्युनिस्टांना भारतात शोधता आला नाही.

मात्र जिथे आर्थिक विषमता पराकोटीची होती तिथे कम्युनिस्टांची ताकद वाढली. शहरामध्ये भांडवलदार व व्यापारी आणि ग्रामीण भागात जमीनदार व सावकार हे दोन वर्गशत्रू अस्तित्वात होतेच. त्यांच्याविरुद्ध केवळ आर्थिक प्रश्नांसाठी संघटना उभ्या उभ्या करता आल्या, लढे उभारता आले परंतु पगारवाढ, मजुरीचे दर, कामाचे तास, बोनस अशा प्रश्नांवर उभ्या राहणाऱ्या संघटनांमधून आमूलाग्र सामाजिक क्रांतीची बीजे पेरता येतील ही कल्पनाच भ्रामक होती, फोल होती. आयुष्यभर धडपडून उभी केलेली मुंबईतली कामगार चळवळ जॉर्ज फर्नांडिस यांना अटक होताच, त्यांच्या मागे पोलिस लागताच पेटून उठली नाही किंवा दलितांवर एका भागात अत्याचार होताच दुसऱ्या भागातील दलितांच्या संघटना केवळ निषेधाचे शब्दच उच्चारित राहिल्या ही वस्तुस्थिती भयानक होती; पण अटळ होती. आमूलाग्र राजकीय किंवा सामाजिक परिवर्तनासाठी आपण धडपडायचं आहे ही जाणीव उरलीच नव्हती. सामाजिक समता व मूलभूत हक्क हे महत्त्वाचे वाटतच नव्हते. पगारवाढ, बोनस अशा आर्थिक समस्या असतील तरच लढा, संप, मेळावे, मोर्चे, घेराओ, बंद, गोळीबार, शोकसभा! समस्या नसताना कार्यकर्त्यांची शाळा चालू ठेवायचीच असते, त्यासाठी विशिष्ट कर्मकांड रचायचं असतं, लोकप्रिय करायचं असतं हे गांधी-हेडगेवार यांनीच फक्त ओळखलं. गांधींच्यानंतर काँग्रेसनेदेखील अशा प्रकारची शाळा जोमाने सुरू राहण्यासाठी प्रयत्न केले नाहीत व त्यांची वाताहत झाली. गोळवलकरगुरुजी एका बाजूला का होईना ती शाळा चालवत होते, त्याची फळं ७५ नंतरच्या राजकारणात संघाला जे महत्त्व आलं आहे आणि झपाट्यानं वाढतं आहे त्यातून आपल्याला दिसतात. आजही केरळात फारसं सामाजिक परिवर्तन शक्य नाही, संघ मारामाऱ्यांना बधत नाही, नेहमीचे मार्ग बोथट झालेले आहेत अशा परिस्थितीत कम्युनिस्ट- मार्क्सवादी सापडले आहेत, गोंधळलेले आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसची मुळातली सर्वसमावेशक शैली राजकीय-सामाजिक-आर्थिक क्षेत्रात जवळपास सर्वभक्षक बनत गेली. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस हेच स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झटणारं प्रभावी माध्यम होतं, मुसलमान अल्पसंख्यांकासाठी काँग्रेसनं तडजोडी स्वीकारल्या होत्या, ख्रिश्चन अल्पसंख्यांकाना नेहमीच दिलासा दिलेला होता. ही सर्वसमावेशक प्रतिमा पुढे करून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेसने राजकीय क्षेत्रात प्रथम दरारा निर्माण केला, लोकशाही

मार्गाने परंतु हुकूमशाहीशी तुलना होऊ शकेल अशा प्रकारची राजकीय सत्ता हस्तगत केली. या देशात काही घडवायचं असेल तर काँग्रेसमध्येच गेलं पाहिजे असं अनेक डाव्या विचारसरणीच्या मंडळींना या काळातच वाटू लागलं. १९५६ मध्ये काँग्रेसनं समाजवादी तत्त्वांचा स्वीकार केल्याची ग्वाही दिली आणि उरलीसुरली तात्त्विक अडचणही नष्ट झाली. ग्रामीण, स्थानिक, प्रांतिक पातळीवर जे काही नवं नेतृत्व उदयाला येऊ लागलं ते काँग्रेसनं या काळात अक्षरशः खाऊन टाकलं, त्याची किंमत त्या व्यक्तींना दिली, त्यांच्या मतदारसंघामधून धरणं, कालवे, रस्ते, कॉलेजे, रुग्णालये, कारखाने काढून या ना त्या प्रकारे काँग्रेसनेच ते भाग हस्तगत केले. स्वतःच्या मजूर संघटना, शेतकरी संघटना तर काढल्याच; पण अन्य संघटनात फूट पाडून त्यांच्यातलं नेतृत्व आपल्याकडे आणलं. चारित्र्य किंवा तत्त्वज्ञानाला या काळात काँग्रेसमध्ये कधीच महत्त्व नव्हतं– नव्या नेतृत्वाला विकत घेण्याचा सवाल होता. विकलं जाण्याची सवय या नेतृत्वालाही फार झपाट्यानं लागली. एक जनसंघ सोडला तर इतर कोणताही विरोधी पक्ष या खरेदीतून सुटला नाही. आंबेडकरांची चळवळ, सत्यशोधक चळवळ, समाजवादी पक्ष, साम्यवादी पक्ष, शेकापसारखे प्रांतिक पक्ष या सगळ्यांमध्ये असे विकले जाणारे नेते होते, ते काँग्रेसनं ताब्यात घेतले. एक संघ सोडला तर कोणतीही संघटना या काळात सत्ता-निरपेक्षपणे काम करीत नव्हती. काँग्रेसच्या समाजवादी भाषेला भुलून काही भाबडे नेते काँग्रेसशी सहकार्य करू लागले, तर काही सरळसरळ राजकीय स्वार्थ पाहणारे नेते आपली योग्य ती किंमत वसूल करून काँग्रेसमध्ये गेले. ६९ सालच्या काँग्रेस फुटीनंतरही अशांनी इंदिरा गांधींच्या पुरोगामी भाषेला भुलून त्यांच्या सरकारला अल्पमतात असताना पाठिंबा जाहीर केला. हे सर्व चुकत होतं याचा साक्षात्कार झाला तो मात्र फार उशीरा. ७१ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सर्वभक्षकतेची पराकोटी गाठलेल्या काँग्रेस पक्षाला जनतेनं हुकूमशाहीसदृश सत्ता दिली आणि हुकूमशहावृत्तीच्या इंदिराजींचे तडाखे जाणवू लागले ! या तडजोडीतून, विकले जाण्यातून मार्क्सवादी कम्युनिस्टही सुटलेले नाहीत. ६४ साठी काँग्रेसशी हात मिळवण्याचा आरोप करून उजव्या कम्युनिस्टांना पक्षाबाहेर काढणारे हे लोक काँग्रेसशी जमवून घेतच होते. केरळात घेण्यापेक्षा देशात जास्त जमवून घेत होते. आता नुकत्याच घडलेल्या राजकीय परिवर्तनात ते पुन्हा त्याच बाजूला उभे आहेत. ७७ च्या लोकसभा निवडणुकीत मात्र ते ठामपणे काँग्रेसविरोधात उभे राहिले हे मान्य केलं पाहिजे. काँग्रेसच्या या सर्व भक्षकतेमुळे जनसंघ किंवा संघ यांच्यापेक्षा डाव्या चळवळीचंच जास्त नुकसान झालं आहे, आजही होत आहे.

त्यामुळे अखिल भारतीय पातळीवर मार्क्सवादी संघाशी केरळात वागले तसे वागू शकणार नाहीत त्यांची ती ताकद नाही. ताकद दाखवण्याचा केरळमधला प्रयत्नही फारसा उपयोगी पडलेला नाही. उलट बहुजनसमाजापुढे संघाच्या स्वयंसेवकांचंच चित्र शूर आणि सज्जन असं उभं राहात आहे, त्यामुळेही संघाचं काम वाढतं आहे याची कबुली केरळातले एकेकाळचे मार्क्सवादी देतातच. मुस्लिम लीगशी जमवून घ्यावं लागलं हे त्यांचं दुर्दैव आहे. संपूर्ण भारतीय सत्तेच्या राजकारणातच तो विचित्र खोडा आहे व मार्क्सवादी नेत्यांना सत्ता टिकवण्याच्या घडपडीत त्यावर उपाय शोधता आलेला नाही हेही खरं आहे. मार्क्सवादी ज्या दुसऱ्या प्रांतामध्ये सत्ताधारी आहेत तिथेही मुस्लिम खूप मोठ्या संख्येने आहेत व सत्ता टिकवायची म्हणजे त्यांचा अनुनय करणं आलंच– त्यांचा अनुनय म्हणजे तडजोडीचं, हिंदु समाजाला नाखूष करण्याचं राजकारण म्हणजेच पुन्हा संघासारख्या कामाला आमंत्रण, त्याच्या वाढीची खात्री ! असं हे दुष्टचक्र इतर पक्षांप्रमाणेच मार्क्सवाद्यांनाही भेदावं लागेल. एरवी सत्ताकारणाची कोंडी फुटणार नाही–

केरळमध्ये मार्क्सवादी संघाच्या बाबतीत थोडे धसमुसळेपणानं वागले असं यापूर्वीच म्हटलं होतं. भारतीय राजकारणात सावधगिरीची भूमिका घेत असताना त्यांनी असा धसमुसळेपणा करावा याचं थोडंसं आश्चर्य वाटतंच; परंतु परिस्थितीनंच त्यांना तसं वागणं भाग पाडलं आहे. शस्त्राचार, खुनाखुनी, बाँबस्फोट यांच्यावर श्री. नंबुद्रिपाद यांचा फारसा विश्वास नसावा असंच त्यांचं आत्मचरित्र वाचून वाटतं– मात्र ते ३८ सालापर्यंतच आहे. तरीही काही तरी जबरदस्त प्रतिमा पुन्हा उभी करून हिंदु बहुजन समाजाचा पाठिंबा त्यांना मिळवायचा होता आणि त्यांच्या तात्त्विक भूमिकेप्रमाणे शस्त्राचाराला त्यांची कधीच हरकत नव्हती. केरळातल्या शस्त्राचारापुढे आजपर्यंत इतर पक्ष नमले होते. बंगालमध्ये नक्षलवाद्यांचा ज्या मोठ्या प्रमाणावर पाडाव झाला तसा प्रकार केरळात झालेला नव्हता. नक्षलवादी काही काळ लढून नामशेष झाले होते. शिवाय संघटनेची बांधिलकी व्यक्त करण्यासाठी घडपडणाऱ्या अनुयायांना संघर्षाची आणि बलिदानाची संधी मिळवून देण्याची पद्धत सर्वच संघटना वापरतात. हौतात्म्य, बलिदान यांची फार मोठी पूजा समाजात होते व राजकीय पक्षांना आपली पाळंमुळं घट्ट करतात. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळचे १०५ हुतात्मे कोणी, कसे, केव्हा वापरले ते आठवून पाहण्यासारखं आहे. केरळमध्ये संघस्वयंसेवकांवर हल्ले करताना मुख्यतः हेच हेतू असावेत. त्यामुळेच त्याचा उपयोग होत नाही हे कळताच ते सध्या तरी स्थगित ठेवलेले दिसताहेत. पोटनिवडणुकीमध्ये विजयी झाल्यावर त्या उन्मादाने काही घडण्याची शक्यता आम्ही केरळात असताना नाकारता येत नव्हती; पण आता अडीच महिने झाल्यावरही सर्व शांत आहे. याचा अर्थ एवढाच की तीच तंत्रे कदाचित वापरली जाणार नाहीत. केरळच्या सरकारला दोन्ही बाजू भीक घालत नाहीत हे उघड आहे. आता नव्या रचनेमध्येही मार्क्सवादी केंद्र सरकारच्याच बाजूने उभे आहेत; पण सरकारमध्ये काही नाहीत– मात्र संघ–जनसंघ सरकारविरोधात आहेत ! यामुळे काही घडू शकेल का, याचा अंदाज वर्तवणं आता कठीण वाटतं. कारण दिल्लीतली सध्याची नवी राजकीय रचनाच मुळात अतिशय अस्थिर असल्यामुळे कोणालाही तिचे फायदे किंवा गैरफायदे ताबडतोब उठवता येणार नाहीत. त्यामुळे मध्येच एक अंक सुटी घेऊनही आमच्या मांडणीत फारसा फरक करावा लागला नाही. उद्याचा या दोन संघटनांमधला अखिल भारतीय पातळीवरचा संघर्ष हुबेहुब केरळच्या धर्तीवर लढला जाईल असं वाटत नाही.

देशाच्या एका कोपऱ्यात घडणाऱ्या घटनांचा हा धावता आढावा आणि तितकंच धावतं, पण सत्य जाणून घेऊन केलेलं विश्लेषण आहे. या प्रश्नाविषयी संघस्वयंसेवक, मार्क्सवादी कार्यकर्ते आणि सुशिक्षित, विचारक्षम वाचकवर्ग यांना प्राथमिक माहिती देणं आणि त्यात अनुस्यूत असलेले तात्त्विक, राजकीय डावपेच त्यांच्यापुढे मांडणं हाच मुख्य उद्देश होता. हे वाचून कोणाला फार अभिमान किंवा पराकोटीचं दुःख वाटण्यापेक्षा, सर्वांनीच याचा विचार करावा, केरळातल्या घटनांचा पाठपुरावा करावा असं वाटलं तरी आम्हाला समाधान वाटेल. आपल्या खंडप्राय देशात दूरवर घडणाऱ्या घडामोडी समजून घेणं सध्याच्या काळात फार निकडीचं आहे !

स मा प्त

## काही इंग्रजी लोकप्रिय लेखक (२)

# हेरॉल्ड रॉबिन्स

या हेरॉल्ड रॉबिन्सचे पहिले पुस्तक १९४८ मध्ये आल्फ्रेड ए. नोफ या नावाजलेल्या प्रकाशकाने छापले. त्या पहिल्या पुस्तकाचे नाव होते 'नेव्हर लव्ह अ स्ट्रेंजर' ही माहिती जेव्हा माझ्या वाचण्यात आली तेव्हा बरेच आश्चर्य वाटले. मौजेने आबा कदम चे पुस्तक छापावे असला हा काही तरी प्रकार झाला.

रॉबिन्सने एकूण चौदा पुस्तके लिहिली. अगदी अलीकडचे Dreams Die First हे चौदावे. ते पहिले कुणी प्रकाशित करावे? सीमन अॅन्ड स्कश्टरने. ही प्रकाशनसंस्था सुद्धा रँडम हाउससारखी प्रख्यात आहे.

हेरॉल्ड रॉबिन्स हा लोकप्रिय लेखक निश्चितच आहे. त्याची आधीची काही पुस्तके वाचनीय आहेत म्हणून मला वाटले रॉबिन्सचे पहिलेवहिले पुस्तक आल्फ्रेड नोफने प्रकाशित केले असेल; परंतु तब्बल १४ वे पुस्तक सुद्धा सीमन अॅन्ड स्कश्टर-सारख्या संस्थेने प्रकाशित केले. हा कदाचित अमेरिकेत गाडी-विमानाचा प्रश्न असेल. आपल्याकडे जसे पोटापाण्याचे प्रश्न असतात तसे अमेरिकेत गाडी-विमानाचे प्रश्न असतात. तिथल्या विमानतळावर खाजगी व्यक्तींची इतकी विमाने असतात की त्यांची व्यवस्था ठेवण्यासाठी विमानतळावरील अधिकारी जेरीस येतात. प्रकाशकांचाच विषय निघाला आहे म्हणून सांगतो. अमेरिकेतील प्लेबॉय या प्रख्यात मासिकाचा संपादक ह्यू हेफनवर. ऑफिसात तो रोज स्वतःच्या विमानाने जातो. त्याच्या विमानात त्याची एक खाजगी केबिन. त्यात भले मोठे गोलमेज. त्या मेजावर त्याची अनेक कागदपत्रे. अशा दिमाखात तो रोज विमानातून त्याच्या ऑफिसमधे जातो. रॉबिन्सची ड्रीम्स डाय फर्स्ट ही कादंबरी या हेफनवरच आहे असे म्हणतात. तिकडे पोटापाण्याचे प्रश्न मिटले की मग ते गाडी-विमानाचे प्रश्न कसे होतात त्याचे हे एक उदाहरण आहे.

बेटसी हे हेरॉल्ड रॉबिन्सचे दहावे-अकरावे पुस्तक असेल. त्या पुस्तकापासून रॉबिन्सच्या पुस्तकाने कलाटणी घेतली. त्याची बेटसीच्या आधीची पुस्तके वाचनीय आहेत; पण त्या-नंतरची पुस्तके अगदी घाणेरडी आहेत. आर्थर हेलीच्या व्हील्सप्रमाणेच बेट्सी हे पुस्तक मोटारकारखान्याच्या व्यवसायावर आहे.

हेरॉल्ड रॉबिन्सच्या एकूण ९ पुस्तकांवर चित्रपटही निघाले आहेत.

त्याच्या पुस्तकाची परीक्षणे जर कुणी रॉबिन्सला पाठवली तर ती न वाचता तो सरळ कचऱ्याच्या टोपलीत टाकतो. त्याच्या चौदाव्या पुस्तकाची परीक्षणे थोडीफार चांगली आली आहेत हे त्याला त्याच्या वकिलाकडून कळले! हेरॉल्ड रॉबिन्सला वाटते की साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी टीकाकारांनी ७५ वर्षांपूर्वीची मोजपट्टी वापरू नये. सध्याच्या बदललेल्या मूल्या-नुसार ती मोजपट्टी असावी असे त्याचे म्हणणे आहे!

रॉबिन्स लेखक झाला तो योगायोगानेच. लेखक होण्याच्या आधी तो यूनिव्हर्सल पिक्चर्स या कंपनीचा प्रेसिडेंट होता. या कंपनीने कोणा एका कादंबरीच्या चित्रपटा-विषयक हक्कासाठी तीन लक्ष डॉलर्स दिले. रॉबिन्सला ती कादंबरी फारच भंपक वाटली. तो म्हणाला केवळ १०० डॉलर्ससाठी याच्या-पेक्षा पुष्कळ चांगली कादंबरी मी लिहू शकेन आणि ती त्याने लिहिली.

एकदा त्याच्या पुस्तकात रॉबिन्स सेक्सचा वापर फार करतो असा त्याच्यावर अधिक्षेप केला गेला. त्यावर तो म्हणाला, 'हा अधिक्षेप नाही. हे सत्य आहे. जीवनात सेक्सचे स्थान महत्त्वाचे आहे. माझी पात्रे व सेक्स यांना जर मी विभक्त केले तर माझ्या पात्रांना मी न्याय देऊ शकणार नाही.'

आता हेरॉल्ड रॉबिन्स ६२ वर्षांचे झाले असतील. सध्या ते एक नवीन कादंबरी लिहीत आहेत. तिचे नाव असेल 'मेमरीज ऑफ अनदर डे.' या कादंबरीचा विषय त्याने वेगळाच निवडला आहे. तो आहे 'जीनेटीक मेमरी.' एका मोठ्या अमेरिकन लेबरलीडरची ती कहाणी आहे. कोणी तरी जॉन लिवीससारखा. यामुळे जगातील बहुतेक कारखानदार तर ती विकत घेईलच; पण कामगार लोकही घेतील. हे लोकप्रिय लेखक काहीही म्हणोत; पण त्यांचा एक डोळा (सॉरी, बहुतेक दोन्ही डोळे) नेहमी खपावर असतोच.

साठी ओलांडलेले व भरपूर पैसा कम-विल्यामुळे आता तरी ते अभिजात साहित्य निर्माण करतील का असा एकदा रॉबिन्सना प्रश्न विचारण्यात आला. यावर रॉबिन्स आत्मसंतुष्टपणे बोलले, 'माझ्या प्रत्येक पुस्तकात मी प्राण ओततो. माझी प्रत्येक कादंबरी ही अभिजात कलाकृती आहे. १९४८ साली मी लिहायला सुरुवात केली. तेव्हापासून आतापर्यंत मी कधी 'आउट ऑफ प्रिंट, झालो नाही ही माझ्या साहित्यिक यशाची पावती.'

एकदा आत्मसंतुष्टपणा लेखकात आला की सारे काही संपले असे मला वाटते. एरवी हा आत्मसंतुष्टपणा लेखकाला आत्मघातकी असतोच; पण रॉबिन्सने अभिजात साहित्य निर्माण करण्याचा दावा करावा म्हणजे मीडवुड, ट्रॅव्हेलर्स, सेंच्युरी व हॉलावे या सीरीज लिहिणाऱ्या लेखकांनी उत्कृष्ट कलाकृती निर्माण केल्याचे हक्काने सांगावे तसे आहे.

टीकाकार काही साहित्य निर्माण करीत नाही. साहित्यिक साहित्य निर्माण करतो असे रॉबिन्सचे म्हणणे आहे; पण एकदा मी असे वाचल्याचे आठवते की, तिसऱ्या दर्जाच्या साहित्यिकापेक्षा पहिल्या दर्जाचा टीकाकार श्रेष्ठ असतो. ते (रॉबिन्स) चार्लस डिकन्सचे उदाहरण देतात. डिकन्सला एके काळी 'टू पेनी रायटर' असे म्हटले जात असे. कारण त्याची पुस्तके हप्त्याहप्त्याने रोजच्या वर्त-मानपत्रांत येत. सुरुवातीला हे लिखाण तो पोटापाण्यासाठी करीत असे. त्या वेळच्या बड्या टीकाकारांनी डिकन्स हा अभिजात साहित्यिक आहे हे मान्य केले नव्हते; पण आज आपण डीकन्स हा महान लेखक होता हे मान्य करतो. अलेक्झांडर ड्यूमाचे सुद्धा असेच झाले हे रॉबिन्सना माहीत आहे. रॉबिन्सच्या मते जसा काळ तसा लेखक. शेवटी लेखक हा सांप्रत काळाचे प्रतिबिंब आहे अशीच त्यांची ठाम समजूत आहे. रॉबिन्सनाही असे वाटते की, शे-दोनशे वर्षां-नंतर आपणही डिकन्ससारखे महान लेखक गणले जाणार आहोत.

कदाचित शे-दोनशे वर्षानंतर अश्लीलतेची व्याख्या बदलेल. ती तशी प्रत्येक काळात बदलतच आली आहे. आजची अश्लीलता उद्याचा शृंगार समजला जातो. कदाचित असेही होईल की, अश्लीलता एका Saturation Point वर येऊन थांबेल. आता यापुढे आणखीन अश्लील तरी काय लिहिणार असा प्रश्न अश्लील लेखकापुढे उभा ठाकेल आणि मग परिस्थिती परत उलटी होईल. The trend will be reversed. शेकडो वर्षांपूर्वीचे सांखेडा फर्निचर आता फॅशनेबल समजलं जातं तसं. डेन्मार्कमध्ये सर्व अश्लील साहित्य विकायला मुभा आहे. (अर्थात् ठराविक वयापलीकडील लोकांसाठी) आणि काय आश्चर्य! तेथील अश्लील साहित्याचा खप एकदम कमी झाला.

मला तर असे वाटते की, रॉबीन्सची ही कल्पनाभरारी आणि आत्मसंतुष्टपणा दयनीय आहे. अमाप पैसा व यश मिळवून ते कोणत्या टोकाला हे त्यांच्या मान्यतेवरून उघड दिसत आहे. प्रत्येक लेखक त्या त्या काळाचे प्रतिबिंब जरूर असतो; पण हे प्रतिबिंब डिस्टोर्टेड असते. म्हणजे मला असे म्हणावयाचे आहे की, जो अभिजात लेखक असतो त्याला त्या त्या काळातील समाजाच्या उणीवा दिसू लागतात. त्या तो नेहमी सुधारण्याचा प्रयत्न करतो. त्याला एका प्रकारच्या हुरहुरीने ग्रासलेले असते. तो त्या काळापासून नेहमी चार पावले पुढे असतो आणि म्हणूनच त्या काळाचे तो एक 'डिसटोर्टेड इमेज' असतो किंवा असे म्हणावे की, त्या काळचा समाज त्या त्या लेखकाचे 'डिसटोर्टेड इमेज' असते.

'द ड्रीम मर्चंटस्' ही कादंबरी बऱ्याच टीकाकारांनी गौरवलेली आहे. ही रॉबिन्सची दुसरी कादंबरी.

रॉबिन्स हे फ्रान्सचे रहिवासी आहेत. म्हणजे त्यांची सिटीझनशीप फ्रान्सची आहे. वर्षातून सात महिने ते तिथे दडी मारून बसतात. बहुतेक लोकप्रिय लेखकांना एकांत आवडतो असे दिसते. त्यांच्याकडे एक ९० फूट लांब बोटही आहे. त्यातून ते भूमध्यसमुद्रात हिंडत असतात. सध्याची पिढी भोगवादी आहे; पण रॉबिन्सची पिढी तर कर्मठ आणि शिस्तप्रिय होती. या पिढीचे वकीलपत्र त्यांनी कसे घेतले? ९० फुटी बोटीकरता? लहानपणी ते मेनहेटनमध्ये रस्ते साफ करण्याचे काम करीत असत. From rags to riches चे प्रकार अमेरिकेत किती तरी होतात. पेट्रीक मॉयनीहान हे सुद्धा बूटपॉलीश करणारे होते.

सध्याच्या लोकप्रिय लेखकांत आयर्विंग वॉलेसचा प्लॉट अगदी परिपूर्ण असतो. आर्थर हेली हा एखाद्या धंद्यातले बारकावे इतक्या तपशीलवार टिपतो की, त्या त्या धंद्यातल्या लोकांनासुद्धा कधी कधी ते माहीत नसतात. हेरॉल्ड रॉबीन्सचा खाक्या म्हणजे त्याची पात्रेच. शेवटी हेरॉल्ड रॉबीन्सला एका दृष्टिकोनातून बघावे लागेल. सर्व लोकप्रिय लेखकात ३१ वर्षे लोकप्रिय रहाणारे ते कदाचित एकमेव कादंबरीकार असतील. बेल बॉटम काय किंवा मॅक्सी काय, ३१ वर्षे टिकली कशी? तब्बल ३१ वर्षांचा काळ लोटल्यामुळे रॉबिन्सचे साहित्यिक सिंहासन अढळ झाले का? हा काळ टच-स्टोन समजावा का? त्यांनी कसोटीचा काळ पार केला का?

लोकप्रिय लेखक व अभिजात साहित्य यामधल्या संघर्षाला रॉबिन्स सध्याचे साहित्यिक प्रस्थापन याला जबाबदार धरतात; पण त्यांना असे वाटते की, हळूहळू हा संघर्ष संपुष्टात येईल आणि असे मानायला रॉबीन्सकडे एक सबळ कारण आहे. अमेरीकेत हक्सली कॉलेजमध्ये सहा आठवड्यांचा एक साहित्यिक सेमिनार झाला होता. तो निव्वळ हेरॉल्ड रॉबिन्सच्या साहित्याला वाहिला होता. त्यामुळे रॉबिन्सना असे वाटते की, बरे किंवा वाईट त्यांचे साहित्य म्हणजे अमेरीकेचे प्रतिबिंब.

झालं. साहित्याचा बेल बॉटम्! साहित्याची मॅक्सी!

—जे. एन्. पोंडा
— फिनिक्स लायब्ररी

---

## ग्रंथालयात नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | बवनशीब – (बादशहाची शोकात्म कहाणी) – प्रतिभा रानडे | रु. १६/– |
| २. | जन्मदा – (खंड ३ रा) – (मातेची हृदयस्पर्शी रूपे) – म. स. पारखे | रु. २५/– |
| ३. | अली दि ग्रेटेस्ट – (परिचय) – पंढरीनाथ सावंत | रु. ९/– |
| ४. | कथा एका शायराची – (उर्दू कवी गालिबच्या जीवनातील शोकनाट्याचा वेध घेण्याचा कादंबरीरूप प्रयत्न) – इंदुमती शेवडे – | रु. २५/– |
| ५. | दुष्टचक्र – (कादंबरी) – चि. त्र्यं. खानोलकर | रु. १२/– |
| ६. | हमीदाबाईची कोठी – (नाटक) – अनिल बर्वे | रु. ८/– |
| ७. | चिनाब – (कथासंग्रह) – श्री. दा. पानवलकर | रु. २०/– |
| ८. | बायकांचं गुपित – (विनोदी कथासंग्रह) – द. पां. खांबेटे | रु. २२/– |
| ९. | प्रतापी बाजीराव – (चरित्र) – म. श्री. दीक्षित | रु. ३०/– |
| १०. | खजिन्याची विहीर – (नाटक) – रॉय किणीकर | रु. ७/– |


**ENGLISH**

| | | |
|---|---|---|
| 1. | Bruce Lee – The Man Only I knew – (How the deadliest exponent of unarmed combat lived, loved, fought & died) – By his wife Linda Lee– | Rs. |
| 2. | The Rage – (Medical novel about rabies) – Jack Ramsay | R. 12-70 |

✤ The Prices of books have become prohibitive! Save your money by joining a standard Library!!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# रंगभूमी



# आगंतुक

## कंटाळा आणणारे नाटक

विनया खडपेकर

“ भेंडे असून फार्स नाही. सारंग असून व्हायोलन्स नाही. लालन असून सेक्स नाही. मग हे आहे तरी काय ?” अशी “आगंतुक” या नाटकाची जाहिरात वर्तमानपत्रातून गाजत होती. मी नाटक पाहून आले. तरी मनात प्रश्न राहिला, ‘ हे आहे तरी काय ? ’

राम आणि जानकी पती-पत्नी खंडाळ्यात बंगल्यात राहतात. राम कामानिमित्त सारखा बाहेर. जानकी कंटाळलेली. झोपेसाठी औषध घेते. चिडून प्रमाणापेक्षा जास्त घेते. बागेत जाते. गाडी नादुरुस्त झाल्यामुळे मदतीच्या शोधात असलेला नाथ नागपुरे घरात शिरतो. फोन करून गॅरेजशी संपर्क साधतो. दमल्यामुळे पेल्यातले पाणी पितो. त्यात जानकीचे उरलेले झोपेचे औषध असते. त्याला गुंगी येते. तो पलंगावर लवंडतो. जानकी येते तीही गुंगीतच त्याच्याजवळ झोपते. राम प्रवासाहून येतो. भडकतो. नाथाला खुनाची धमकी देतो. दोघांना नाना प्रश्न विचारतो. दोघेही जबरदस्त गुंगीत. मग राम सकाळी चौकशी करतो. रामचे समाधान होते. अचानक नाथ जानकीवर लुब्ध होतो, मग तो स्वतः साउथ इंडियन ऑइल मॅनेजिंग डायरेक्टर असल्याचे सांगतो. राम खुष होऊन स्वतःच्या धंद्याची त्याला माहिती देतो. एकदम राम आणि जानकी नाथ वेडा असल्याचा पक्का निष्कर्ष काढतात. मधे कोठे तरी हा संशय विरून जातो. मधेच जानकी रामशी घटस्फोट घेण्याचे ठरविल्याचा बहाणा करते. नाथाशी लग्न करणार असल्याचे जाहीर करते. जबाबदारी नको असलेला नाथ का-कू करू लागतो; पण ती जबरदस्तीने त्याच्याकडून पन्नास हजार रुपयांचा चेक घेऊन बंगला त्याला विकल्याचे सांगते. शेवटी त्याला टाटा करून रामबरोबर निघून जाते. वैतागलेला नाथ फोनवरून “आज येते” अशा निरोप सांगणाऱ्या मंदाला ‘ ये ’ म्हणतो. तिचे अठ्ठावन्न वय कळताच ‘ नको येऊ ’ सांगून स्वतःच्या डोक्यावरचा व्हिग काढून फेकतो.

हे सारे पाहून वाटते नाटक या नावाखाली रंगमंचावर जे काही झाले ते होते तरी काय ? खरे म्हणजे काहीच नव्हते. यात बराचसा फार्स आहे. किंचित् व्हायोलन्स आहे. किंचित् सेक्स आहे. उदाहरणे सांगू ? नाथाचे घरात शिरणे, फोन करणे, झोपणं, राम-जानकी घटस्फोटाची तयारी, पुनर्मीलन हा भेंड्यांचा फार्सचा मसाला. राम नाथवर दोनतीनदा पिस्तुल भिडवतो, हा कमलाकर सारंगांचा व्हायोलन्स. जानकीचे नाथला उद्देशून ‘ हे बघ मला मूल आवडतं. तुझ्याशी लग्न केलं की लगेच मूल ! ’ हे बोलणे म्हणजे लालनबाईंचा किंचित् सेक्स.

मराठी रंगभूमीवर गवतासारखी उदंड उगविणारी जी कवडीमोलाची नाटके आहेत त्यातीलच ‘ आगंतुक ’ हे नाटक आहे. हल्ली नाटक-चित्रपटात काही गोष्टी फार लोकप्रिय झाल्या आहेत. कामात बुडालेला पती आणि वैतागाने झोपेची औषधं घेणारी त्याची पत्नी, एखाद्या भोळ्या माणसाला अनुनय करायला शिकविणे आणि त्याने ऐनवेळी प्रेयसीशी मूर्खपणे वागणे, मद्यपान नृत्य हे ते लोकप्रिय प्रकार. या सगळ्याचा उपयोग ‘आगंतुक’मधे केला आहे. हे सारे पाहून आता कंटाळा आला आहे. राम मधेच गुडघे टेकून चालतो, मधेच शब्दागणिक उडी मारतो. प्रेक्षकांना हसविण्यासाठी चाललेले हे बाष्कळ चाळे पाहून मराठी रंगभूमीबद्दल करुणा उत्पन्न होते. नाथाचे रामला प्रणयाराधनाचे धडे देणे आणि रामने जानकीचे प्रणयाराधन करताना केलेला मूर्खपणा पाहून वाटते हे कशासाठी ? विवाहानंतर पाचसहा वर्षांनी प्रणयाराधनाचे ट्रेनिंग घेण्याची गरज रामला का पडली ?

‘ अभिषेक ’ निर्मित ‘ आगंतुक ’ या नाटकाचे लेखक आहेत श्री. आत्माराम भेंडे आणि दिग्दर्शक आहेत श्री. कमलाकर सारंग. कलाकार आहेत–लालन सारंग (जानकी), आत्माराम भेंडे (नाथ) आणि कमलाकर सारंग (राम). त्यांनी आपल्या भूमिका चोख बजावल्या आहेत. खंडाळ्याच्या बंगल्याची सजावट अतिशय योग्य आहे.

प्रयोगात ठीक असले तरी लेखनात अगदीच बिनबुडाचे असल्यामुळे भयाण कंटाळा आणणारे हे नाटक आहे. □

# चित्रपट

## नूरी

### राजश्री फॉर्म्युला

सदानंद बोरसे

हिंदी चित्रपटांपैकी बहुतेक चित्रपट हे लाटांवर डोलणारे चित्रपट असतात. कोणताही– फक्त हिंदीच नाही, तर हिंदी, इंग्रजी वा अन्य भाषेतीलही चित्रपट जरा बरा चालला की, त्या साच्याच्या चित्रपटाची लाटच सुरू होते. या लाटेत मग वाटेल त्या गोष्टींचे अनुकरण होते. एक 'शोले' बेफाट गाजला म्हटल्यावर इमान धरमपासून त्रिशूलपर्यंत धडाधड बहुतारांकित चित्रपट निघाले. त्या सुमारासच जोडनायकांची लाट आली. दीवार ते हीरालाल–पन्नालालपर्यंत कैक गलबते या लाटेवर तरली वा बुडाली.

असाच एक फॉर्म्युला मुख्यत: राजश्री प्रॉडक्शन्सने अमलात आणला आणि तो बऱ्यापैकी यशस्वी ठरला. एक नवीन आणि तरुण जोडी घ्यायची, त्यांना एकमेकांवर प्रेम करायला लावायचे आणि शेवटी काहीही डोके लढवून त्यांचे प्रेम यशस्वी करायचे वा 'असफल प्रेम' या सदराखाली दोघांना मारून टाकायचे. बरे, यापैकी काहीही केले तरी भोळ्या सांबाप्रमाणे असणारा आमचा प्रेक्षक 'दोघेजण सुखाने संसार करू लागले' टाइप शेवट असला, तरी स्वप्नरंजनामुळे सुखावतो आणि 'रोमिओ–ज्युलिएट,' हीर–रांझाटाइप शेवट असला, तरी गहिवर गहिवर गहिवरतो. ही नस बरोबर ओळखून आणि तिला नाविन्याची (म्हणजे दर वेळी नवीन जोडी) जोड देऊन 'गीत गाता चल' ते 'अँखियोंके झरोखों से' इतका यशस्वी प्रवास राजश्रीने केला.

ह्याच फॉर्म्युल्याखाली तयार झालेला दिग्दर्शक मनमोहन कृष्ण व निर्माता यश चोपडा यांचा चित्रपट म्हणजे 'नूरी.' चित्रपटाची कथा व पटकथा सागर सरहदींची आहे. ही कथा घडते एका काश्मीरसदृश भागात. नूरी व युसुफ ह्या दोन तरुण पाखरांचा एकमेकांवर जीव जडलेला. युसुफला जवळचे असे कोणी नाही. नूरीला तिचे अतिशय प्रेमळ अब्बाजान आणि हुशार कुत्रा खैरू. (चित्रपटाचा खरा हिरो खैरूच असल्याचे माझ्या शेवटी ध्यानात आले; कारण हिरोने करायची सर्व परंपरागत कामे– उदा. पळणाऱ्या खलनायकाचा पाठलाग, बंदुकीच्या गोळ्या लीलया चुकवणे, खलनायकाला उत्तम पिटणे इत्यादी-चित्रपटात या कुत्र्यानेच केली आहेत. आंतरराष्ट्रीय बालवर्षानिमित्त 'कुत्ता-मानव का मित्र' किंवा 'कुत्ता– एक इमानदार जानवर' या नावाची डॉक्युमेंटरी म्हणून या चित्रपटातील अनेक तुकडे काढून जोडता येतील किंवा चित्रपटाचा अखेरचा सुमारे अर्ध्या तासाचा भाग 'चालाक खैरू के कारनामे' म्हणून कोणत्याही बालचित्रपटमहोत्सवाला पाठवायला हरकत नाही.) आता मियाँ– बिबीच्या आड येणारे आईबाप हे प्राणी असे अडवणूक करणार नाहीत म्हटल्यावर कथा पुढे सरकणार कशी? त्यासाठी बशीरखान या गावगुंडाला चित्रपटात प्रवेश दिला आहे. त्या निमित्ताने दोन खून, एक बलात्कार, एक आत्महत्या, एक कोठीनृत्य आणि माणूस व कुत्र्याची रोमहर्षक फ्रीस्टाइल कुस्ती इतक्या गोष्टी टाकायला मिळाल्या. शिवाय बशीरखानच्या या धुमाकुळामुळे युसुफ व नूरीच्या प्रेमाची गाडीही रुळावरून घसरून पडली. आधी दिलेल्या यादीत खून–नूरीच्या वडिलांचा व युसुफचा, बलात्कार नूरीवर, आत्महत्या नूरीची इत्यादी गोष्टी सुज्ञांनी ओळखल्या असतीलच. अर्थातच मी शेवटही आणखी फोडून सांगण्याची आवश्यकता नाही. या सगळ्या कथानकामध्ये गुलाम नबी म्हणजे नूरीचे अब्बाजान आणि लाला या दोघांच्या मैत्रीप्रकरणातून सर्वधर्मसमभावही साधून घेतला आहे, गुलाम नबी मरत असल्यामुळे पुढेही काही हमखास गहिवर–प्रसंगांना वाव मिळतो.

चित्रपटात नूरी व युसुफची कामे पूनम धिल्लाँ आणि फारुक शेख या नव्या कलाकारांनी केली आहेत. पूनम यापूर्वी 'त्रिशूल'-मध्ये पडद्यावर आली होती; पण त्यात तिला फारसा वाव नव्हता आणि जितका वेळ ती पडद्यावर होती, त्या वेळातही एक गोड दिसणारा ठोकळा यापलीकडे काहीही मत तिच्याबद्दल बनले नव्हते. 'नूरी'मध्ये मात्र एक सुरेख, शालीन काश्मिरी किशोरी म्हणून ती अतिशय शोभून दिसतेच, शिवाय या वेळी आपण फक्त ठोकळा वाटणार नाही, याचीही तिने बऱ्यापैकी काळजी घेतली आहे. फारुक शेखही यापूर्वी 'गमन'-मध्ये दिसलेला आहे. 'नूरी' हे त्याचे मागचे पाऊल नसले तरी पुढचेही पाऊल नाही. तो सतत किंचितसा बावळटपणा चेहऱ्यावर वागवत वावरतो, मग प्रसंग नूरीच्या अब्बाजानना भेटण्याचा असो, मारामारीचा असो वा नूरीबरोबरच्या प्रणयाचा. 'गमन'मध्ये हा बावळटपणा त्याच्या गावंढळपणाला पूरक ठरला होता; पण 'नूरी'त मात्र तो विनोदी वाटायला लागतो. त्याची संवादफेकही काही वेळा अशीच विचित्र आहे. गावातील टवाळ पोरे खैरूला दगड मारताना युसुफ मध्ये पडून

त्या पोरांना खडसावतो; पण या प्रसंगात त्याचा बावळट चेहरा, चमत्कारिक अंगविक्षेप आणि ताणलेल्या क्वचित् फाटणाऱ्या आवाजात चाललेला त्याचा आरडाओरडा हे सगळे इतके झकास जमून आले आहे की, पोरे खैरूबरोबरच त्यालाही दगड मारायला सुरुवात करणार, असे वाटते. बशीरखानचे काम करणाऱ्या भरतकुमारचा हा पहिलाच चित्रपट; पण त्यातूनही त्याने स्वत:बद्दल अपेक्षा निर्माण केल्या आहेत. बाकी इफ्तेकार (गुलाब नबी), मदनपुरी (लाला) आणि गीता सिद्धार्थ यांची कामेही ठीक. आणखी एक महत्त्वाचे पात्र म्हणजे खैरू कुत्रा. सँडो चित्रप्पा देवरांच्या मृतात्म्यालाही या कुत्र्याचे काम पाहून त्याच्या शिक्षकाबद्दल कौतुक वाटले असेल आणि त्या शिक्षकामुळे स्वत:ला वारसदार मिळाल्याचे समाधानही मिळाले असेल. गुलाम नबी व नूरीबद्दलचे प्रेम, नूरीच्या मृत्यूनंतर बशीरखानाचा सतत केलेला पाठलाग, नूरीच्या मृत्यूनंतरची अगतिकता या सगळ्याच गोष्टी या खैरूसाहेबांकडून झकास करून घेण्यात आल्या आहेत.

मनमोहन कृष्ण या चित्रपटाद्वारे प्रथमच अभिनयक्षेत्रातून दिग्दर्शनक्षेत्रात उतरले आहेत. 'चोरी चोरी कोई आये' या गीताचे चित्रण, नूरी व युसुफचे काही सहजसुंदर प्रसंग अशा तीन-चार गोष्टी वगळता त्यांच्या दिग्दर्शनात खासियत काही नाही. शेवटी खैरू बशीरखानवर हल्ला चढवतो, तेव्हा तर दिग्दर्शनाचा मोठा विनोद करून त्यांनी खैरूला एकदम अमिताभच्या पंक्तीत नेऊन बसवले आहे. 'दीवार'मध्ये सात-आठ गुंडांशी हाणामारी करताना अमिताभ ज्याने आपल्याला फावड्याने मारले त्या गुंडाला फावड्यानेच चिणतो, ज्याने दोराने आवळले त्याच्या गळ्यात तोच दोर अडकवतो, तसाच खैरूही बशीरखानाला मारताना ज्या क्रमाने बशीरखानने नूरीवर बलात्कार केलेला असतो तोच क्रम ठेवतो; म्हणजे प्रथम नूरीच्या पाठीवरचा कुडता फाटला होता काय? ठीक, हा फाटला तुझ्याही पाठीवरचा कुडता. नंतर तू तिच्या गालावर जखम केली नाहीस का? ठीक, हा तोडला तुझ्या गालाचा लचका. असे करीत करीत शेवटी खैरू बशीरखानला त्याच जागेवरून पाण्यात ढकलतो, ज्या ठिकाणाहून नूरीने आत्महत्या केली होती. धन्य तो खैरू आणि धन्य ते दिग्दर्शक मनमोहन कृष्ण!

अतिशय गोड संगीत आणि पार्श्वसंगीत हे नूरीचे आणखी एक वैशिष्ट्य. संगीतकार आहेत खय्याम. विशेषत: 'चोरी चोरी कोई आये' हे गाणे लताचा नितांत मधुर आवाज, गीतात एका तितक्याच गोड तंतुवाद्याचा (बहुधा ते संतूर असावे.) केलेला वापर आणि त्या वेळचे पडद्यावरील पूनमचे नेत्रसुखद दर्शन यामुळे झकास झाले आहे. 'आ जा रे आ जा रे ओ मेरे दिलवर आ जा' आणि 'कदर तूने ना जानी' हीही दोन उल्लेखनीय गीते.

काश्मीरची पार्श्वभूमी आणि पूनम या दोन डोळ्यांना सुखावणाऱ्या गोष्टींचा आधार मिळाला असला, तरी छायाचित्रणात मधूनच फिल्टर अचानक बदलला जाण्याच्या गमती होतातच. शिवाय चित्रपटात बारीकसारीक गोष्टींकडे जाऊ देत; पण अतिशय ठोकळ गोष्टींकडे जाता जाता दुर्लक्ष करण्याचा निष्काळजी प्रकार फार आढळतो. 'नूरी'मध्येही गुलाम बक्षी झाड तोडत असताना फ्रेममध्ये आलेला माईक एखाद्या बंदुकीच्या नळीप्रमाणे सतत एका कोपऱ्यातून गुलाम बक्षीवर रोखलेला असतो. (नुकत्याच पाहिलेल्या 'दूरियाँ'मध्येही एका सलग दृश्यामध्ये आता उत्तमकुमारच्या पायांत दिसत असलेले बूट क्षणात अदृश्य करण्याची किमया करून दाखवली आहेच.)

तर असा हा प्रमुख राजश्री फॉर्म्युला आणि त्याला चवीपुरत्या प्रमाणात का होईना, अन्य मसाल्याची जोड दिलेला 'नूरी.'

☐




लेखक : पु. ल. इनामदार मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चित्रपटाबाहेर....

'मिस्टर नटवरलाल' या फिल्ममध्ये अमिताभ बच्चन गाणंही स्वतःच म्हणणार आहे आणि हे जर यशस्वी झालं तर इथून पुढे आपल्या सर्व पिक्चर्समध्ये गाणीही स्वतःच म्हणण्याचा अमिताभचा इरादा आहे. जे अमोल आणि असरानीला जमू शकतं ते काय अमिताभला जमणार नाही? उलट त्याच्या सध्याच्या अचकट-विचकट कामांमध्ये आणखी एक खर्जातली भर पडेल! ※

लोकांनी झीनत अमान अजून पुरेशी पाहिलेली नाही, असं वाटणारा दिग्दर्शक अली रेझा हा जगातील एकमेव माणूस असेल. त्याच्या 'राजकुमारी' या नवीन चित्रपटामध्ये झीनतला जंगलातच वाढलेल्या एका मुलीचा रोल देण्यात आला असून साहजिकच तृण आणि वृक्षपर्ण हीच तिची वस्त्रप्रावरणं आहेत. कदाचित 'सत्यम्'मध्ये जे काही दाखवलं त्यापेक्षाही थोडं अधिक काही दाखवण्याचा (असलंच तर!) झीनतचा इरादा असेल; पण त्यामुळे फिल्म फ्लॉप ठरण्याचीच निश्चिती होणार नाही का? ※

योगिता बालीला आता फिल्म जगतामध्ये काही भवितव्य राहिलेलं नाही, हेच खरं! विनोद मेहराबरोबरचा तिचा 'आखरी कसम' हा या वर्षीचा 'बिगेस्ट बॉम्ब' ठरला आहे. तेव्हा आता एक तर पुन्हा किशोरकुमारकडे जाणं किंवा ज्या एका श्रीमंत अमेरिकन माणसासाठी तिनं गळ टाकला होता त्याच्याशी सरळ लग्न करून टाकणं एवढंच योगिताच्या हाती राहिलं आहे!

हातात फारसं काही नसूनही राजेश खन्नाचा मस्तवालपणा अजून गेलेला नाही. त्याच्या या स्वभावामुळंच 'सम्राट' या चित्रपटामधून राजेश खन्नाला काढून त्याच्या जागी जितेंद्रला घेण्यात आलं आहे. याची भरपाई म्हणून त्याला 'पापी पेटका सवाल' या चित्रपटात घेण्यात आलं आहे. खरं म्हणजे आधी यासाठी धर्मेंद्रला ऑफर देण्यात आली होती; पण सध्या अजिबात वेळ नसल्यामुळं धर्मेंद्रनं ती नाकारली आणि म्हणून राजेशला मिळाली. कारण राजेश खन्ना काय, सध्या रिकामाच पडला आहे. त्याची बाई-बाटली मात्र भयंकर वाढली असून त्यामुळं डिंपल त्याला घटस्फोट देण्याचा पुन्हा एकदा गंभीरपणे विचार करत आहे, अशा बातम्या फिल्म इंडस्ट्रीत उठल्या आहेत. ※

बॉबी'मुळं ऋषी कपूरचं यश जेव्हा अस्मानाला पोचलं होतं तेव्हा त्याला एका चित्रपटासाठी रिना रॉयबरोबर काम करण्याबद्दल विचारण्यात आलं होतं; पण त्या वेळी चिंटूनं रिनासमोर उभं राहण्यासुद्धा नकार दिला. मध्यंतरी एक निर्माता ऋषी कपूरबरोबर काम करणार का? म्हणून रिनाला विचारायला गेला; पण ऋषीच्या बहुतेक फिल्म फ्लॉपच जातात, असं कारण देऊन रिनानं नकार दिला. शेवटी जेव्हा ऋषी कपूरनं स्वतः येऊन मनधरणी केली तेव्हाच त्याच्याबरोबर 'बदलते रिश्ते'मध्ये काम करायला रिना तयार झाली. ऋषीचा लहरीपणा नीतू सांभाळून घेईल, इतरांनी त्याला का म्हणून भीक घालावी? ※

सुनील गावस्करने आपली 'खोयेसे हम तुम' हा पहिलाच चित्रपट नुकताच पूर्ण केला. हाच चित्रपट मराठीमध्ये 'सावली प्रेमाची' या नावानं प्रदर्शित करण्यात येणार आहे. आता सिप्पी पिता-पुत्रांनी त्यांच्या एका रहस्यमय चित्रपटासाठी सुनीलला भली मोठी रक्कम घण्याची तयारी दाखवली आहे. या चित्रपटात नायिकेच्या भूमिकेत रिना रॉय चमकणार आहे; पण सुनीलच्या सध्याच्या परदेशदौऱ्यामुळं त्याच्या तारखा मिळणं ही मात्र कठीण बाब होऊन बसली आहे. ※

सत्यजित रेच्या 'शतरंज के खिलाडी'ला भारतामध्ये जरी फारसा प्रतिसाद मिळाला नसला तरी लंडनच्या 'ॲकॅडेमी थिएटरमध्ये' या चित्रपटानं नुकताच आपला रौप्यमहोत्सव साजरा केला. हा मान मिळविणारा 'शतरंज के खिलाडी' हा पहिलाच भारतीय चित्रपट आहे.

भारतामध्येही 'बदलते रिश्ते', 'हमारे तुम्हारे', 'साजन बिना सुहागन' हे सर्व प्रकारचा मसाला ठासून भरलेले चित्रपट एकापाठोपाठ एक फ्लॉप जात असताना श्याम बेनेगलचा 'जुनून' कित्येक ठिकाणी 'सिल्व्हर हीट' ठरत आहे. भारतीयांची रुची बदलत असल्याचं तर हे चिन्ह नव्हे? ☐


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दिल्ली वार्तापत्र : पृष्ठ ३ वरून

हा आणखी पुढचा मुद्दा आहेच. आता चरणसिंग–चव्हाणांनी इंदिरा गांधींना बोट धरायला दिलेच आहे. उद्या त्या यांचे मनगटच धरल्याशिवाय कशा राहतील ? खटले वगैरे तर सोडूनच द्या. आत्ताच त्यातला सगळा जीव संपलेला आहे. विठ्ठलराव गाडगीळ वगैरे इंदिरा पक्षाचे लोक सत्तेची गणिते आजच मांडू लागलेले आहेत; आणि त्यांनी का मांडू नयेत ? मोरारजींनी सुचवलेला जनता–कॉंग्रेस युतीचा पर्याय स्वीकारला गेला असता तर हा धोका टळला असता. आता चव्हाण कॉंग्रेस समोर एकच मार्ग उरला आहे. अरस यांचे सर्व कॉंग्रेस एकत्र आणण्याचे प्रयत्न यशस्वी करणे. इंदिरा गांधी व जनसंघ यांना वगळून सर्व समाजवादी+कॉंग्रेसजन यांनी एका झेंड्याखाली गोळा व्हावे असे आवाहन मोरारजींच्या राजिनाम्यानंतर चव्हाणांनी एक पत्रक काढून केलेलेच होते. पण त्या घुमश्चक्रीत तरी चव्हाणांच्या आवाहनाकडे कुणी लक्ष दिले नाही व कॉंग्रेसच्या राजकीय शैलीशी अजिबात ज्यांची शैली जुळत नाही, नेहरू–आदर्शांपासून जे हजारो मैल दूर आहेत अशा चरणसिंगांशी जमवून घेणे चव्हाणांना भाग पडले. कितीही लोकप्रिय असले तरी चरणसिंग सर्व देशाचे नेते कधीही नव्हते, यापुढेही होऊ शकणार नाहीत. उलट मोरारजी, जगजीवनराम, अटलबिहारी बाजपेयी यांना अखिल भारतीय मान्यता आहे. चव्हाणांची पूर्वपीठिका पाहता हा गोतावळा त्यांना अधिक मानवला असता. हा सोडून त्यांनी चरणसिंगांशी घरोबा केला. प्लेगचा संसर्ग तर टळला नाहीच; शिवाय ज्या एकाधिकारशाहीशी लढण्याचा पवित्रा त्यांनी घेतला तोही डळमळित झाला. दिल्लीत तर जो तो ' बाई आल्या, येणार, येत आहेत ' असे म्हणू लागला आहे. गिरिलाल जैनसारखे इंदिरावादी पत्रकार तर ' She will devour them all '–' बाई या सर्वांना गिळून टाकतील ! ' अशी खात्रीच बाळगून आहेत. मग मोरारजींची सूचना झिडकारून चव्हाणांनी साधले काय असा प्रश्न, त्यांच्याविषयी सहानुभूतीने विचार करणाऱ्यालाही पडतो. परिस्थिती इतकी अस्थिर आहे, की कुठल्याही प्रश्नाचे ठामपणे उत्तर देणे आज तरी अशक्य आहे. पण स्थिर सरकारची एक शक्यता मोरारजींनी पुढे केलेला सहकार्याचा हात चव्हाणांनी न स्वीकारल्यामुळे संपली, हे निश्चित. आता अस्थिरताच अस्थिरता. मग राष्ट्रपतींना हवे असलेले सर्वपक्षीच शासन अवतीर्ण होवो, जगजीवनबाबूंचे जनता शासन येवो किंवा चरण–चव्हाण यांचे सरकार चालू राहो किंवा मध्यावधी निवडणुका येवोत. खरोखर मध्यावधी निवडणुकांनी तरी प्रश्न सुटणार आहे का ? निवडणुकांनंतर असेच अस्पष्ट चित्र पुन्हा कायम राहणार नाही कशावरून ? जोपर्यंत व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा आणि देशापेक्षाही स्वतःचा स्वार्थ मोठा मानण्याची प्रवृत्ती कायम आहे तोवर या नाही त्या स्वरूपाच्या अस्थिरतेपासून आपली सुटका नाही. अगदी मोरारजीही या दोषापासून अलिप्त नाहीत. देशापेक्षा त्यांना आपला नैतिक अहंकार अधिक मोठा वाटत असावा; अशी त्यांची या सर्व सत्तासंघर्षात एकूण वागणूक होती. कुणाला सत्तेची नशा, तर कुणाला नैतिकतेचा कैफ! थोडी पड खाऊन पक्षसदस्यांच्या मताला मोरारजींनी मान दिला असता, जगजीवनरामांकडे नेतृत्व सुपूर्त केले असते तर पुढचे सगळे रामायण टळले असते का ? शक्यता होती; असा हा सगळा देशापेक्षा व्यक्तिस्वार्थ–मग तो राजकीय असो, आर्थिक असो की नैतिक असो–श्रेष्ठ मानण्याच्या प्रवृत्तीचा परिपाक आहे. ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. नाही तर अस्थिरतेकडून अस्थिरतेकडे सतत ढकलले जाण्याची सर्वांनी तयारी ठेवावी. दुसरा या सत्तासंघर्षाचा कोणता बोध आहे ?

–श्री. ग. मा.

## ज्या दिवशी चरणसिंगांना राष्ट्रपतींनी सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण केले त्याच दिवसापासून दिल्लीतील राजकारण पुन्हा एकदा इंदिरा गांधींभोवती फिरू लागले.

## तो दिवस २६ जुलै १९७९

## या दिवशी सकाळी....

# १२ विलिंग्डन क्रेसेंटमध्ये, एक तास पंचवीस मि.

# इंदिरा गांधी यांची मुलाखत

## पुढील अंकी